3) सदरच्या शास्तीची अंमलबजावणी ही सहसंचालक उच्च शिक्षण विभाग नागपूर विभाग नागपूर जुने मॉरेस कॉलेज परिसर नागपूर यांनी करावयाची असून त्यांचेकडे स्वतंत्रपणे सदरच्या निर्णयाची एक प्रत पोस्टानी पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 30.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.576–579

पात्र आहेत. संबंधित जन माहिती अधिकारी हे आयोगापुढे हजर नाहीत. त्यांचे म्हणणे ऐकुन घेता येत नाही परंतु महाविद्यालयातील जे तीन अधिकारी आज हजर आहेत ते त्यांचे प्रतिनिधीत्व करीत आहे व त्यामुळे संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे स्वतंत्रपणे म्हणणे ऐकुन घेणे आयोगावर बंधनकारक नाही व तसेही दि. 22.8.2008 रोजी आयोगातून नोटिस निर्गमीत केल्या नंतर त्यांना आयोगापुढे त्यांचे म्हणणे दाखल करण्याकरीता पुरेपुर संधी देण्यात आली होती व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 24.3.2007 च्या जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेल्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आहेत अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 10000/– ची शास्ती ही लादण्यात येत असून त्यांचे दरमहाचे वेतनातून सदरची शास्तीची रक्कम वसुल करुन लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

2. अपीलकर्ता यांनी दि. 24.3.2006 रोजी माहिती अधिकारी तथा दयानंद आर्य कन्या महाविद्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

Crtified copy of Eligibility form signed by the Principal and the Teacher Incharge of Physical Education & Sports and acknowledged by office of Director of Education R.S.T.M. Nagpur University Nagpur.

स्दरची माहिती स्पिड पोस्टनी घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 25.4.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून प्राचार्य दयानंद आर्य कन्या महाविद्यालय यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. राज्य माहिती आयोगाकडून दि. 22.7.2008 रोजी दि. 30.8.2008 रोजीच्या अपीलाच्या सुनावणीकरीता नोटिस काढण्यात आली आहे. परंतु जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी हयांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा हा दाखल केलेला नाही. आजही सुनावणीस प्रभारी प्रायार्य हजर आहेत. त्यावर त्यांनी असे सांगितले की त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे व त्यांना सर्व कागदपत्रे पुरविण्यात आलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना मागितलेली माहिती ही अजुन पर्यंत मिळालेली नाही. विभागीय चौकशी हे स्वतंत्र प्रकरण आहे व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे जो अधिकार नागरीकास प्राप्त झाला आहे त्या अधिकाराची प्रक्रिया ही स्वतंत्र बाब आहे व त्यामुळे दोन्ही प्रकरणामध्ये कोणत्याही प्रकारची सरमिसळ करता येत नाही त्यामुळे अपीलकर्ता यांना अजुनपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी हे अधिनियमच्या तरतुदीप्रमाणे दोषी आढळुन येतात अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्तीस

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1935/2007.**

डॉ. शालीनी हरीष बावनकर
43 सी, साकेट नगर, सुयोग नगर चौक
नागपूर 440 027. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
दयानंद आर्य कन्या महाविद्यालय
जरीपटका नागपूर 440 014.
2) जन माहिती अधिकारी तथा
दयानंद आर्य कन्या महाविद्यालय
जरीपटका नागपूर 440 014. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.6.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. जन माहिती अधिकारी गैरहजर असून त्यांच्या ऐवजी प्रभारी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्या हया हजर आहेत.

की त्यांना ती माहिती उपलब्ध करुन दिली होती व पुन्हा उपलब्ध करुन देण्यास कोणतीही अडचण नाही त्यामुळे सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्ता यांना आयोगाचे समोरच सदरची माहिती अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेली यादी उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे दि. 25.1.2007 रोजी जिल्हा परिषदेच्या परिचर भरतीमध्ये घोटाळा तसेच परिचर पदावर नियुक्ती मिळण्याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. दि. 8.1.2007 रोजी सुध्दा मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना श्री रवी परचाके सदरच्या निवडीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपर आयुक्त आदिवासी विकास अमरावती यांनी सुध्दा दि. 23.11.06 रोजी अपीलकर्ता यांना पत्राची प्रत दिलेली दिसून येते. व त्यामुळेही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे व आजही माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 30.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.573–575

स्थानिक जिल्हयाचे म्हणजे यवतमाळ कार्यालयात नोंद आहे का अशी माहिती द्यावी. तसेच दारिद्रय रेषेखालील आहे असेही नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 9.8.2006 रोजी आपण मागितलेली माहिती तयार करण्यात आलेली आहे सदर माहिती एका पानामध्ये आहे. प्रति पेज 2 रु प्रमाणे शासन खाती जमा करुन पावती दाखवावी त्याप्रमाणे माहिती देण्यात येईल. त्याप्रमाणे उप मुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य यांनी तीन उमेदवारांच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु उमेदवार क्र. 2 रवी श्रीराम परचाके यांच्या बाबतचा प्रकल्प नोंदणी क्रमांक दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना अपूर्ण माहिती मिळाली. अपीलकर्ता यांनी पुन्हा दि. 11.9.2006 रोजी माहिती मागण्यासाठी दि. 13 जुन 06 रोजी जि.प.परिचर (प्रकल्पग्रस्त) मधील परीक्षेसाठी पात्र पाच उमेदवार मधून कोणत्या तीन उमेदवारांची नियुक्ती ही जि.प.सामान्य प्रशासन अंतर्गत कोणत्या विभागात झाली आहे त्याची सत्यप्रत देण्यात यावी. दि. 13 जुन 06 रोजी झालेल्या परिक्षेसाठी पाच उमेदवार मधून कोणत्या तीन उमेदवारांची नियुक्ती ही जि.प.सामान्य प्रशासन अंतर्गत कोणत्या विभागात झाली आहे त्याची तपशिल माहिती देण्यात यावी असे नमुद केलेले दिसत असून माहिती प्रत्यक्ष व्यक्तीशः घेणार, दारिद्रय रेषेखालील आहे असे नमुद केले. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती परिचर या पदाकरीता अंतिम अशी यादी उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यापूर्वी एक यादी प्रसिध्द झाली होती ती यादी त्यांना ही दि. 30.9.2006 रोजी उपलब्ध करुन दिली नव्हती व म्हणून त्यांनी मुख्य माहिती आयुक्त मुंबई यांचेकडे द्वितीय अपील दाखल केले होते. परंतु त्यांनी प्रथम अपील दाखल केले नव्हते म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल करावे असे सांगितल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. परंतु सदरचे प्रथम अपील हे फेटाळण्यात आले आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1934/2007.**

श्री पुरुषोत्तम वामनराव सेवने
मु. बेले लेआउट, मोठे वडगाव,
ता. जि. यवतमाळ 445 001. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद (सा.प्र.) यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.7.2006 रोजी स्थानिक जिल्याचे आहे किंवा नाही 1) गोपाळ मधुकर ठाकरे 2) रवी श्रीराम परचाके 3) दत्ता वामन मिरासे हे स्थानिक जिल्हयाचे आहे का. तसेच त्याचे प्र. कमांक व नोंदणी करण्याचे दिनांक कळवा. त्याचबरोबर हया तीन उमेदवारांची संपूर्ण पत्त्याचे माहिती दयावी. तसेच त्यांची नोंदणी

## आ दे श

1) अपीलकर्ता यांच्या दि. 16.4.2007 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 30.8.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.569–572

असे त्यांनी निदर्शनास आणले. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी मागितलेली माहिती पेक्षा दुसरीच माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यांच्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता त्यामध्ये स्पष्टपणे विभागीय चौकशी प्रकरणातील अंतिम निर्णयाची प्रमाणित प्रत मिळणेबाबत त्यांनी माहिती मागितलेली दिसून येते. तरी सुध्दा त्यांनी आयोगापुढे चौकशी अहवालाची प्रत दाखवून सदर चौकशी अहवालाची प्रत त्यांना अपेक्षित होती असे आयोगापुढे सांगितले. सदरच्या चौकशी अहवालाची प्रत ही दि. 8.3.06 ची आहे व चौकशी अहवाल हा अंतिम निर्णय होत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व त्यामुळे अंतिम निर्णय मागितला असल्यामुळे अंतिम निर्णयाची प्रत त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. व याबाबतची जाणीव अपीलकर्ता यांच्या अपील मेमोवरुन निश्चितपणे दिसून येते. द्वितीय अपील मेमोमध्ये त्यांनी सदरचा आदेश रद्द करुन आपल्या स्तराव सर्व दस्तऐवज तपासणी करावी व आदेश रद्द करावे अशा प्रकारची विनंती आयोगापुढे केलेली आहे परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) प्रमाणे ''माहिती'' याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणात साहित्याच्या स्वरुपात उदा. दस्तऐवज, कागदपत्रे, टिपण्या, अभिलेख किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील जी माहिती उपलब्ध असेल त्याच्या छायांकित प्रति हा ''माहितीचा अधिकार'' या व्याख्येप्रमाणे उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांच्या विभागीय चौकशीच्या प्रकरणामध्ये निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये चौकशी करणे, निर्णय देवून आदेश रद्द करावे ही जी विनंती केलेली आहे ती राज्य माहिती आयोगाच्या अधिकार कक्षे बाहेर आहे त्यामुळे अपीलकर्ता यांची विनंती मान्य करता येत नाही व त्यांच्या दि. 16.4.2007 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती ही त्यांना उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

चौ. प्र. क्र. 43/एपीटी/5/03–04 हया केसच्या अंतिम निर्णयाची प्रमाणीत प्रत मिळणेबाबत. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 15.5.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी दि. 8.6.2007 रोजी आपण राज्य माहिती अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक अकोला यांचेकडे दि. 16.4.2007 अन्वये माहितीची मागणी केलेली होती. त्यानुसार त्यांचेकडील पत्र क्र. कक्ष–शिली2/माअ/195/07.08 दि. 2.6.2007 अन्वये माहिती आपणास पुरविण्यात आलेली आहे. तसेच उपवनसंरक्षक अकोला यांचे आदेश क्र. 126 दि. 25.5.2007 अन्वये आपणा विरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशीचा निर्णय देण्यात आला असल्यामुळे आपला अपील अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये अपीलकर्ता यांनी श्री अ.न.वैरागडे वनपाल विरुध्द विभागीय चौकशी प्रकरणा बाबत अंतिम दिलेला आदेश क्र. 890 दि. 30.5.2007 सुडभावनेमधून दिलेल्या आदेशाला स्थगिती मिळणेबाबत मी मा.अ.अ.नियमानुसार अंतिम आदेशाची मागणी केल्याने माझ्यावर सुडभावनेतून आधिकारी यांनी आदेश काढला. तसेच माहितीचे विषय व स्वरुप या मध्ये चौकशी अधिकारी जिल्हा अमरावती यांनी दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करुन शिस्त व अपील 1979 नियम क्र. 6 पोट कलम 2 लावून कठोर शिक्षा दिली ती मला मान्य नाही तो आदेश रद्य करण्याकरीता व आपल्या स्तरावर सर्व दस्तऐवज तपासनी करावेत व आदेश रद्य करावा लावलेले आरोप खोटे कि खरे अशा प्रकारची विनंती केलेली दिसून येते.

3. अपीलकर्ता यांना दि. 2.6.2007 रोजी संदर्भिय वरील अर्जाचे अनुषंगाने आवश्यक ती माहिती मा. उपवनसंरक्षक वनविभाग अकोला यांचे आदेश क्र. 126 दि. 25.5.2007 अन्वये आपणास पाठविण्यात आलेली आहे परत त्याची प्रत सोबत जोडण्यात येत आहे

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1926/2007.**

श्री अशोक नत्थुजी वैरागडे
मु. मज्जितपुरा, कारंजा लाड
पो.ता.कारंजा लाड जि. वाशिम ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पि. के. महाजन
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक वनविभाग अकोला
2) श्री जि. के. पवार
जन माहिती अधिकारी तथा
सहा. वनसंरक्षक वनविभाग अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.4.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक वनविभाग अकोला यांचेकडे सन 2006 सरकार विरुध्द अशोक वैरागडे वि.

नाही. मागितलेल्या माहितीमधून व्यापक जनहित आहे असे दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे व आयोगापुढे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो खुलासा दाखल केलेला आहे तो योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे फेटाळण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 30.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.564–568

सन 2006 मध्ये अतिवृष्टीमध्ये खरडून गेलेल्या क्षेत्राचे सर्वेक्षण व अंदाज पत्रके तयार करणे, रोहयो/राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत फळबाग लागवडक करणे, विविध विस्तार योजना इत्यादि कामे तातडीने करणे आवश्यक होते त्यामुळे अर्जदाराने मागविलेली विस्तृत स्वरुपाची माहिती (सलग 6 वर्षे) वेळेत देणे शक्य नसल्यामुळे ती फेटाळण्यात आली.

अर्जदाराने ठरावीक कालावधीची व ठरावीक योजनेची माहिती मागितली असती तर त्यांना ती वेळेत देणे शक्य झाले असते. या नंतरच्या मिळालेल्या कालावधीत अर्जदाराने मागवलेली माहिती गोळा करण्यात येवून ती तालुका कृषी अधिकारी कार्यालय बार्शिटाकळी येथे उपलब्ध आहे.

या मध्यंतरीच्या काळात अर्जदाराने कार्यालयाशी व्यक्तिशः अथवा टपालाद्वारे सदर माहितीच्या संदर्भात संपर्क साधलेला नाही त्यामुळे ती माहिती अर्जदाराला देता आलेली नाही. सदर अर्जदाराचा माहितीच्या अधिकारातील अर्ज फेटाळण्याचा कोणताही उद्येश नाही. विस्तृत स्वरुपाची माहिती व अपुरा कर्मचारी वर्ग यामुळे सदरचा अर्ज फेटाळलेला आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारची शास्ती अथवा दंड लादण्यात येवू नये ही विनंती.

3. माहिती अधिकारी तालुका कृषी अधिकारी कार्यालय बार्शिटाकळी यांनी दाखल केलेल्या खुलाशावरुन असे दिसून येते की मागितलेली पाच वर्षातील माहिती ही अतिशय व्यापक स्वरुपात आहे व ती मागतांना मोघम स्वरुपात मागितलेली आहे. निश्चित कोणत्या माहितीबद्यल अपीलकर्ता यांना माहिती अपेक्षित आहे ती अर्जामध्ये दिलेली नाही व त्यामुळे अशा प्रकारची माघम विस्तृत स्वरुपाची माहिती ही अधिनियमच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. अपीलकर्ता यांना माहिती मागण्याचा अधिकार निश्चित आहे परंतु माहिती मागतांना त्याबाबतचा सारासार विचार करुन माहिती मागणे असेही अपेक्षित आहे. निव्वळ अधिकार मिळाला म्हणून माहिती मागता येते हे अपेक्षित

मंडळ कृषी अधिकारी बार्शिटाकळी यांनी खुलासा दाखल केलेला दिसून येतो तो खालीलप्रमाणे –

अर्जदार श्री राजेंद्र दामोदर खंडारे मु. साहीत पो. राहीत ता. बार्शिटाकळी जि. अकोला यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये केलेला अर्ज तालुका कृषी अधिकारी बार्शिटाकळी यांचे कार्यालयास दि. 4.4.2007 रोजी प्राप्त झाला. सदरची माहिती मंडळ कृषी अधिकारी बार्शिटाकळी याचेंशी संबंधीत असल्याने तो दि. 5.4.2007 रोजी त्यांचेकडे देवून सदरची माहिती जन माहिती अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय बार्शिटाकळी यांचेकडे वेळेत उपलब्ध करुन देणे बाबत कळविले होते. त्यानुसार मंडळ कृषी अधिकारी बार्शिटाकळी यांनी त्यांचे पत्र क्र. 471 दि. 9.4.2007 अन्वये माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे तसेच मनुष्यबळ (कार्यालयीन कर्मचारी) नसल्यामुळे व आवश्यक तो निधी त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील प्र.क्र. 2 नियम 7 (9) नुसार अर्ज फेटाळने बाबत कळविले होते. त्यानुसार जन माहिती अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय बार्शिटाकळी यांनी पत्र जावक क्रमांक 1023 दि. 20.4.2007 अन्वये पंजीकृत डाकेने अर्जदारास कळविले होते व याबाबत समाधान न झाल्यास किंवा काही शंका असल्यास प्रथम अपील करण्यास अर्जदारस कळविले होते.

मंडळ कृषी अधिकारी बार्शिटाकळी यांचेकडे असलेल्या कार्यालयीन आस्थापनेवर आजपावेतो लिपीक, अनुरेखक ही पदे रिक्त आहेत. मंडळ कृषी अधिकारी यांचे अधिनस्त क्षेत्रीय कर्मचारी असून ते शेतक–याशी निगडीत 53 गावांमध्ये विविध योजनेची अंमलबजावणी करतात त्यापैकी आवश्यक ते क्षेत्रीय कर्मचा–यांची पदे सुध्दा रिक्त आहेत.

अल्पशः कर्मचा–यांच्या साहाय्याने ती कामे वेळेत पार पाडावी लागतात यामध्ये मा. पंतप्रधान पॅकेज, कापुस उत्पादक शेतक–यांना आर्थिक दिलासा म्हणून मदत वाटप

मंडळामध्ये कोणकोणते कामे मंजुर झाले. अर्धवट कामे पुर्ण झालेली कामे व लेबर मस्टर रजिस्टर प्रत अधिका–याच्या शे–यासहीत तिस दिवसाच्या आत देणे. माहिती सर्वसाधारण डाकेने उपलब्ध करुन देणे दारिद्रय रेषेखाली यादी क्र. 23 कार्ड जोडलेले आहे घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तालुका कृषी अधिकारी कार्यालय बार्शिटाकळी यांनी अपीलकर्ता यांना मंडळ कृषी अधिकारी बार्शिटाकळी यांचे पत्र क्र. 471/07 दि. 9.4.2007 नुसार त्यांनी मागितलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे व प्रमाणाबाहेर साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्यामुळे प्र.क्र.2 7 (9) अन्वये माहिती अधिकारातील अर्ज फेटाळण्यात आलेला आहे तरी याबाबत आपणास काही शंका असल्यास आपण अपील अर्ज दाखल करु शकता. सदरच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 8.5.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तालुका कृषी अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 11.6.2007 रोजी सुनावणीसाठी तारीख देण्यात आली होती परंतु अपीलकर्ता हजर राहिले नाहीत असे अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. सुनावणीच्या नोटिसचे पत्र छायांकित प्रत जोडलेली आहे. कार्यालयीन टिपणी प्रमाणे अपीलकर्ता हे सुनावणीस हजर राहिले नाहीत असे दिसून येते. आयोगाची नोटिस मिळाल्यानंतर अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी यांनी सहा. अधिक्षक यांना अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये व्याप्ती व खर्च काढण्यास सांगण्यात आलेला होता त्याप्रमाणे 2002 ते मार्च 2007 बार्शिटाकळी मंडळातील 415 गटांचे झालेल्या कामाचे मस्टर लेबर व बिलाच्या झेरॉक्स करीता अंदाजे रु. 15000/– पर्यंत खर्च अपेक्षीत असुन ही माहिती गठ्ठयामधून वेगवेगळी करण्याकरीता 12 ते 15 मनुष्य दिवस लागतील तसेच झेरॉक्स काढण्याकरीता तालुका कृषी अधिकारी बार्शिटाकळी हया कार्यालयाकडे आकस्मिक खर्चाकरीता एवढा निधी उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. तसेच

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1929/2007.**

श्री राजेंद्र दामोदर खंडारे
मु. साहीत पो. राहीत
ता. बार्शिटाकळी जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ए. जी. देशमुख
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी
बार्शिटाकळी जि. अकोला
2) जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी कार्यालय
बार्शिटाकळी जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.4.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी मंडळ कृषी अधिकारी कृषी विभाग आळंदा यांचेकडे सन 2002 ते 2007 मध्ये बार्शिटाकळी

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्या दि. 14.2.2007 च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांच्या दि. 14.2.2007 च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे किंवा हजर राहून कोणत्याही प्रकारचा खुला केला नसल्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या 20 प्रमाणे रु. 1000/– ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबतचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत आयोगाचे पुढे करावा अन्यथा शास्ती कायम होईल.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 29.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.559–563

म्हटलेले आहे. वास्तविक अन्यायापुरते मर्यादित कागदपत्रांची आवश्यकता असल्यास ती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे मागितली असल्यास वावगे नाही परंतु असंबध्द अशी कागदपत्र सार्वजनिक प्राधिकरणास अनेक अर्जांच्या माध्यमातून मागितली जातात त्या वेळेस त्या सार्वजनिक प्राधिकरणास वेठीस धरण्याची मानसिकता ही अर्जदाराची दिसून येते व त्यामुळे न्याय मिळण्यापेक्षा सदरच्या अर्जाची दखल न घेण्याकडे प्रवृत्ती वाढत जाते व असे अपीलकर्ता यांच्या बाबत झालेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी पूर्वी जे अर्ज केलेले दिसून येतात त्या अर्जाच्या संबंधात त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या संदर्भामध्ये खर्च भरण्याकरीता कळविण्यात आलेले दिसून येते व त्या संदर्भात सुध्दा त्यांनी खर्च भरलेले नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही असे पत्र जन माहिती अधिकारी श्री विजय मैदणकर यांचे दि. 19.3.2007 चे सादर झालेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयातून सुध्दा दि. 27.12.2007 रोजी सौ. शोभा पैठणकर प्राचार्या यांनी 11790 रु. भरणा करावे असे कळविलेले दिसून येते. व यावरुनच माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी हया अपीलकर्ता सुध्दा पाळत नाहीत असे दिसून येते. माहिती हवी असेल आणि त्याकरीता खर्च येणार असेल तर ते भरणे आवश्यक असते. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 14.2.2007 च्या अर्जात मागितलेल्या प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात व आयोगापुढे सुनावणीस हजर न झाल्यामुळे सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचा अवमान केला आहे असा निष्कर्ष आयोगास काढावा लागतो व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

माहिती मिळणेसाठी अर्ज सादर केलेला आहे व त्यानुसार कार्यालयाकडे जेवढी माहिी उपलब्ध होती ती सर्व माहिती त्यांना पुरविण्यात आली आहे.

तथापी सौ. चरखे यांना हवी असलेली माहिती मुक बधिर निवासी विद्यालय खामगाव तसेच श्रीराम एज्युकेशन सोसायटी खामगाव यांच्या संबंधी व त्यांच्या अखत्यारीतील असून त्यांनी माहिती अधिकारा अंतर्गत माहिती मिळावी म्हणून वेगवेगळया तारखांचे व वेगवेगळया विषयांचे एक दुस–याशी गुंतागुंतीचे व या कार्यालयाशी माहिती संबंधीत नसलेले एकूण 26 अर्ज व त्याबाबतचे अपिल या कार्यालयाकडे सादर केलेले आहे त्यामुळे या कार्यालयाची संभ्रमावस्था झाली असून माहिती पुरविण्याबाबत मानसिक तणाव निर्माण झाला असून कार्यक्षमतेवर परिमाम होत असल्याने इतर प्रकरणी कार्यालयाकडून विलब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बाबत आपणास अवगत करण्यात येत आहे. सौ.चरखे यांच्या माहिती अधिकार प्रकरणी अथवा मुक बधिर निवासी विद्यालय व श्रीराम एज्युकेशन सोसायटी यांच्या संबंधी भविष्यात निर्माण होणा–या संभाव्य अडचणी या कार्यालयास कोणत्याही कारवाईस ग्राहय करण्यात येवू नये. सदर प्रकरणी सौ.चरखे, शाळाा, संस्था मधील वाद असल्याने या कार्यालयास वेठीस धरण्यात येत असून वेळेचा अपव्यय व कार्यालयाची मानसिक छळवणूक होत असल्याने या बाबत सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येवून योग्य ते निर्देश निर्गमीत व्हावेत करीता सविनय कळविण्यात येत आहे व विनंतीपूर्वक सादर करण्यात येत आहे.

3. अपीलकर्ता यांच्या वर सदरच्या संस्थेकडून अन्याय झालेला आहे असे त्यांचे म्हणणे आहे व सदरची माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना न्यायालयामध्ये न्याय मिळू शकत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु अपीलकर्ता यांनी आतापर्यंत अनेक माहितीचे अर्ज त्यांनीच दाखल केलेल्या पत्रावरुन दिसून येते तसेय समाज कल्याण अधिकारी यांनी सुध्दा त्यांच्या कार्यालयामध्ये 26 अर्ज दाखल झाले आहे असेही खुलाशात

विद्यालय खामगाव यांचेकडे मागितलेली माहिती मुदतीत पुरविली नसल्याने त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी या कार्यालयाकडे दि. 10.4.2007 रोजी अपिल अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जाची दखल म्हणून अपीलीय अधिकारी यां कार्यालयाकडून प्राचार्य यांना विभागाचे पत्र क्र. 766 दि. 10.5.2007 नुसार माहिती पुरविण्याबाबत निर्देश दिलेले आहेत व याबाबत होणा–या विलंबास व परिणामाबाबत समज देण्यात आलेली आहे. तरी सुध्दा संबंधीत प्राचार्य यांनी जाणिवपूर्वक सौ. चरखे यांना माहिती पुरविण्यासाठी टाळाटाळ केली असल्याने सौ. चरखे यांच्या दि. 12.6.2007 च्या अर्जानुसार निदर्शनास येते. त्याबाबत पुनश्च विभागाकडून संबंधीत प्राचार्य यांना एक संधी म्हणून माहिती का पुरविण्यात आली नाही याचा खुलासा सादर करणे बाबत कळविले असून प्राधान्याने तात्काळ माहिती पुरविण्याची ताकीद उलट टपाली कार्यपूर्ती अहवाल सादर करणे बाबत कळविलेले आहे. तरी सुध्दा सबंधी प्राचार्याकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नसल्यामुळे पुन्हा या कार्यालयाचे पत्र क्र. 1377 दि. 26.10.2007 नुसार दि. 10.11.2007 रोजी विभागास सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीस दोन्ही पक्षकार हजर राहीले नाहीत. त्यामुळे याबाबतची पुढील सुनावणी दि. 10.12.2007 रोजी पुन्हा ठेवण्यात आली. सदर सुनावणीस सौ. चरखे अनुपस्थित असल्यामुळे पुन्हा सुनावणी पुढील तारीख देण्यात आली व दि. 18.12.2007 रोजी दुपारी 1 वाजता ठेवण्यात आली. सदर सुनावणीस मुक बधिर निवासी विद्यालयाचे श्री खेडकर, प्राचार्य सौ.पैठणकर व सौ. जया रमेश चरखे व श्री खरात अपंग विभाग, श्री नागापूरक समाज कल्याण अधिकारी समक्ष हजर होते. सुनावणीत मुक बधिर निवासी विद्यालया संबंधी माहिती/संबंधीत संस्थेसंबंधीची माहिती प्राचार्य यांनी संबंधीतास तिन दिवसाचे आंत पुरविण्यात यावी असा निर्णय देण्यात आला व कार्यवृत्तावर सर्वांच्या स्वाक्ष–या घेण्यात आल्या.

प्रार्थना – सौ. जया रमेश चरखे यांनी माहिती अधिकारा अंतर्गत या कार्यालयाकडे

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.2.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी मूक बधिर विद्यालय खामगाव यांचेकडे शाळा व्यवस्थापन समितीने सन 2006–07 मध्ये घेतलेल्या सभा बाबत सभासदांना दिलेल्या नोटिसच्या पोच पावत्याची झेरॉक्स प्रत व सभेचे संपूर्ण इतिवृत्ताची झेरॉक्स प्रत. 2) संस्था शाळेचे कर्मचारी 1) तुळशीराम सातव 2) किशोर देशमुख 3) संजय हिवराळे यांना कामावरुन कमी केल्याबाबतचे संपूर्ण दस्ताऐवजाच्या सत्यप्रती. माहिती रजिस्टर पोष्टाने घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 10. 4.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी समाज कल्याण अधिकारी (गट–अ) यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 18.5.2007 रोजी ''त्यांना हवी असलेली माहिती प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेली माहिती पुरविणेसाठी झेरॉक्स खर्च टपाल खर्च संबंधितास न कळविता अर्जासोबत आवश्यक शुल्काचा भरणा केला नसल्याच्या सबबीखाली माहिती पुरविणे शक्य नाही ही सबब संयुक्तिक नाही. सदरची बाब खेदजनक व गंभीर स्वरुपाची असून याद्वारे आपणास समज देण्यात येत आहे. तरी याबाबत तात्काळ दखल घेवून आवश्यक ती कार्यवाही करावी माहिती प्राप्तकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा असे कळविण्यात आलेले दिसून येते व सदरच्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असेही सांगितले की अपीलकर्ता यांनी अनेक अर्ज व अपीले दाखल केलेली आहेत. त्यांच्या अपीलामध्ये सुनावणी त्यांनी घेतलेली होती व सुनावणीस अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर होते परंतु त्यानंतरही त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्याकरीता खालीलप्रमाणे खुलासा सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दाखल केलेला आहे.

दिनांक 14.2.2007 नुसार सौ. जया रमेश चरखे यांनी मुक बधिर निवासी

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1925/2007.**

सौ. जया रमेश चरखे
जोशी नगर, घारपूरी नाक्याजवळ, खामगाव
ता. खामगाव जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एस. नागपूरकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी (गट–अ)
जिल्हा परिषद बुलढाणा
2) जन माहिती अधिकारी तथा
मूक बधिर विद्यालय खामगाव
दशहरा मैदान खामगाव 444 303
जि. बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. माहिती उपलब्ध करुन न दिल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील.

2) तक्रारकर्ता व तक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 29.8.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.557–559

किती ग्राहकास कोटेशन देण्यात आली व किती रुपयाचे देण्यात आलीत. 5) अर्जदारास जास्तीचे कोटेशन देण्यात आले का 6) दिले असल्यास रक्कम परत केली का 7) दुसरा ट्रान्सफॉर्मर केव्हा लावला केव्हा मंजुर झाला 8) विद्युत पुरवठा का करण्यात आला नाही. अपीलकर्ता यांनी अर्ज हा त्यांचे मयत वडील गोविंद यादव भावसार यांचे नावाने केला असून तर्फे सही केली आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. प्रथम अपील दाखल केलेले दिसून येत नाही. राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीची प्रत तक्रारदार यांनी माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दिल्यामुळे दि. 5.3.2007 रोजी तक्रारदार यांनी सहाय्यक अभियंता यांनी माहितीच्या अधिकारात मागितलेले पत्र या कार्यालयात उपलब्ध नाही ते कुठेतरी गहाळ झाले असावे तरी आपणास विनंती की आपणास आवश्यक असलेल्या माहितीचा अर्ज माहिती अधिकारी श्री एस. जी. चहारे कनिष्ठ अभियंता यांना तातडीने सादर करावा तसेच त्याची एक प्रत या कार्यालयास द्यावी आपणास आवश्यक असलेली माहिती या कार्यालया तर्फे उपलब्ध करुन देण्यात येईल. माहिती अधिकारी श्री चहारे 3 महिन्याचे सुटिनंतर हया कार्यालयास रुजू झालेले आहेत. तरी या संबंधानी आपण प्रत्यक्ष हया कार्यालयास संपर्क साधल्यास अधिक उपयुक्त होईल असे कळविलेले दिसून येते. तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन देणे हे महत्वाचे असल्यामुळे त्यांना दि. 30.8.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार ही मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारकर्ता यांची तक्रार ही मंजुर करण्यात येत असून तक्रारदार त्यांच्या दि. 30. 8.2006 च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांना

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार कमांक 181/2007.**

श्री रामकृष्ण गोविंद भावसार
मु.पो.सवड, ता. रिसोड
जि. वाशिम ..... **तक्रारकर्ता**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता
म. रा. विज वितरण कंपनी
उपविभाग रिसोड ता. रिसोड
जि. वाशिम ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 29.8.2008 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 6.3.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 18 (1) नुसार तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दिनांक 30.8.2006 रोजी सहाय्यक अभियंता माहिती अधिकारी म्हणून यांचेकडे 1) विद्युत पंपाचे विज पुरवठयास मार्च 99 मध्ये अर्ज सादर केला होता. अर्जाची झेरॉक्स देणे 2) कोटेशन किती रुपयाचे दिले होते. दिल्याची तारीख 3) कोटेशन देण्यापूर्वी त्या ट्रान्सफॉर्मवर किती ग्राहक होते 4) त्यानंतर केटेशन देण्यापूर्वी

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 29.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.551—554

दाखल केली. यावरुन जन माहिती अधिकारी यांची कार्यपध्दती ही संशयास्पद वाटते तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतलेली दिसत नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे ओ आहे की त्यांना पाच कागदपत्रे उपलब्ध करुन दिली व त्याकरीता 10 रु. भरुन घेतले होते व त्याही बाबतची कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेले नाहीत. अर्थात जन माहिती अधिकारी यांना जिल्हाधिकारी कार्यालय किंवा विभागीय आयुक्त कार्यालय या कार्यालयाच्या कामकाजाच्या कार्यपध्दतीप्रमाणेच ते काम करीत आहेत असे दिसून येते व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती ही अपुर्ण उपलब्ध करुन दिली हे अपीलकर्ता यांचे म्हणणे खरे असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलाची सुनावणी घेवून कारणमिमांसा देणारा दिलेला नसल्यामुळे त्यांना ताकीत देणे आवश्यक आहे व तशी त्यांच्या गोपनिय अहवालात नोंद घेणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून त्यांच्या दि. 19.10.2006 च्या अर्जामध्ये मागितलेली सर्व माहिती ही उपलब्ध करुन घेवून त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना अपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

1) पुसद शहरात किती स्वस्त धान्य दुकानदार ला.नं.धारक आहे व कोणत्या वार्डात त्यांचे नावासहीत तपशिलवार माहिती देणे. त्यांना सप्टें. 06 ऑक्टो. 06 या दोन महिन्याचा माल किती देण्यात आले. 1) बी पी एल 2) अंत्यादय 3) केशरी या योजने अंतर्गत किती क्विंटल माल दिले व त्यांनी पुर्ण माल वाटप केले त्या रजिस्टरची झेरॉक्स प्रत मिळणे.

2) पुसद तालुक्यातील ग्रामीण स्वस्त धान्य दुकानदार ला.न.धारक आहे. गावासहित नावासहीत तपशिलवार माहिती देणे

आवश्यक माहिती वर्णन – त्यांना सप्टें 06 ऑक्टो. 06 या दोन महिन्याचा माल किती देण्यात आले. 1) बी पी एल 2) अंत्यादय 3) केशरी 4) रोहयो 5) रॉ.का.धारक या योजनेअंतर्गत किती क्विंटल माल दिले. त्यांनी पूर्ण माल वाटप केलेल्या रजिस्टरची झेरॉक्स प्रत मिळणेबाबत. दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. मागीतलेल्या माहितीप्रमाणे अपुर्ण माहिती दिली. स्वस्त धान्य दुकानदार यांचे नावाची फक्त यादी दिली व यांनी किती क्विंटल माल उचल केले व वाटप केले त्या रजिस्टरची झेरॉक्स प्रत दिलेली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 22.1.2007 रोजी प्रथम अपील तहसिलदार यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली नाही व त्यामुळे द्वितीय अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी आज सुनावणीसाठी उपस्थित नाही तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून सुध्दा कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल झालेली नाहीत. खुलासा करतांना माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केलेला आहे की वरील माहितीपैकी उपलब्ध झालेली माहिती अर्जदारास तोंडी सुचनेद्वारा तथा लेखी पत्राद्वारे दि. 17.5.2007, 25.5.07 व 31.5.07 घेवून जाण्यास कळविले होते. परंतु सदरच्या पत्राची छायांकित प्रती आयोगापुढे दाखल केलेल्या नाहीत. माहिती उपलब्ध करुन दिली हे सिध्द करणे जन माहिती अधिकारी यांची जबाबदारी आहे ती सर्व कागदपत्रे न दाखल करता जी माहिती उपलब्ध करुन दिली ती कागदपत्रे

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1923/2007.**

श्री मजीदखान अब्दुलाखान

मु. पो. भोजला ता. पुसद जि. यवतमाळ ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

तहसिलदार पुसद जि. यवतमाळ

2) जन माहिती अधिकारी तथा

निरीक्षण अधिकारी

(अन्न व पुरविठा विभाग) तहसिल कार्यालय पुसद

ता. पुसद जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे पुरवठा निरीक्षक सुनावणीस हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.10.2006 रोजी निरीक्षण अधिकारी (पुरविठा विभाग) अन्न व पुरविठा विभाग तहसिल पुसद जि. यवतमाळ यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना त्यांच्या संदर्भात प्रकरणाच्या संदर्भात जी जी कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असतील त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

4. अपीलकर्ता यांनी 48 तासात माहिती उपलब्ध व्हावी अशी जी मागणी केलेली आहे त्या बाबत 48 तास असलेली तरतुद वरील प्रकरणात लागू होत नसल्यामुळे केलेले प्रथम अपील व द्वितीय अपील यांच्या संदर्भात कोणत्याही मुदती पाळणे आवश्यक नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. परंतु संबंधित प्रकरणातील कागदपत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना दि. 27.8.2008 रोजी जी माहिती तयार करुन उपलब्ध करुन दिली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या छायांकित प्रती हया अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात याव्या व त्याची पोच घेण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 29.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.547–550

तातडी आहे असे आढळुन येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी आयोगाची दिशाभूल करुन अधिनियमाच्या तरतुदीचा गैरवापर करण्याचा प्रयत्न केला आहे.

3. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की दि. 20.6.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी तालुका कृषी अधिकारी यांनी मंडळ कृषी अधिकारी पातूर यांना अपीलकर्ता यांच्या दि. 16.6.2008 च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मागितलेली आहे. सदर बाब आपल्या कार्यक्षेत्रात असल्याने संबंधीत कर्मचा–यांना तक्रारीनुसार कार्यवाही करुन केलेल्या कामाचा अहवाल करणेबाबत आपल्या स्तरावरुन तात्काळ कळविण्यात यावे. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ कळविण्यात यावा असे कळविलेले दिसून येते. वरील अर्जदाराचे अर्जावर माहिती घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे असे अर्जदारास तालुका कृषी अधिकारी पातूर कार्यालयामध्ये दि. 30.6.08, 29.7.08 व 30.7.08 रोजी प्रत्यक्ष भेटी दरम्यान अवगत करण्यात आले. संबंधीत क्षेत्रीय कर्मचा–याकडून दि. 29.8.08 रोजी प्राप्त माहितीनुसार मौजे पातूर बागायत क्षेत्र शेत सर्वे क्र. 61/4 व 61/10 जमिनीचे मूळ मालक (भोगवटदार) पैकी 2 व्यक्ती मौजे पातूर येथे वास्तव्यास नसून 3 व्यक्ती मयत आहेत त्यामुळे त्यांची कामाकरीता परवानगी घेता आली नाही. तसेच भोगवटदार श्री रामदास किसन राऊत यांनी दोनही शेत सर्वे नं. मध्ये जमीन वाटणीचा वाद असून प्रकरण न्यायालयीन प्रविष्ट असल्याने कोणतेही काम करण्यात येवू नये असे लेखी कळविलेले आहे. सदर माहिती अर्जदारास वरीलप्रमाणे अडचणीमुळे विहीत वेळेत देणे शक्य झाले नाही. संबंधीत कर्मचारीकडून दि. 27.8.08 रोजी माहिती प्राप्त झाले बरोबर अपीलकर्ता यांना देण्यात आले असे सांगितले व लेखी खुलासा सादर केलेला आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना माहिती तयार करुन दिलेली आहे परंतु ती बरोबर आहे किंवा चुक आहे हे त्यांना कागदपत्रे उपलबध करुन न दिल्यामुळे कळत नाही व त्यामुळे त्यांना त्या संदर्भातील जी कागदपत्रे असतील त्या बाबतच्या

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.6.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांचेकडे 1) दि. 16.6.2008 रोजी आपल्या कार्यालयात दिलेल्या तातडीच्या अर्जाप्रमाणे चौकशी व कार्यवाही बाबत संबंधीत सर्व कागदपत्राच्या प्रमाणित झेरॉक्स प्रति संपूर्ण माहितीसह शक्य तितक्या लावकर शीघ्रगतीने त्वरीत मिळणे जरुरीचे आहे.

2) तक्रार अर्ज हा तातडीचा तसेच लोकशाही मधील नागरीक शेतक–याच्या अधिकाराच्या स्वातंत्र्याला बाधा या संबंधीत असल्यामुळे वरील विषयांकित नियमानुसार शक्य तितक्या लवकर शीघ्र गतीने 30 दिवसाची वाट न बघता त्या अगोदर 48 घंटयाच्या आत वरील माहिती पुरविण्यात यावी ही विनंती. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने 48 तासाच्या आत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 30.6.2008 रोजी प्रथम अपील शासकीय अपीलीय अधिकारी तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांचे कार्यालयात प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्या अपीलाच्या संदर्भात सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे दि. 21.7.2008 रोजी द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलाची सुनावणी तातडीने शीघ्रगतीने लावावी असे अपीलकर्ता यांनी आयोगाकडे विनंती केली असता सदरचे अपील हे तातडीने सुनावणीस लावण्यात आले आहे. परंतु आज सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांनी ज्या तक्रार अर्जाविषयी माहिती मागितलेली होती परंतु तक्रार अर्जातील उत्तरवादी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते त्या मधून कोणत्याही प्रकारची तातडी सदरच्या प्रकरणात होती अपीलकर्ता यांच्या जिवीत किंवा स्वातंत्र्याचा त्यात प्रश्न उपस्थित झाला होता असे दिसून येत नाही. अपीलकर्ता व त्यांचे भाऊ यांचेमध्ये न्यायालयात सुध्दा वाद सुरु असल्यामुळे सदरच्या प्रकरणात कोणत्याही प्रकारची जिवीत व स्वातंत्र्याच्या दृष्टीने

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1452/2008.**

श्री दामोदर किसन राऊत

रा. पातूर पितांबरवाडी

ता. पातूर जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. के. कु–हेकर

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

तालुका कृषी अधिकारी

तालुका कृषी अधिकारी कार्यालय शीलीफार्म

ता. पातूर जि. अकोला

2) श्री एम. डी. जंजाळ

जन माहिती अधिकारी तथा

मंडळ कृषी अधिकारी

तालुका कृषी अधिकारी कार्यालय शीलीफार्म

ता. पातूर जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.7.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. परंतु तक्रारदार यांनी दि. 20.8.2008 रोजी सर्व माहिती प्राप्त झाली पूर्णपणे समाधान झाले. तरी दाखल केलेले अपीलावर कोणतीही कार्यवाही न करता सदर अपील खारीज करण्याबाबत विनंतीपुर्वक अर्ज करीत आहे असे तक्रारदार यांनी लेखी दिलेले असून गट विकास अधिकारी यांनी सुध्दा संबंधित तक्रारकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आलेली आहे त्यानुसार संबंधित तक्रारकर्ता यांनी आयोगाचे कार्यालयाकडे लेखी अर्ज माहिती मिळाल्याबद्यल व अपील खारीज करण्याबद्यल निवेदन सादर केले आहे. त्यांनी माहिती न मिळाल्याबाबत यापुढे आक्षेप घेतल्यास याची जबाबदारी मी स्विकारेन असे लेखी दिलेले असल्यामुळे तसेच सचिव ग्रा.पं. राहेरी बु. यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली आहे आक्षेप घेतल्यास जबाबदारी स्विकारेन असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

नागपूर

दिनांक 28.8.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.547–548

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार कमांक 180/2007.**

श्री बापुराव दौलत गवई
मु.पो. राहेरी बु.
ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा ..... **तक्रारकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद बुलढाणा
2) जन माहिती अधिकारी तथा
अ) श्री एम. आर. खान
गट विकास अधिकारी
पंचायत समिती सिंदखेड राजा जि. बुलढाणा
ब) श्री ए. बी. तौर
सचिव, ग्रा.पं. राहेरी बु.
ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 28.8.2008 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 1.3.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 18 (1) नुसार तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार विनाअनुमती गैरहजर आहे.

माहिती अधिकारी यांनी प्रक्रिया संपली असल्यामुळे यु.पी.सी.ने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली होती परंतु ती त्यांना मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे पुन्हा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे त्यांनी सांगितले. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 14.5.2007 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देण्यात यावी व पोच घेण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर — ( विलास पाटील )

दि. 18.8.2008 — राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.541—544

3. अपीलकर्ता यांनी दि. 14.5.2007 च्या अर्जात मागितलेली माहिती ही वैद्यकीय प्रकरणा संबंधी आहे. व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या उत्तरामध्ये ज्या विभागीय चौकशीचा उल्लेख केलेला आहे त्या विभागीय चौकशीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांना विचारले असता मागितलेली माहिती ही विभागीय चौकशीच्या संदर्भातच आहे व त्यामुळेच अधिनियमाच्या कलम 8 (1) (क) नुसार उपलब्ध करुन देता येणार नाही व चौकशीचे प्रकरण पूर्ण झाल्यावर उपलब्ध करुन देणे शक्य होईल असे कळविलेले दिसून येते. विभागीय चौकशीचा विषय हा अपीलकर्ता हे प्रदीर्घ रजेवर असल्यामुळेच व मेडीकल बोर्डाच्या संदर्भामध्येच माहिती उपलब्ध करुन देण्यास नकार दिला त्याकरीता अधिनियमाच्या कलम 8 (1) (ज) मध्ये अपराध्याचा तपास करणे या संदर्भामध्ये जी प्रक्रिया सुरु असते त्या प्रक्रियेतील कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यास अपवाद केला आहे व त्यामुळे चौकशी सुरु असेपर्यंत कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यास नकार देण्यात आलेला आहे तो योग्य आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता हे गैरहजर आहे या कारणास्तव जे अपील खारीज केलेले आहे ते योग्य नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी हया प्रामुख्याने माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता आहे. माहिती ही अर्जदार यांनी मागितल्यावर ती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करुन देण्याची जबाबदारी कलम 19 व 20 प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आहे व त्यामुळे अपीलकर्ता हजर आहे किंवा नाही ही बाब गौण ठरते. अपीलकर्ता यांना काहीही सिध्द करावयाचे नसते व त्यामुळे यापुढे अपीलकर्ता गैरहजर असले तरी त्या कारणास्तव अपील निकाली काढणे हे गैर असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे तपासणे व त्यामुळे कारणमिमांसा असणारा निर्णय देणे हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कर्तव्य आहे याची नोंद घेण्यात येईल अशी अपेक्षा आहे. जर विभागीय चौकशीची प्रक्रिया पूर्ण झाली असल्यास अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याबाबत जन

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.5.2007 रोजी राज्य माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता व संचालक पाटबंधारे संशोधव व विकास संचालनालय पुणे यांचेकडे अ) अधिक्षक अभियंता पाटबंधारे संशोधव व विकास संचालनालय पुणे यांनी वैद्यकीय मंडळ, मेडीकल बोर्ड यवतमाळ यांना पाठविलेले पत्र क्र. 1701 दि. 13 एप्रिल 2007 ची प्रत.

ब) अधिक्षक अभियंता पाटबंधारे संशोधव व विकास संचालनालय पुणे यांनी महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, मंत्रालय मुंबई 32 यांना पाठविलेले पत्र क्र. पांसविसं/आस्था–4/373/1470/07 दि. 30.3.2007 ची प्रत. माहितीचा कालावधी सन 2005 ते 2007 व माहिती टपालाद्वारे हवी असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 2.6.2007 रोजी माहिती अधिकारी तथा मृद सर्वेक्षण अधिकारी यांनी ''आपल्या विरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी शासनाकडून अंतिम निर्णय प्रतिक्षाधीन असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 9 (1) (क) नुसार आपण मागितलेल्या पत्रााच्या प्रती विभागीय चौकशीचे प्रकरण पूर्ण झाल्यावर किंवा समाप्त झााल्यावर उपलब्ध करुन देणे शक्य होईल'' असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 9.6.2007 रोजी सचिव (लक्षवेध श्री सु. लो.अंबीलपूरे कक्ष अधिकारी) जल संपदा विभाग मंत्रालय यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 20.6.2007 रोजी कक्ष अधिकारी सु. रा.जोशी यांनी आपले अपील अधिक्षक अभियंता व संचालक पाटबंधारे संशोधव व विकास संचालनालय पुणे यांचे कार्यालयातील अपीलीय प्राधिकारी यांचेकडे करणे नियमानुसार आवश्यक आहे. सदर प्रकरणात अपीलीय अधिकारी सचिव जलसंपदा विभाग नाहीत. सबब आपला अर्ज अधिक्षक अभियंता पाटबंधारे संशोधव व विकास संचालनालय पुणे यांचेकडे पाठविण्यात येत आहे. प्रथम अपीलाचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 18.7.2007 रोजी दिलेला असून अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे अपील निकाली काढलेले आहे असे दिसून येते. तत्पूर्वीच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1915/2007.**

श्री अनील शामराव उपलेंचवार
श्री स्वामी समर्थ निवास, मु.पो.ता.घाटंजी 445301
जि. यवतमाळ ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता व संचालक
पाटबंधारे संशोधव व विकास संचालनालय पुणे
8, मोलोदिना मार्ग पुणे 411 001
2) जन माहिती अधिकारी तथा
मृद सर्वेक्षण अधिकारी
पाटबंधारे संशोधव व विकास संचालनालय पुणे
8, मोलोदिना मार्ग पुणे 411 001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

परंतु माहिती उपलब्ध झाली पूर्ण व सविस्तर मिळाली कोणतीही तक्रार राहिली नाही असे अपीलकर्ता यांनी लेखी दिलेले असल्यामुळे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी यांनी सुध्दा आयोगापुढे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व त्यांच्या कार्यालया बाबत काहीही तक्रार राहिलेली नसल्यामुळे अपील खारीज करावे व तक्रार मिटल्यामुळे व त्यांनी स्वतः अपील खारीज करण्याबाबत निवेदन दिलेले असल्यामुळे सुनावणीस हजर राहण्यापासून सुट मिळावी व सदरचे प्रकरण खारीज करण्यात यावे अशी विनंती केलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

नागपूर
दि. 27.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.539–540

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1913/2007.**

श्री धोंडु गोवा चव्हाण
मु. पो. डोंगरखंडाळा
ता. जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी मोताळा
ता. मोताळा जि. बुलढाणा

2) जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी कार्यालय मोताळा
ता. मोताळा जि. बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 27.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे.

गैरहजर आहे उत्तरवादी हजर आहेत. परंतु अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 27.2.2007 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली सर्व माहिती निर्णय आदेश सविस्तर मिळाले आहेत. मिळालेल्या माहितीवर पुर्ण समाधान आहे त्यामुळे अपील मागे घेत आहे असे लेखी दि. 5.8.2008 (22.8.2008 कार्यालयात प्राप्त) रोजी कळविलेले असल्यामुळे व जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे सांगितल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

नागपूर
दि. 27.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.537–538

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1910/2007.**

श्री वासुदेव सदाशिव तेलगोटे
मु. कौलखेड पो. गांधीनगर
ता. जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा सामान्य रुग्णालय अकोला
ता. जि. अकोला

2) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा सामान्य रुग्णालय अकोला
ता. जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 27.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी ती व्यक्तीशः उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 27.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.533–536

नाही म्हणून दि. 4.7.2007 रोजी अपीलकर्ता यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे पुन्हा एक प्रथम अपील दाखल केलले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्याच दिवशी पुन्हा दि. 4.7.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे सुध्दा द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी दि. 24.11.2006 रोजीच्या दाखल केलेल्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अर्ज त्यांना प्राप्त झालेला नाही. परंतु मुळ अर्जाची छायांकित प्रत प्राप्त झालेली असून त्यावर सही नाही व कोर्ट फी स्टॅम्प चे सुध्दा छायांकित प्रत नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही. अपीलकर्ता यांनी मात्र यु.पी.सी.ने अर्ज पाठविला असे आयोगाचे निदर्शनास आणलेले आहे. परंतु त्यासही कोर्ट फी स्टॅम्प नाही. अपीलकर्ता यांनी अर्जामध्ये माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे स्वतः ते व्यक्तिशः माहिती घेण्यास आलेले नाहीत असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले अन्यथा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली असती असे त्यांचे म्हणणे आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा प्रथम अपील हे सचिव यांना प्राप्त झाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्याबाबत मात्र अपीलकर्ता यांनी कशाप्रकारे प्रथम अपील दाखल केले याबाबतचा पुरावा दाखल केलेला नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्ता यांचा अर्ज अधिनियमच्या तरतुदीप्रमाणे मिळाला असता तर त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली असती. ती माहिती आज तयार आहे व अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 24.11.2006 रोजी राज्य जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे वेतन व वेतनातुन कपाती बाबत 1 सप्टेंबर 06 ते 6 जानेवारी 06 या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. यु. बी. वाघोदे शिक्षण निर्देशक यांचे 1 सप्टेंबर 02 ते 30 जून 05 या कालावधीतील वेतन किती अदा केले व त्यातुन बिनपगारी किती कपात करण्यात आली ?

2. 1 जुलै 05 ते 6 जानेवारी 06 या कालावधीतील वेतन अदा करण्यात आले काय? केले असल्यास कपात करण्यात आली आहे काय? कपात केली असेल तर त्याची पुर्वसुचना किंवा नोटिसेस देण्यात आल्या आहेत काय? असल्यास त्याच्या सत्यप्रती देण्यात याव्यात.

3. प्रभार हस्तांतरण 12.5.06 रोजी केल्यानंतर संस्थेने सिक्युरीटी डिपॉझीट किती दिवसात परत करावयास पाहीजे? परत केली नसल्यास त्याची कारणे काय? 9.6.06 ला कार्यमुक्तीचे प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दिल्यानंतर आपण कार्यमुक्त प्रमाणपत्र दिलेले नसल्याचे कारण काय?

4. 1 सप्टेंबर 02 ते 30 जून 05 पर्यंत वेतन असा करतेवेळी काही बिनपगारी करण्यात आलेल्या रकमा कपात करण्याची आवश्यकता या कालावधीत आवश्यक होती किंवा नाही? 1 जुलै 05 ते 6 जानेवारी 06 या कालावधीतीत न्यायालयाने सदर पदास स्थगीती दिली नसती तर कपात ही कशाचे आधारे केली असती?

5. सेवेतुन कमी केल्यानंतर कार्यमुक्तीचा अहवाल व अनामत रक्कम किती दिवसांत परत करावयास पाहिजे?

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 2.2.2007 रोजी सचिव, नवजिवन सोसायटी अमरावती प्रथम अपील दाखल केलले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झाला

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1909/2007.**

श्री उत्तम बुधाजी वाघोदे
रा. कोथळी पा. कोथळी
ता. मोताळा जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री उ. ना. जिचकार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सचिव, नवजिवन सोसायटी अमरावती
दिपशिखा गुरुकुल सैनिक शाळा चिखलदरा जि. अमरावती
2) श्री राजेश धर्माधिकारी
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक
दिपशिखा गुरुकुल सैनिक शाळा चिखलदरा
जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 27.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

होता. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला आहे. सदरच्या निर्णयाच्या संदर्भामध्ये त्रयस्थ पक्ष म्हणून अनिल मोतीरामजी कुळमेथे यांनी प्रादेशिक व्यवस्थापक दक्षिण चंद्रपूर प्रदेश चंद्रपूर यांचेकडे झालेल्या निर्णयाबद्यल ती माहिती मागितलेली दिसून येते. व सदरच्या निर्णयाची माहिती उपलब्ध झाल्यावर त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमाच्या कलम 19 (4) प्रमाणे अपील दाखल करुन सदरची माहिती ही त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे दाखल झालेल्या अपीलाचा निर्णय लागेपर्यंत माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचे दि. 10.7.2008 च्या आदेशाप्रमाणे माहिती पुरविण्यास स्थगिती देण्यात यावी अशा प्रकारची विनंती आयोगाकडे केलेली आहे. राज्य माहिती आयोगाकडे प्रलंबित असलेली अपीले ही क्रमशः सुनावणीसाठी घेतली जातात व त्यामुळे अर्जदार अपीलकर्ता यांनी दाखल केलेले अपील हे सुनावणीस घेण्यास विलंब होण्याची शक्यता आहे. व त्यामुळेच अर्जदार यांनी अशी विनंती केली आहे की त्यांच्या अपीलाच्या सुनावणीच्या पर्यंत स्थगिती मिळावी. सदरच्या अर्जाच्या सुनावणीस मुळ अर्जदार श्री हेमंत माणेकलाल छाजेड यांना सुध्दा नोटिस काढलेली होती ते आज हजर नाहीत व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दि. 10.7.2008 च्या निर्णयास अर्जदाराचे मुळ अपील आयोगापुढे सुनावणीस येईपर्यंत त्यांच्या अर्जातील विनंती क्र. 1 प्रमाणे स्थगिती देण्यात येत आहे.

2. सदरच्या निर्णयाची एक प्रत जन माहिती अधिकारी प्रादेशिक व्यवस्थापक दक्षिण चंद्रपूर प्रदेश चंद्रपूर, व्यवस्थापकीय संचालक फॉरेसट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र ली. व मुळ अर्जदार यांचेकडे पोस्टाने पाठविण्यात यावी.

नागपूर  
दि. 26.8.2008

( विलास पाटील )  
राज्य माहिती आयुक्त,  
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.531–532

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील.**

**किरकोळ अर्ज कमांक 05/2008.**

1) श्री अनिल मोतीरामजी कुळमेथे ..... **अर्जदार (त्रयस्थपक्ष)**
नवनिर्माणनगर, ताडोबा रोड,
तुकुम, चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर

2) जन माहिती अधिकारी तथा ..... **(मूळ अर्जदार)**
प्रादेशिक व्यवस्थापक दक्षिण चंद्रपूर

3) श्री हेमंत माणेकलाल छाजेड
6, महावीर सोसायटी, मोहाडी रोड,
जळगांव (महाराष्ट्र) – 425 001. ..... **गैर अर्जदार**

**( आदेश पारित दिनांक 26.8.2008 )**

**स्थगिती आदेश**

अर्जदार श्री अनिल मोतीरामजी कुळमेथे यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक फॉरेसट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र ली. यांचे अपील क्र. 1659 मध्ये दिनांक 10.7.2008 रोजी दिलेल्या निर्णयास स्थगिती देण्याची विनंती आयोगाकडे केलेली आहे. मुळ अर्जदार श्री हेमंत माणेकलाल छाजेड यांनी माहिती अधिकारी प्रादेशिक व्यवस्थापक दक्षिण चंद्रपूर प्रदेश चंद्रपूर यांचेकडे दि. 22.4.2008 रोजी सन 2005–2006 ते 2007–2008 या कालावधीत प्रादेशिक व्यवस्थापक दक्षिण चंद्रपूर प्रदेश चंद्रपूर यांनी विविध पदाकरीता केलेली नोकर भरतीची माहिती मागितलेली होती. सदरची माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असून त्यांचे पूर्व संमतीशिवाय पुरवता येणार नाही असा निर्णय जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक यांनी दिला

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 1905/2007 यात माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपील क्रमांक 1906/2007 मध्ये माहिती उपलब्ध झालेली असली तरी सुध्दा अपीलकर्ता यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमेची परिगणणा करुन व्याजाच्या संदर्भामध्ये संपुर्ण माहिती ही व्याजाच्या संदर्भात असलेल्या शासन निर्णयाच्या छायांकित प्रतीसह उपलब्ध करुन देण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 26.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.526–530

करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील पुन्हा अधिक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (शिक्षण विभाग) यांचेकडे दाखल करुन त्यांच्या वर्गीकरणाच्या परिगनणेच्या संदर्भामध्ये चुक आहे असे दाखवून माहिती मागितलेली दिसून येते व त्याप्रमाणे त्यांना दि. 8.2.2007 रोजी चार मुद्याच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

4. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी जन माहिती अधिकारी यांना ज्या स्लिप मागितलेल्या होत्या ती माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु वर्गीकरणाच्या परिगनणेमध्ये तसेच व्याजाची परिगनणा करुन दिलेली नाही त्याबाबत अधिक्षक वेतन पथक यांचे असे म्हणणे आहे की अकोला जिल्हयाचे विभाजन झाल्या नंतर अपीलकर्ता यांची परिगनणाची रक्कम रु. 5110 ही 97–98 अखेर पर्यंत व्याजासह होती परंतु 98–99 अखेर पर्यंत व्याज दर्शविलेला नसुन स्थानांतर करण्यात आलेली होती. त्यावर शिक्षणाधिकारी वाशिम यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांची रक्कम रु. 5110 + 300 = 5410 ही वाशिम कार्यालयात जमा आहे. अपीलकर्ता यांची सेवा समाप्त झालेली आहे त्यामुळे पुढील 6 महिन्यात व्याजाची परिगणणा करुन अपीलकर्ता यांना सदरची संपूर्ण रक्कम हवी असल्यास त्यांना स्वतंत्रपणे अर्ज करावा लागेल व सर्व रक्कम उपलब्ध करुन घेंता येईल. व्याजाच्या संदर्भातील शासन निर्णयाचे जे परिपत्रक आहे त्याची छायांकित प्रत ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात येईल त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

कळविण्यात आले आहे व त्याची प्रत अपीलीय अधिकारी अध्यक्ष/सचिव यांना व अपीलकर्त्यास देण्यात आली. सदरची माहिती आदेशानुसार 8 दिवसात उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी मान्य केले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

3. अपील क्रमांक 1906/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 2.12.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुध्याध्यापक यांचेकडे माझे सेवेअंतर्गत भविष्य निर्वाह निधी खाते क्र. अेकेएल 8054 मध्ये जमा असलेले 96–97 – 97–98 – 98–99 ची रक्कम स्लिप देण्यात यावी. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि. 22.12.2006 रोजी अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी पुन्हा दि. 2.1.2007 रोजी अधिक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (शिक्षण विभाग) जि. प. अकोला खालीलप्रमाणे 1) माझे सेवे अंतर्गत आपले कार्यालय मार्फत भविष्य निर्वाह निधी खाते क्र. अेकेएल 8054 खाते उघडून त्यात 96–97 – 97–98 – 98–99 दरमहा दोनशे रुपये पासुन तीनशे रुपये पर्यंत कपात करण्यात आली आहे. तेव्हा आपले वित्तीय लेखा पथम 97–98 असे पर्यंत व्याजासह 5110/– पाच हजार एकश दहा दर्शविलेली असून 98–99 अखेर पर्यंत व्याज दर्शविलेला नाही. याची माहिती द्यावी व तसे आज दिनांक पर्यंत संपुर्ण रक्कम मला व्याज किती याची माहिती द्यावी. 2) वाशिम जिल्हा वेगळे झाल्यावर आपले पत्र क्रच 26 दि. 13.1.2004 बुक लेट नं. 2 पेज नं. 71 अ.क्र. नुसार अेकेएल 8054 खात्यात 1151/– वाशिम भ.नि.नि.पथकला रवाना केले आहे. या संदर्भात सुध्दा माहिती देण्यात यावी. या दोन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. व त्याप्रमाणे दि. 11.1.2007 रोजी अधिक्षक वेतन पथक यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांनी मुख्याध्यापक यांना पत्र दिलेले होते व त्या पत्रा प्रमाणे पुन्हा त्यांना दि. 23.1.2007 रोजी माहिती उपलब्ध

( आदेश पारित दिनांक 26.8.2008 )

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्रमांक 1905/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 29.1.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे उर्दु हायस्कुल येथील शिक्षकेतर कर्मचारी 1) इब्राहिमखॉ आझमखॉ (प्र.शा.प्र.) 2) दाउदखॉ आजमखॉ (क. लिपीक) 3) अ. वहीद अ. वशिद (सेवक) यांना आपले मान्यता पत्र क्र. जिप–शिक्षण, माध्य. जि.प.अकोला दि. 6.7.91–401/91– च्या आदेशावरुन आपणाकडे मुख्याध्यापक व संस्थेकडून आलेल्या प्रस्तावाची जाहिरातीसह नकल देण्यात यावी अशी माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 20.2.2000 रोजी अपीलकर्ता यांना शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी मुख्याध्यापक यांना पाठविलेल्या पत्राची प्रत पाठविलेली दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी मा. शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग अमरावती यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी संस्थेचे अध्यक्ष सचिव असून सदर अपील त्यांना प्राप्त न झाल्याने निर्णय देण्यात आला नाही तथापी राज्य माहिती आयोग यांचे दि. 9.7.2007 चे पत्रान्वये अपीलकर्ते व जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचे दि. 22.8.2008 ला सुनावणी देण्यात आली व सदरची माहिती अपीलकर्त्यास या कार्यालयाचे पत्र दि. 22.8.2008 अन्वये सात दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिकारी मुख्याध्यापक यांना

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1905/2007 व अपील कमांक 1906/2007.**

1) <u>अपील कमांक 1905/2007</u>

श्री दाऊदखॅ आजमखॉ

मु. पो. आसेगाव

ता. मंगरुळपीर जि. वाशीम ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (माध्य.)

जिल्हा परिषद वाशिम

2) श्री जे. एस. नाईक

जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी

शिक्षण विभाग, जिल्हा परिषद वाशिम ..... **उत्तरवादी**

**2) <u>अपील कमांक 1906/2007</u>**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

सचिव उर्दु एज्युकेशन सोसा. आसेगाव

मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दू हायस्कूल आसेगाव

ता. मंगरुळपीर जि. वाशीम

2) जन माहिती अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (माध्य.)

जिल्हा परिषद अकोला ..... **उत्तरवादी**

4

करुन लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये भरणा करावा.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 26.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.522–525

नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या पत्राप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या आदेशाचे पालन झाले नाही याकरीता कोणत्याही प्रकारची प्रशासकीय कार्यवाही केलेली दिसून येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा सचिव यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे दोषी आढळून येतात अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे शास्तीस पात्र आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 23.1.2007 च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत मागितलेली माहिती छायांकित प्रतिच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता अर्जदार यांना विहित मुदतीत तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी हे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे दोषी आढळून येत आहे अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 500/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्तीची वसूली अपीलकर्ता यांच्या दरमहाच्या वेतनातून गट विकास अधिकारी यांनी वसुली

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.1.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सचिव गट ग्रामपंचायत यांचेकडे संपूर्ण ग्रामीण योजना याच्यातून आलेला निधी कोणत्या कामावर खर्च करण्यात आला कोणती कामे पूर्ण किंवा अपूर्ण 11 व्या वित्त आयोगातून आलेला निधी कोणत्या कामावर खर्च करण्यात आला व ती कामे कोणती. 12 व्या वित्त आयोगातून आलेला निधी कोणत्या कामावर खर्च करण्यात आला कोणती कामे पूर्ण व अपूर्ण यशवंत ग्राम समृध्दी मधील निधी कोणत्या कामावर खर्च करण्यात आला. वार्षिक फंडातून केलेली कामे पूर्ण किती व अपूर्ण किती. हरीयालीची समीती कोणत्या आधारावर घेण्यात आली समितीत कोणती नावे घेतली ति किती व ठराव क्र. किती. सदरची माहिती नियमाप्रमाणे शुल्क भरण्यास तयार आहे. तसेच माहिती व्यक्तिशः घेणार असेही नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 23.3.2007 रोजी अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांचे म्हणणे प्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सुध्दा त्यांनी अपील दाखल केले होते. परंतु माहिती प्राप्त न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही त्याबाबत जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार आहे परंतु त्यांना माहितीच्या अर्जाच्या संदर्भातून त्रास दिल्या जातो म्हणून माहिती उपलब्ध करुन दिली नाही. परंतु अपीलकर्ता अर्जदाराच्या अर्जात माहितीचे शुल्क भरण्यास तयार आहे असे नमूद केलेले असतांना त्यांना शुल्क भरण्यास कळविले असते तर त्यांनी शुल्क भरल्यानंतरच माहिती उपलब्ध करुन द्यावयाची होती. परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी केलेली दिसून येत नाही. त्रास होतो म्हणून माहिती उपलब्ध करुन द्यावयाची नाही ही भावना अधिनियमाच्या तरतुदीशी विसंगत आहे. उलट माहिती उपलब्ध करुन दिली असती तर त्रास होण्याचे काहीही कारण

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1902/2007.**

श्री गोपाळ रामचंद्र रोकडे
मु. लावखेड पो. तुलंगा बु.
ता. पातुर जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुनिल मेसरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी
पंचायत समिती पातुर
ता. पातुर जि. अकोला
2) श्री एम. पी. नंदनकर
जन माहिती अधिकारी तथा
सचिव गट ग्रामपंचायत कार्यालय तुलंगा खुर्द
ता. पातुर जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

नव्हते. त्यामुळे दि. 23.7.2007 रोजी अपीलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीसाठी उपस्थित राहण्याकरीता आयोगाचे कार्यालयातून दि. 20.6.2008 रोजी नोटिस काढण्यात आली होती. अपीलकर्ता कधीही हजर झाले नाहीत. मात्र जनरल मॅनेजर ॲन्ड अपेलेट ऑथॉरीटी श्री अे. डी. खोरगडे यांनी दिनांक 23.7.2008 रोजी राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात हजर राहू असे कळविलेले आहे. परंतु प्रशासकीय कारणास्तव दिनांक 23.7.2008 रोजी होणारी सुनावणी पुढे ढकलण्यात आली व त्याकरीता दि. 9.7.2008 रोजी नोटिस काढून दि. 25.8.2008 रोजी सकाळी 10.30 वाजता हजर राहावे असे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना कळविलेले आहे व आज दिवसभर 17.15 पर्यंत अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर राहिलेले नाहीत. यावरुन अपीलकर्ता व उत्तरवादी यांनी कार्यालयातील तीन वेळ नोटिसेस काढून सुध्दा ते हजर राहात नसल्यामुळे एकतर अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकता दिसत नाही किंवा त्यांना माहिती मिळाली असावी असा निष्कर्ष काढुन सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

नागपूर
दि. 25.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.520–521

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1807/2007.**

श्री विरेंद्रकुमार बैद
बैद निवास, भानापेठ वार्ड चंद्रपूर 442402 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
महाराष्ट्र स्मॉल स्केल इंडस्ट्रि डेव्हलपमेंट
कॉर्पोरेशन लिमीटेड, कृपनिधी वालचंद हिराचंद मार्ग,
बॅलार्ड इस्टेट मुंबई.

2) जन माहिती अधिकारी तथा
महाराष्ट्र स्मॉल स्केल इंडस्ट्रि डेव्हलपमेंट
कॉर्पोरेशन लिमीटेड, कृपनिधी वालचंद हिराचंद मार्ग,
बॅलार्ड इस्टेट मुंबई. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी संदर्भामध्ये दि. 3.6.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडून नोटिस काढून दि. 19.6.2008 रोजी कागदपत्रे दाखल करण्याकरीता तारीख दिलेली होती. परंतु अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत व सदरच्या तारखेवर सुध्दा हजर राहिलेले

शास्तीची वसूली शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यवतमाळ यांनी करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये भरणा करावा.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 25.8.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.515–519

माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यास अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र असतात. तसेच अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता ज्यांचे सहाय्य घेतले असेल असे अधिकारी सुध्दा जन माहिती अधिकारी समजण्याची तरतूद आहे. सदरच्या प्रकरणामध्ये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनीसुध्दा मुख्याध्यापक यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचे आदेश दिलेले आहे परंतु तरी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व त्याला मुख्यत्वेकरुन संस्थेचे सचिव हे जबाबदार दिसून येतात. वास्तविक शिक्षणाधिकारी यांच्या आदेशाचे पालन केलेले नसल्यामुळे शिक्षणाधिकारी यांनी संस्थेच्या विरुध्द त्यांना असलेल्या अधिकाराप्रमाणे कारवाई करावयास पाहिजे होती परंतु ती सुध्दा केलेली दिसून येत नाही. व त्यामुळे सदरच्या जन माहिती अधिकारी व संस्थेच रु. 5000/— ची शास्ती करणे हे आवश्यक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 13.12.2006 च्या अर्जाप्रमाणे चार मुद्यांची माहिती छायांकित प्रतिच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.
2) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी तसेच संबंधित संस्थेचे सचिव ज्यांचा उल्लेख दि. 21.12.2006 चे पत्रात आहे व आज सुनावणीस हजर आहेत त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 5000/— शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या

देवून संस्थेचे अध्यक्ष सचिवाना अपीलीय अधिकारी नियुक्त केले आहे असे कळविलेले दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. सदरच्या अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भामध्ये मुख्याध्यापक यानी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

मी केळापूर शिक्षण संस्थेद्वारा संचालित के. ई. एस. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहे. शाळेतील नमणुका, पदोन्नती, पदावनती इत्यादी बाबीचा निर्णय घेण्याचे अधिकार संस्थेच्या कार्यकारी मडळाला आहेत. त्या संबंधातील सर्व माहिती संस्थेच्या संमतीविना देता येत नाही. श्री वा.क.शेन्द्रे हे शाळे मध्ये सहा. शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम कलम 10 (12) (फ) मधील तरतूदीनुसार एखाद्या व्यक्तीच्या सेवा अभिलेखाशी संबंधीत असलेली माहिती देता येणार नाही अशी तरतूद आहे. दि. 13.12.2006 रोजी सहा. शिक्षक श्री शेंद्रे यांनी दिलेल्या अर्जानुसार दि. 2.1.2007 रोजी त्यांना सुचना दिलेली आहे. त्यांच्या पदोन्नतीबाबत श्री शेंद्रे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार विदर्भ माध्यमिक शिक्षक संघटनेच्या माध्यमातून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यवतमाळ यांचे समक्ष दि.14.7.06 रोजी सुनावणी घेण्यात आली परंतु संस्थेच्या सचिवांनी त्या सुनावणी दरम्यान दिलेल्या पत्रामुळे श्री शेंद्रे यांची पदोन्नती प्रलंबीत ठेवण्यात आली.

या दरम्यान मा.शिक्षण सहसंचालक पुणे यांनी दि. 24.8.2007 पासून शाळेवर प्रशासकाची नियुक्ती केलेली असल्यामुळे शाळेतील पर्यवेक्षकाचे पद भरण्याचा अधिकार प्रशासकांना आहे. प्रशासकांनी हयासंबंधी निर्णय घेवून पर्यवेक्षकाच्या पदावर योग्य व्यक्तीची निवड करणे जरुरीचे आहे. वरील प्रकरण प्रशासकाचे अधिन असल्यामुळे अपिल खारीज करण्यात यावे ही विनंती. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे हे अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे बंधनकारक आहे व

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.12.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक के. ई. एस. हायस्कूल, पांढरकवडा यांचेकडे 1) शाळा संच मान्यता प्रती सन 2004 ते 07 पर्यंत 2) शिक्षकांची सेवाजेष्ठता यादी 3) पदोन्नती न देण्याबाबतचा संस्थेने मा. शिक्षणाधिका–यांना पाठविलेल्या ठरावाची प्रत 4) नवीन शिक्षक भरती करतांना वरीष्ठ अधिका–यांसोबत संस्थेने केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती (एकुण शालेय तासिका व कामकाज अवगत होण्यासाठी) ची माहिती सेवाजेष्ठता सिध्द करणे, संस्थेने केलेल्या अन्यायाचा तपशिल मिळविणे, प्रकरणाच्या निपटा–याचा मार्ग पडताळून पाहणे. माहिती व्यक्तिशः आवश्यक आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 21.12.2006 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना ''वरील चारही मुद्यावर मी संस्थेशी (संस्थेचे सचिव श्री न. रा. सातुरवार यांचेशी) चर्चा केलेली आहे. संस्थेने माझे कडील संबंधित कागदपत्रे आपणाकडे मागवून घेतली आहेत व श्री वासुदेव कवडुजी शेंद्रे सरांना संस्थेशी संबंधित कागदपत्रे मागण्यासंबंधी सुचना द्याव्यात असे सांगितले आहे. तेव्हा आपण संस्थेशी संपर्क करुन चारही मुद्याशी संबंधीत कागदपत्रे प्राप्त करुन घ्यावीत. मी देवू शकत नाही'' असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दि. 6.1.2007 रोजी अपीलकर्ता यांनी पुन्हा मुख्याध्यापक के. ई. एस. हायस्कूल, यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देणेसाठी आक्षेप अर्ज केलेला दिसून येतो व दि.16.1.2007 रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यवतमाळ यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. पुन्हा दिनांक 17.1.2007 रोजी संस्थेचे अध्यक्ष यांचेकडे अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी दिनांक 28.3.2007 रोजी अर्जदारास आवश्यक असलेली माहिती हे पत्र मिळताच 7 दिवसाचे आंत पुरविण्याची कार्यवाही करावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा अन्यथा आपण दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहाल. याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल असे मुख्याध्यापक यांना कळविलेले दिसत असून पत्राची प्रतिलिपी अर्जदाराना

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1899/2007.**

श्री वासुदेव कवडुजी शेंद्रे
'दिपस्तंभ' आखाडा वार्ड, पांढरकवडा
जि. यवतमाळ ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष, केळापूर शिक्षण संस्था, पांढरकवडा
मेन रोड, पांढरकवडा जि. यवतमाळ 445 302
2) श्री किसन बोदिले
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक
के. ई. एस. हायस्कूल, पांढरकवडा
जि. यवतमाळ 445 302 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

8

बहुतांश विवरणाबद्यल सुध्दा आयोगास महितीच्या अधिकारात विचारले जातात. प्रथम अपीलीय अधिकारी यांना नोटिस काढावयाचा असा उद्येश आहे की त्यांच्या कार्यालयातील प्रथम अपीलाच्या संदर्भातील कागदपत्रे आयोगाच्या पुढे संबंधित अपीलाच्या सुनावणीकरीता उपलब्ध व्हावे आणि तशा प्रकारची नोटिस जर काढली नाही तर वर नमुद केल्याप्रमाणे प्रथम अपील झाले आहे किंवा नाही, निर्णय दिला आहे किंवा नाही हे आयोगास अवगत होत नाही किंवा प्रथम अपीलीय अधिकारीनी कागदपत्रे दाखल करावे असे सुरुवातीसच नोटिसीत घेतले होते व प्रथम अपीलीय अधिकारी कार्यालयातून आयोगास कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद मिळाला नाही असा अनुभव होता व त्यामुळे नोटीसीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उपस्थित व्हावे असे नमूद करावे लागले असून त्यामुळे तरी कागदपत्रे उपलब्ध होतात. याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांचे शंका निरसन होईल अशी अपेक्षा आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 11.10.2006 च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 25.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

हे शासनाने केलेल्या कार्यपध्दती नियमाप्रमाणे निर्णय व्हावा अशी तरतुद आहे. केंद्रिय अधिनियम दि. 12.10.2005 रोजी अंमलात आला व केंद्र शासनाने दि. 28.10.2005 रोजी अधिनियमाच्या कलम 27 प्रमाणे केंदिय माहिती आयोगाच्या करीता अपील कार्यपध्दतीचे नियम केलेले आहेत. महाराष्ट्र शासनाने सदरचे नियम करावयास पाहिजे होते. राज्य माहिती आयोगाकडून नियमाचा मसुदा पाठविल्यावर सुध्दा आजपर्यंत राज्य शासनाने नियम केलेले नाहीत. न्यायपालिकेमध्ये अर्ज किंवा दावा करतांना तो प्रत्यक्ष स्विकारला जातो व त्यात आवश्यक कागदपत्रे आवश्यक असल्याशिवाय दाखल करुन घेत नाहीत.

आयोगाचे कामकाज हे अर्धन्यायिक आहे तरी सुध्दा आयोगाकडे पोस्टानी तक्रारी/अपीले दाखल करण्याची कार्यपध्दती अधिनियमात नसतांना सुरु आहे. व त्यामुळे अपीलकर्ता हे द्वितीय अपील मेमोसोबत सर्वच कागदपत्रे दाखल करतातच असे नाही. बहुतांश अपीलकर्ता हे त्यांच्या सोयीची कागदपत्रे दाखल करतात किंवा एक अपील मेमो तेवढे दाखल करतात व त्यामुळे अपील मेमोबरोबर जर नोटिसेस काढावयाची असेल तर कोणत्या अर्जाच्या संदर्भामध्ये हे अपील आहे कोणत्या प्रथम अपीलाच्या निर्यायाविरुध्द ते अपील आहे याबद्यलची माहिती ती संबंधित जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांना अवगत होत नाही कारण 90 टक्के अपीलकर्ता यांचे अनेक अर्ज हे प्रत्येक माहिती अधिका–याकडे व अनेक प्रथम अपीले ही अपीलीय अधिका–याकडे त्यांनी पुर्वी केलेली असतात व त्यामुळे पुन्हा अपीलकर्ता यांचा अपील मेमो त्यांना पोस्टानी परत पाठवावा लागतो व त्यात कमीत कमी प्रपत्र अ व प्रपत्र ब हे दाखल करा म्हणून त्यांना कळवावे लागते. त्यावर अपीलकर्ता पुन्हा ही सर्व कागदपत्रे पाठवितातच असे नाही किंवा आयोगाला माहितीच्या अधिकारात विचारतात की अशा प्रकारची माहिती कोणत्या नियमाप्रमाणे मागितली. नोटिसमध्ये व शासनानी नियम केलेले नसल्यामुळे आयोगास नोटिस तयार करावी लागली आहे. त्या नोटिसीत आयोगास काय आवश्यक आहे याबद्यलचे विविरण केलेले आहे. त्यातील

उपलब्ध करुन देता येते. व ती ज्या माहिती अधिका–याकडे असेल त्याच माहिती अधिका–यास तशे आदेश देता येतात. कारण अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे माहिती 30 दिवसात उपलब्ध करुन दिली किंवा नाही ही सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना आतापर्यंत जी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते त्यावरुन त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यांच्या प्रकरणातील कारवाई करीता त्यांना योग्य त्या सक्षम प्राधिकरणाकडे तक्रार करुन ( माहितीचा अधिकार अधिनियम 2005 वगळून) न्याय मिळवून घेणे संयुक्तिक राहिल. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

4. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या नोटिसीप्रमाणे उपस्थित रहण्याच्या संदर्भामध्ये आयोगाचे असे निदर्शनास आणले आहे की '''The Authority sitting in Judgement can not be examined or cross examined'' या न्याविक तत्वानुसार प्रथम अपील प्राधिका–यांना माहिती आयोगापुढे सुनावणीसाठी बोलविणे न्यायोचित होईल काय, याबाबत कायदेशीर तपासणी व्हावी अशी नम्र विनंती आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसचिव यांची धारणा ही बरोबर आहे. अपीलीय अधिकारी हे काणत्याही न्यायिक अर्धन्यायिक दाव्यामध्ये पक्षकार नसतात तर निर्णय देणारे अधिकारी असतात व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांना सुनावणीसाठी बोलाविणे न्यायोचित नाही हे ही तेवढेच खरे आहे. परंतु राज्य माहिती आयोगाचे कामकाज हे अशा पध्दतीने सुरु झालेले आहे की त्या पध्दतीप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांना हजर राहण्यासाठी नोटिस ही काढावीच लागते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 27 (1) (ङ) प्रमाणे शासनाने अपील कार्यपध्दतीचे नियम करावे अशी तरतुद आहे. अधिनियमाच्या कलम 19 (10) मध्ये सुध्दा अपील निर्णय

त्यातूनच अपीलकर्ता यांनी सर्व शासकीय यंत्रणा कारवाई करीत नाही अशी त्यांची धारणा झालेली दिसते. अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यांनी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून जन माहिती अधिका–याचे अभिप्राय विचारलेले दिसतात व त्या अर्जात त्यांची कारवाईची मागणी व कारवाई का केली जात नाही याची कारणे अशी मागणी आहे. जन माहिती अधिकारी हा सार्वजनिक प्राधिकरणातील त्या त्या स्तरावरील उपलब्ध असलेल्या माहितीचा परिरक्षक असतो. त्या प्रकरणातील तो निर्णय प्रक्रियेतील अधिकारी असेलच असे नाही व त्यामुळे अधिनियमाचे तरतुदीनुसार निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात गुणतत्तेबाबत जन माहिती अधिका–याचे अभिप्राय अधिनियमाचे तरतुदीनुसार अपेक्षित नाहीत. तसेच एखाद्या प्रकरणात कारवाई करण्याचे आदेश देण्याचे सुध्दा अपेक्षित नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) प्रमाणे ''माहिती'' व (ञ) प्रमाणे ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेच्या व्याख्या दिलेल्या आहेत. 'माहिती' याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेख, दस्तऐवज, कागदपत्रे, टिपण्या इत्यादी स्वरुपात माहिती उपलब्ध असेल त्यांच्या छायांकित प्रति उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार आहे. जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती अधिनियमाच्या कलम 5 प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाने करावयाची असते. त्याप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या ज्या स्तरावर माहिती उपलब्ध असेल त्या त्या स्तरावर माहिती अधिकारी यांची नियुक्ती करावयाची तरतुद ही कलम 7 (1) प्रमाणे माहिती जरी 30 दिवसामध्ये उपलब्ध करुन द्यावयाची असल्यामुळे त्या त्या स्तरावरीत माहिती अधिकारी यांचेकडेच माहिती मिळणेसाठी अर्ज केल्यास ती 30 दिवसामध्ये उपलब्ध होवू शकेल अन्यथा विलंब हा साहाजिकच आहे. व त्यामुळेच दि. 16.10.2006 चा अर्जास तात्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य आहे. माहिती उपलब्ध करुन देणे हा प्रमुख उद्येश जरी अधिनियमाचा असला तरी वर नमुद केल्याप्रमाणे माहिती या व्याख्येप्रमाणेच माहिती मागितलेली असेल तर ती

अधिकारी तथा मुख्यसचिव यांचे कार्यालयात प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 12.4.2007 रोजी देण्यात आला असून निर्णयाने व्यथित झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 11.10.2006 च्या अर्जाच्या प्रमाणे दि. 16.10.2006 रोजी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने अर्जातील विषयाशी संबंधित माहिती अधिका—याकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. सबब आपण विषयाशी संबंधित माहिती अधिका—याकडे (अवर सचिव तथा राज्य जन माहिती अधिकारी नगर विकास विभाग मंत्रालय) आपला अर्ज सादर करावा. तसेच मा. राज्यपाल महोदयाचे कार्यालयाकडून प्राप्त संदर्भ दि. 22.2.2006 नुसार सचिव नगर विकास विभाग यांना अग्रेषित करण्यात आला. माहिती अधिकार कायदा 2005 च्या कलम 6 (3) मधील तरतूदीनुसार हा अर्ज पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी प्रधान सचिव (1) नगरविकास विभाग यांना अग्रेषित करण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु सदरच्या अर्जाची छायांकित प्रत अपीलकर्ता यांना अपील मेमो बरोबर दाखल केलेली नाही. अपीलकर्ता यांच्या अर्जातील मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांना सार्वजनिक प्राधिकरणामध्ये उपलब्ध असलेल्या माहिती पेक्षा शासनाने कारवाई कां केली नाही याबद्यलचे मुद्ये उपस्थित केलेले दिसून येतात. कोणत्याही प्रकारची कागदपत्रे, अभिलेख किंवा दस्तऐवजाच्या माध्यमातून माहिती अपीलकर्त्यांना अपेक्षित आहे असे दिसून येत नाही. व त्यामुळेच प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी शासन, नागपूर महानगर पालिका, नागपूर सुधार प्रन्यास नागपूर, म्हाडा व पोलीस यांचेकडे आतापर्यंत अनेक माहितीचे अर्ज केलेले आहेत. अपीलकर्ता यांचे एकच प्रकरण (1996 पासून) आहे त्यासंदर्भामध्ये अनेक जन माहिती अधिका—यांनी त्यांना अनेकवेळा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

3

6) नागपूर सुधार प्रन्यासने 572 लेआउटचे डेव्हलपसाठी जनतेकडून पैसा जमा केला. परंतु 5 वर्षे लोटून अजून नियमाने डेव्हलपमेंट नाही यावर उशिरी डेव्हलपमेंट बद्यल 18 टक्के व्याज घेतलेल्या रकमेवर द्यावे. डेव्हलपमेंट तात्काळ करुन प्रत्येकास त्याप्रमाणे कळवावे. यावर धोरण तसेच कार्यवाहीचा अहवाल द्यावा. जबाबदार अधिका–यावर कोणते आदेश दिले. याबद्यल स्पष्ट निर्देश द्यावे व कळवावे.

7) स्थानिक स्वराज्य संस्था अनधिकृत बेकायदेशीर बांधकामावर कर लादून त्यावर कार्यवाही करीत नाही. अनधिकृत तसेच बेकायदेशीर बांधकामावर नियमाने कार्यवाही करण्याची जबाबदारी शासकीय अधिका–याची असून असे व्यवहार होवू नये म्हणून दंडात्मक कारवाई करायला पाहिजे. परंतु नेते व अधिकारी यांच्यामुळे कार्यवाही होत नाही. त्यामुळे इतर नियमबध्द जनतेस ग्राहकास त्रास होतो. यावर शासन कोणते निर्देश व कारवाई करणार याबद्यल अहवाल द्यावा. तसेच बेकायदेशीर, अनियीमत जागेवर, प्लॉटवर शासन वार्षिक स्थानिक कर कसा लावतात याबद्यल नियमासहीत माहिती द्यावी. शासकीय कार्यालयास निर्देश व अहवाल द्यावा.

8) नगररचना नियमाप्रमाणे बांधकाम प्लॉट असेल तरच स्थानिक स्वराज्य संस्था वार्षिक कर आकारणी करु शकते. पण हे होत नाही. यावर शासनाने अहवाल व कायदा द्यावा जेणेकरुन ग्राहकास, धारकास हक्कल, न्याय मिळेल व तसे निर्देश द्यावे जेणेकरुन अनधिकृत बांधकाम, लेआउटवर निर्माण होणार नाही.

9) कराची पध्दत ही सोपी सरळ असावी. त्यावर उपकर किंवा करावर कर याबद्यल शासनाने कायदेशीर स्पष्टता द्यावी. वस्तुत एकाच वस्तुवर अनेक कार्यालयाचे कर बसविले जातात. शासन एक आहे. त्यामुळे कर शासनाने एकच घेवून त्याचे वर्गीकरण शासनाने करावे. पण हे होत नाही. त्यामुळे ग्राहक लुटल्या जातो. याबद्यल शासनाने कायदर विभागाची सल्ला घेवून स्पष्ट निर्देश द्यावे व कळवावे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 26.3.2007 रोजी प्रथम अपीलीय

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.10.2006 रोजी मुख्य सचिव यांचे कार्यालय मंत्रालय शासकीय माहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र राज्यातील कायदा/शासकीय अधिकारी यांच्याकडून अवहेलना, नुकसान भरपाई याबद्यल खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1) मा. राज्यपाल यांचे पत्र क्र. रास/ माहितीचा अधिकार/2006/स 10 दि. 27.4.2006 प्रमाणे मुख्य सचिव कार्यालय मुंबई 32 यांनी कोणती कारवाई केली अहवाल द्यावा. पत्राची झेरॉक्स जोडलेली आहे.

2) मा. राज्यपाल यांचे पत्र क्र. रास/ माहितीचा अधिकार/2006/स 10 दि. 10.2.2006 पत्र जोडलेले आहे. अहवाल कृती केल्याचा द्यावा सहपत्र 2.

3) नामपा:2304/प्र.क्र.184/न वि 26 नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई 32 दि. 25.7. 2006 प्रमाणे असून अहवाल मिळाला नाही. महाराष्ट्र सरकारने दप्तर दिरंगाई कायदर 2006 संमत केला. कायद्याप्रमाणे कृती नाही. कायदा कशासाठी असतो. दोषी अधिका–यावर कोणती कारवाई केली. नुकसान भरपाई देणे. कायद्याप्रमाणे कृतीचे आदेश ठेवून कारवाई पूर्तीचे पत्र देणे सहपत्र 3.

4) दि. 23 ऑगष्ट 2006 दै. नवराष्ट्र यातील प्रेसनोट याप्रमाणे अनधिकृत लेआउटवर कोणती कारवाई केली. रजिष्ट्री कशा केल्या जातात नगररचना मंत्रालय याबद्यल कायदेशिर कृती कां करित नाही. रजिस्ट्रार कोणत्या दस्तऐवजावर विक्रीपत्र करुन देतात शासनाने वरिल विभागावर कोणती कारवाई करणार. अशा प्रकारे गैरवयवहार पूर्ण महाराष्ट्रात आहे. आपण दोषी अधिका–यावर कोणती कारवाई करणार पूर्ण अहवाल द्यावा. शासनाने स्पष्टता द्यावी व स्पष्ट आदेश द्यावे जेणेकरुन जनतेची लुबाडणूक होणार नाही सहपत्र 4.

5) कायदा असून सरकारी अधिका–याकडून जर पालन होत नाही तर शासनाने कोणती कृती केली. शासनाचे धोरण द्यावे.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1809/2007.**

श्री विकास गणपतराव शेंडे
नागरी बॅंक कॉलनी, राष्ट्रभाषा प्रचार समितीचे मागे,
हिन्दनगर, वर्धा 442003. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसचिव
मुख्य सचिववांचे कार्यालय मंत्रालय मुंबई 32.
2) श्री सं. ध. तवरेज
जन माहिती अधिकारी तथा
अवर सचिव
मुख्य सचिववांचे कार्यालय मंत्रालय मुंबई 32. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. जन माहिती अधिकारी हजर आहेत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 23.3.2007 च्या अर्जाप्रमाणे विद्यमान नायब तहसिलदार तथा माहिती अधिकारी यांनी एस.डी.ओ. कार्यालयातील अपीलकर्ता यांनी मागीतलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. माहिती व्यक्तीशः घेवून जाईन असे लेखी दिलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी विद्यमान नायब तहसिलदार तथा माहिती अधिकारी यांचेकडून सदरची माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 22.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.503–506

3. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती एस.डी.ओ. कार्यालयातील असल्यामुळे नायब तहसिलदार तथा माहिती अधिकारी ही माहिती उपलब्ध करुन देवू शकत नसल्यामुळे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांना एस.डी.ओ. कार्यालयातील माहिती असल्यामुळे एस.डी.ओ. कार्यालयात माहितीचा अर्ज दाखल कां केला नाही असे विचारले असता त्यांनी असे सांगितले की ''एस.डी.ओ. कार्यालयात माहिती अधिका–याचा बोर्ड नाही त्यामुळे त्यांनी माहिती त्यांचेकडे मागितली नाही.'' वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 प्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये किंवा त्यांच्या प्रत्येक उपविभागामध्ये जन माहिती अधिकारी नियुक्त करावे अशी तरतुद आहे. कारण माहिती ही 30 दिवसात उपलब्ध करुन द्यावयाची असते व ती माहिती ज्या कार्यालयात आहे त्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांना माहिती मागीतल्यास ती 30 दिवसात उपलब्ध होवू शकते. कोणत्याही माहिती अधिका–यास माहिती मागून माहिती उपलब्ध होत नसेल तर त्याबद्यल माहिती अधिका–यास दोषी धरता येत नाही. त्यातही अपीलकर्ता यांना माहिती एस.डी.ओ. कार्यालयातील असल्याचे कळविण्यात आलेले होते व तरीही त्यांनी प्रथम अपील पुन्हा तहसिल कार्यालयातच दाखल केले त्यामुळे त्यांना आतापर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही. द्वितीय अपीलाच्या सुनावणीमध्ये सुध्दा माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास एस.डी.ओ. कार्यालयातील जन माहिती अधिकारी हे पक्षकार नसल्यामुळे तशा प्रकारचे आदेश एस.डी.ओ. कार्यालयास देता येणार नाही. मात्र अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध होणे हा उद्येश असल्यामुळे विद्यमान नायब तहसिलदार तथा माहिती अधिकारी यांनी एस.डी.ओ. कार्यालयातील सदरची माहिती उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.3.2007 रोजी माहिती अधिकारी म्हणून पी. बी. लहाने नायब तहसिलदार यांचेकडे एस.डी.ओ. कार्यालयातील देण्यात येणा–या निकालाबाबत (Order) माहिती–सद्या कार्यरत एस.डी.ओ.चा आजपर्यंतचा कार्यकाल. सदर्हु अधिका–याने आपल्या कार्यकाळात (निकालासाठी तारीख दिल्यानंतर) निकाल 2 महिने उलटल्यावर दिल्या गेला व त्याचे (उशीराचे) कारण दिले असल्यास त्या सर्व अर्जदार व गैरअर्जदारांचे नाव व पत्ते द्यावेत. तसेच ज्या अर्जदार व गैरअर्जदार यांना 2 महिन्याच्या आत निकाल (Order) दिले असतील त्यांचे नाव व पत्ते द्यावेत. माहिती व्यक्तिशः घेवून जाईन असे नमूद केले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दि. 26.3.2007 रोजी तहसिलदार अमरावती यांनी माहितीचे अधिकारा अंतर्गत प्राप्त आपण मागितलेली माहिती मा. उपविभागीय अधिकारी अमरावती यांचे कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे आपण त्यांचे कार्यालयाशी आपण मागितलेल्या माहिती बाबत संपर्क साधावा त्यांचेच कार्यालयात आपण अर्ज करावा. या कार्याल्यातून आपला अर्ज निकाली काढण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 10.3.2007 तरीख असलेले अपील मात्र दि. 10.4.2007 रोजी (कार्यालयात प्राप्त) प्रथम अपीलीय अधिकारी तहसिलदार यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 18.4.2007 रोजी ''आपण मागितलेली माहिती ही या कार्यालयाशी संबंधीत नाही. याबाबत आपणास यापूर्वीही कळविण्यात आले आहे. आपले माहिती बाबत आपण उपविभागीय अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी. या कार्याल्यातून आपला अर्ज निकाली काढण्यात आला आहे असे कळविलेले दिसून येते. उपरोक्त उत्तरामुळे सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान झालेले नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1816/2007.**

श्री मुकुंद हरिभाऊ पंडीत

पंडीत निवास, अंबापेठ, अमरावती ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री राठोड

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

तहसिलदार

तहसिल कार्यालय अमरावती

2) श्री बक्षी

जन माहिती अधिकारी तथा

नायब तहसिलदार

तहसिल कार्यालय अमरावती

अमरावती कॅम्प अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

**आ दे श**

1) तक्रारकर्ता यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

नागपूर

दिनांक 22.8.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.499–502

आहे. याशिवाय कलम 4 (1)(ब)(9) नुसार जाहीर केलेला अधिकार व कर्मचारी यांची नावे व त्यांचे मासिक वेतन याबाबतचा तक्ताही सोबत जोडला आहे. त्यात संचालकाच्या नावापुढे पद रिक्त असा स्पष्ट उल्लेख आहे आणि ही माहिती एप्रिल 2006 ची आहे. यावरुन संचालनालयाने कलम 4 नुसार घोषित केलेली माहिती वर्षभरात एकदाही अद्ययावत केलेली नाही हे सिध्द होते. यासाठी जबाबदार अधिका–याविरुध्द कारवाई करावी आणि वर्षभरापूर्वी जाहीर केलेली माहिती ताबडतोब अद्ययावत करण्याचे आदेश द्यावे अशी विनंती आहे.

ई–गव्हर्नन्सची जबाबदारी असलेल्या संचालनालयाकडून अशा चुका अपेक्षित नाहीत. तरीही अशा चुका होत असल्याने महाराष्ट्र सरकारचया अखत्यारीतील अनेक संकेतस्थळे एकदा सुरु केल्यानंतर पुन्हा केव्हाच अद्ययावत झाली नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे ही बाब अतिशय गंभीरतेने घ्यावी अशी विनंती आहे. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी ''संकेतस्थळावरील माहितीचे अद्यावतीकरण करणे ही सतत चालणारे (Continuous Process) प्रक्रीया असल्याने दररोज अद्ययावत न करता काही काही अंतराने केली जाते. श्री पेमदास रेकाजी राठोड यांना आढळलेल्या त्रुटी दुरुस्त करण्यात आल्या आहेत. या संचालनालयाच्या माहितीच्या अधिकाराखालील 17 बाबींची अद्ययावत माहिती शासनाच्या (www.internet.maharashtra.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिली आहे. या अद्ययावत माहितीची एक प्रत आपल्या माहितीसाठी सोबत जोडण्यात आली आहे असा खुलासा केलेला आहे व सोबत त्या माहितीच्या प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहे. त्यावरुन तक्रारदाराला अपेक्षित असलेली सर्व माहिती ही अद्ययावत करुन संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितल्यामुळे सदरची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

गैरतक्रारदार हजर आहेत. सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दिनांक 29.3.2007 रोजी खालीलप्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे.

1) सामान्य प्रशासन विभागांतर्गत माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने माहितीचा अधिकार कायदा 2005 मधील कलम 4 नुसार स्वतःहून घोषित केलेली 17 मुद्यांवरील माहितीपैकी काही भाग युकीचा व जनतेची दिशाभूल करणारा आहे. कलम 4 (1)(ब) आणि कलम 4 (1)(ब)(15) या दोन मुद्यावर माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने दिलेल्या माहितीची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. त्यात नमूद संचालनालयाचे www.internet.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ प्रत्यक्षात अस्तित्वातच नाही. या संकेतस्थळावर जाण्याचा प्रयत्न केल्यास अशा नावाचे संकेतस्थळ अस्तित्वातच नसल्याचे सांगितले जाते. याविषयी गुगल सर्च एंजिनने दिलेल्या रिपोर्टची प्रतही सोबत देत आहे. या बाबीची खात्री मा. राज्य माहिती आयुक्तही इंटरनेटवर करुन घेवू शकतात. हा प्रकार जनतेची दिशाभूल करणारा आणि संकेतस्थळाचे खरे नाव लपवून माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे संकेतस्थळ पाहण्यापासून जनतेला वंचित करणारा आहे. कृपया दोषी अधिका–यावर कठोर कारवाई करुन उपरोक्त चुकीची माहिती ताबडतोब दुरुस्त करण्याचे निर्देश देण्यात यावे.

2) माहितीचा अधिकार कायदा 2005 मधील कलम 4 नुसार घोषित करावयाची 17 मुद्यांवरील माहिती वेळोवेळी अद्ययावत करणे बंधनकारक आहे. तरीही संचालनालयाने दिनांक 26 एप्रिल 2006 रोजी तयार केलेली माहिती 11 महिन्यानंतरही अद्ययावत केलेली नाही. याचा पुरावा म्हणून काल दि. 28 मार्च 2007 रोजी इंटरनेटवरुन डाऊनलोड केलेली संचालनालयाच्या पीडीएफ फाईलची माहिती देणारी प्रत सोबत देत

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 164/2007.**

श्री प्रेमदास रेकाजी राठोड
बी–8, लिबर्टी एनक्लेव्ह, जे.पी.नगर रोड
मालवियानगर, खामला नागपूर 25 ..... **तक्रारकर्ता**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
संचालक
महिती तंत्रज्ञान संचालनालय,
नवीन प्रशासकीय इमारत 19 वा मजलला,
मंत्रालयासमोर मुंबई 400 032. ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 22.8.2008 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 29.3.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीनुसार तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार विनाअनुमती गैरहजर आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 8.11.2006 च्या अर्जातील तीन मुद्याच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (ज) मधील 'माहितीचा अधिकार' या संज्ञेतील (एक) प्रमाणे अभिलेख्याची किंवा कागदपत्राची तपासणी करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

2) अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांना वेळ व तारीख कळविण्यात यावी व त्या तारखेस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या संबंधीत असलेली नस्ती ही निरीक्षणा करीता उपलब्ध करुन द्यावी व त्यातील जी कागदपत्रे अपीलकर्ता यांना आवश्यक असतील त्यांच्या छायांकित प्रति विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या. अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध असल्यास पोच द्यावी. तपासणीची पोच द्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 21.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.495–498

त्यांना त्यांच्या दि. 8.11.2006 च्या अर्जाप्रमाणे मुद्या क्र. 4 सोडून तीन मुद्याच्या संदर्भात माहिती उपलब्ध झाली नाही. मुद्या क्र. 1 मध्ये माझे नियुक्तिचे आदेशपत्र हजेरीपट मी मी सेवा दिलेल्या संपूर्ण कालावधीचा. माझ्या संपूर्ण सेवे दरम्यान पगार पत्रकावर घेतलेल्या सहयाच्या पुस्तकी प्रत. माझी सेवा पुस्तीकेची नक्कल या मुद्याच्या संदर्भामध्ये हजेरीपट हा त्यांच्या सेवा काळातील मागितलेली आहे. तसेच नियुक्तीचे आदेश पत्र उपलब्ध करुन दिलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांच्या खुलाशाप्रमाणे त्यांची सही असलेली नियुक्ती पत्र त्यांना हवे आहे असे त्यांचे म्हणणे आहे. पगार पत्रकावर सहयाच्या संदर्भामध्ये पगार पुस्तिकेच्या संदर्भामध्ये पगार पुस्तिका कोणत्या कालावधीतील पाहिजे असे कळविलेले आहे परंतु अर्थातच अर्जदार यांच्या सेवाकाळातीलच पगार पुस्तिका त्यांना अपेक्षित दिसून येते. वर्ग 10 वरुन कमी करुन 5,6,7 या वर्गावर शिकविण्यास दिलेल्या आदेशाची प्रत दिल्याबाबत जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की तसे आदेश दिलेले नव्हते. तसेच को–या स्टॅम्पवर सहया घेवून कोणतेही प्रतिज्ञा पत्र तयार केलेले नाही अर्थात त्याकरीता अपीलकर्ता यांनी कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे उत्तरवादीचे म्हणणे ग्राहय धरावे लागते व तसेच पदमान्यता शिक्षणाधिका–यांनी रद्य केल्याबाबतचे पत्र अथवा तत्सम आदेश याबाबत शिक्षणाधिकारी यांनी कळविलेले असले तरी आदेशाची प्रत ही संस्थेमध्ये उपलब्ध असल्यास त्याबाबतची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जावून त्यांच्या संबंधातील नस्तीचे निरीक्षण घेवून आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.11.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय ब्राम्ही यांचेकडे खालीलप्रमाणे 4 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

1) माझे नियुक्तिचे आदेशपत्र हजेरीपट मी मी सेवा दिलेल्या संपूर्ण कालावधीचा. माझ्या संपूर्ण सेवे दरम्यान पगार पत्रकावर घेतलेल्या सहयाच्या पुस्तकी प्रत. माझी सेवा पुस्तीकेची नक्कल.

2) वर्ग 10 वरुन कमी करुन 5,6,7 या वर्गावर शिकविण्यास दिलेल्या आदेशाची तसेच माझे को–या स्टॅम्पवर सहया घेवून तयार केलेल्या प्रतिज्ञा पत्राची प्रत.

3) माझी पदमान्यता शिक्षणाधिका–यांनी रद्य केल्याबाबतचे पत्र अथवा तत्सम आदेश.

4) मुख्याध्यापक व संस्थेचे सर्व पदाधिका–यांची नावे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 27.11.2006 रोजी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांच्या मुद्याच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 12.2.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय ब्राम्ही यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक 27.2.2007 रोजी देण्यात आलेला असून माहितीच्या अधिकाराचे कायद्याच्या तरतुदी या संस्थेस शासनाची कुठलीही भरघोस मदत नसल्याने लागू होत नाही त्यामुळे या कायद्याचे कलम 2 (ज) नुसार ही संस्था सार्वजनिक प्राधिकारण या व्याख्येत बसत नाही. आपला माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर मुख्याध्यापकांनी आपणास विहीत मुदतीत माहिती दिल्याची शहानीशा मी केलेली आहे असे अपीलकर्ता यांना यु. पी. सी. ने दिनांक 27.2.2007 रोजी कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की सदरचा निर्णय त्यांना उपलब्ध झालेला नाही व त्यामुळेच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1891/2007.**

श्री डॅनीएल शामराव डोंगरदिवे

मु. पो. जामठी बु. ता. मुर्तिजापूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

अध्यक्ष, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय ब्राम्ही

ता. मुर्तिजापूर जि. अकोला

2) श्री देशमुख

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय ब्राम्ही

ता. मुर्तिजापूर जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.12.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांचे तर्फे ॲड. राजेंद्र पांडे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी सुध्दा हजर आहेत. कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

हजर राहिले नाहीत. यावरुन त्यांना माहिती उपलब्ध झाली आहे असे गृहित धरुन तसेच नियमाप्रमाणे अर्ज व अपील नसल्याने अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांच्या दि. 6.3.2007 च्या साध्या अर्जाप्रमाणे दि. 3.4.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अर्ज व अपील ही नियमाप्रमाणे नसल्याने सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 21.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.491–494

अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे आहे असे नमुद केले असले तरी सदरच्या अर्जास कोर्ट फी स्टॅम्प लावलेला नाही. तसेच नमुन्यामध्ये सुध्दा अर्ज नाही. तरी सुध्दा अपीलकर्ता यांना दि. 3.4.2007 रोजी यु.पी.सी. द्वारे माहिती देण्यात आली असे जन माहिती अधिकारी अपीलीय अधिकारी यांनी खुलासा दाखल केला आहे व त्याकरीता यु. पी.सी. पोस्टाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही.

4. अपीलकर्ता यांच्या राज्य माहिती आयोगाकडील अपील मेमोमध्ये उपनिबंधक व सहा. निबंधक यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे असे म्हटलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदींचे कोणतेही पालन केलेले दिसून येत नाही. सार्वजनिक प्राधिकरणास ज्याप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी लागू आहेत तशाच त्या अर्जदार अपीलकर्ता यांना सुध्दा लागू आहेत. व अर्जदारानी सुध्दा माहिती मागण्यासाठीचा अर्ज हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 व महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम 2005 च्या तरतुदीप्रमाणेच दाखल करणे आवश्यक आहे. वास्तविक अपीलकर्ता यांनी दि. 22.2.2007 व 6.3.2007 चे अर्ज दाखल केलेले आहे परंतु अशा अर्जांची दखल माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अंतर्गत घ्यावयाची आवश्यकता नाही. परंतु तरी सुध्दा दि. 3.4.2007 रोजी माहिती दिलेली असून सुध्दा अपीलकर्ता यांनी दि. 24.4.2007 रोजी माहिती उपलब्ध झाली नाही अशी आयोगाचे दिशाभूल करणारे अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता हे नागपूरचे निवासी आहे. त्यांना दि. 27.6.2008 रोजी सकाळी 10.30 वाजता सुनावणीस हजर राहण्याकरीता आयोगाचे कार्यालयाने नोटिस काढलेली आहे. त्यांना माहितीची आवश्यकता असती तर व मिळाली नसती तर सुनावणीस हजर राहुन तसे आयोगाचे निदर्शनास आणावयास पाहिजे होते. परंतु त्यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा दाखल केलेला नाही किंवा स्वतः

With reference to the subject cited above, I, the abovenamed applicant, require following information with documents by virtue of Right to Information Act, such as the entire copies of the proceedings filed by Shikshak Sahakari Bank, Sadar Branch, Nagpur, for obtaining R.R.C.Certificate against me in respect of so called debts recovery. I also require Order-sheet of Daily Proceedings from the first day of beginning to the conclusion of proceedings. More particularly, on the date prior to passing order by this Aluthority. I also require copy of Registered Mortgage of Flat No. C-6, Park-View Apartment, Opposite Kasturchand Park, Nagpur-1. The copies of Statement of Bank on the date of filing proceedings with Ledger Entry upto 12.10.2002. It is, therefore, requested to supply the same accordingly, as per Right to Information Act.

अपीलकर्ता यांनी पुन्हा दि. 22.3.2007 रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील न दाखल करता राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केलेले आहे. द्वितीय मेमोमध्ये माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलाचे कारण दिलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 26.2.2007 रोजी उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर शहर यांचेकडे अर्ज दाखल केलेला दिसून येतो. सदरचा अर्ज हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे नाही. परंतु दि. 6.3.2007 चा अर्ज हा माहितीचा

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1888/2007.**

श्री सुरेश लालचंद दुधानी
रा. बी–8, जयदेव अपोर्टमेंट, गोंडवाना चौक,
बैरामजी टाऊन, नागपूर. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री योगीराज सुर्वे
जन माहिती अधिकारी तथा
उपनिबंधक,
सहकारी संस्था, सहकारी भवन,
अमरावती रोड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.4.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले नाही.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.3.2007 रोजी सहा. निबंधक, सहकारी संस्था नागपूर शहर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

4. अपीलकर्ता यांनी अधिनियमाच्या कलम 6 (1) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेकडे जी माहिती मागितलेली आहे ती जन माहिती अधिकारी सहसंचालक तंत्र शिक्षण यांचेकडे मागितलेली आहे. व प्रथम अपील मात्र त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी शासकीय तंत्रनिकेतन गाडगे नगर, अमरावती यांचेकडे केलेले आहे. अधिनियमाच्या कलम 19 (1) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेपेक्षा वरिष्ठ अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल करावयाचे असते. व त्यामुळे प्रथम अपील सुध्दा दाखल करतांना हे कनिष्ठ अधिका–याकडे दाखल केलेले दिसून येते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती सहसंचालक तंत्र शिक्षण विभागीय कार्यालयातूनच प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दोन अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 20.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

आहे. यावरुन इंग्रजी टंकलेखन व मराठी टंकलेखन आवश्यक केले आहे असे दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलामध्ये शैक्षणिक अर्हतेच्या संदर्भात मागितलेल्या शासन निर्णयाच्या संदर्भात शासकीय कार्यालयामध्ये लिपीक नि टंकलेखक या पदाच्या करीता (मुंबई बाहेर) 1993 मध्ये केलेले नियमाची तरतुदी दिलेली आहे. त्यातील नियम क्र. 3 (बी) मध्ये शैक्षणिक अर्हता दिलेली आहे त्या अर्हतेमध्ये इंग्रजी टायपिंग 40 शब्द प्रति मिनिट किंवा मराठी टायपिंग 30 शब्द प्रति मिनिट अशी दिलेली आहे व त्यावरुन अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की 'किंवा' शब्द वापरलेला असल्यामुळे त्यामध्ये मराठी टंकलेखन त्यांचे असल्यामुळे दिशाभुल करणारी माहिती त्यांनी दिली. परंतु सेवा भरती नियम आणि प्रत्येक कार्यालयाची आवश्यकता या दोन भिन्न बाबी आहेत व त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये सदर कार्यालयामध्ये आवश्यकता काय आहे ही बाब जाहिराती वरुन पडताळणी करणे आवश्यक ठरते व त्याप्रमाणे जाहिरातीत वर नमुद केल्याप्रमाणे कार्यालयाने त्यांची आवश्यकता नमुद केली आहे. व तसे सहसंचालक तंत्र शिक्षण यांनी सुध्दा दि. 23.11.2007 च्या पत्राप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यामुळे कोणत्याही प्रकारची दिशाभुल करणारी माहिती ही दिलेली नाही हा निष्कर्ष काढावा लागतो. सेवा भरती नियमाच्या संदर्भामध्ये जर अधिकाराच्या संदर्भामध्ये आक्षेप असेल तर त्याबाबत त्यांनी योग्य त्या सक्षम अधिका—याकडे किंवा न्यायालयामध्ये अर्ज दाखल करुन न्याय मिळवून घेणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये सदोष भर्ती घेणा—या अधिका—या विरुध्द कठोरात कठोर कार्यवाही करण्यात यावी अशी जी विनंती करण्यात आलेली आहे त्याबाबत राज्य माहिती आयोगास कारवाई करण्याचे आदेश देण्याचे कोणत्याही प्रकारचे अधिकार नसल्यामुळे अपीलकर्ता यांची विनंती मान्य करता येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे 'माहिती' व 'माहितीचा अधिकार' या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

पदासाठी उपरोक्त पात्रता ठरविण्याचा अधिकार मिळाला आहे त्या शासन निर्णयाची साक्षांकित प्रत देण्यात यावी असा आवश्यक माहितीचा तपशिल दिला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाप्रमाणेक सर्व आवश्यक पात्रता पूर्ण केल्या नंतर अर्ज रद्य करण्यात आला. अर्ज रद्य झाल्यानंतर मी परिक्षेच्या आधी दि. 23.8.2007 ला अर्ज करुन परिक्षेला बसू देण्यात यावे यासाठी विनंती केली होती. विनंती अर्ज करुन सुध्दा मला परिक्षेला बसू देण्यात आले नाही या प्रकारे माझ्यावर जाणुनबुजुन अन्याय करण्यात आला. आता भरती प्रक्रिया पूर्ण झालेली आहे माझी आपणास विनंती आहे की ज्या तारखेपासून उपरोक्त पदावर उमेदवाराच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहे त्या मानन (deemed date) तारखे पासून मला नियुक्ती देवून संपुर्ण पेमेंट (Full Backwages) चक्रवाढ व्याजासकट देण्यात यावे आणि सदोष भर्ती घेणा–या अधिका–याविरुध्द कठोरात कठोर कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

3. अपीलकर्ता यांचे दि. 27.8.2006 च्या अर्जात मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता व त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. 1) मध्ये जाहिरातीमध्ये (अधिसुचना) दिलेल्या अटीची पुर्तता करीत नसल्यामुळे आपला अर्ज रद्य करण्यात आला असे नमुद केलेले असल्यामुळे व त्याबाबत प्रथम अपीलात किंवा द्वितीय अपीलात अपीलकर्ता यांनी आक्षेप घेतलेला असल्यामुळे सहसंचालक तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती (कालबध्द कार्यक्रम व धडक मोहिमे अंतर्गत पद भरती) संदर्भातील जाहिरातीचे अवलोकन केले असता लिपीक नि टंकलेखक या पदाच्या करीता एस.एस.सी. उत्तीर्ण इंग्रजी टायपिंग 40 शब्द प्रति मिनिट किंवा मराठी टायपिंग 30 शब्द प्रति मिनिट शासनमान्य संस्था कार्यालयातील लिपीक वर्गीय अनुभवास प्राधान्य राहिल अशी शैक्षणिक अर्हता दिलेली

केलेले दिसून येते. प्रथम अपीलामध्ये आपल्या विभागा अंतर्गत आवश्यकता असल्यास उपरोक्त पदासाठी पात्रता ठरविण्याचा अधिकार ज्या शासन निर्णया नुसार मिळाला आहे त्या शासन निर्णयाची सांक्षांकित प्रत देण्यात यावी अशी पुन्हा माहिती मागितलेली दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 23.11.2006 रोजी 1) लिपीक नि टंकलेखक या पदासाठी महाराष्ट्र शासनाकडून ठरविण्यात आलेल्या टंकलेखन परिक्षेबाबतचे दि. 3 सप्टेंबर 1993 चे शासन राजपत्र सोबत जोडलेले आहे. 2) ज्या कारणाने अर्ज रद्य करण्यात आला ते कारण नमुद असलेल्या नोटींग प्रतीचे छायांकीत शल्क रु. 2 अधिक वेळोवेळी आपणास पत्रव्यवहार करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराचे स्टेशनरी खर्च रु. 3 असे एकुण रु. 5 असे कळविण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दि. 12.11.2007 रोजी सहसंचालक तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांचेकडे स्वतंत्र पदाच्या माध्यमातून दि. 29.7.2007 च्या 'दैनिक लोकमत' मध्ये दिलेल्या कनिष्ठ लिपीक नि टंकलेखक पदाच्या भरती करीता केलेल्या माहितीचा अर्ज रद्य केल्या बाबत अर्ज केलेला दिसून येतो. त्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 23.11.2007 रोजी सहसंचालक तंत्र शिक्षण अमरावती यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपीलामध्ये महाराष्ट्र शासन (G.R.) निर्णयाप्रमाणे कनिष्ठ लिपीक नि टंकलेखक पदासाठी इंग्रजी टायपिंग 40 शब्द प्रति मिनिट किंवा मराठी टायपिंग 30 शब्द प्रति मिनिट टायपिंगची पात्रता असतांना आपल्या कार्यालयाद्वारे उपरोक्त पदाच्या भरती साठी दोन्ही टायपिंग आवश्यक करण्यात आले. आणि मी दि. 27.8.2007 रोजी केलेल्या अर्जाद्वारे त्याबाबत माहिती विचारली असता माहिती अधिका–यानी दि. 1.10.2007 अन्वये सांगितले की सदर पात्रतेची या विभागा अंतर्गत आवश्यकता आहे. आपल्या विभागा अंतर्गत आवश्यकता असल्यास उपरोक्त

4

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.8.2007 रोजी जन माहिती अधिकारी सहसंचालक तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांचेकडे कनिष्ठ लिपीक नि टंकलेखक पदाचा अर्ज रद्य केल्याबाबत आणि दि. 23.8.2007 रोजी केलेल्या विनंती अर्जाच्या बाबत खालीलप्रमाणे 4 मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

1) मी दि. 23.8.2007 रोजी केलेल्या विनंती अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली. जर कार्यवाही करण्यात आलेली नसेल तर त्याचे कारण सांगण्यात यावे.

2) उपरोक्त अर्जावर ज्या अधिका–याने कार्यवाही करायला पाहिजे होती त्या अधिका–याचे नाव व पदनाव सांगण्यात यावे.

3) महाराष्ट्र शासन निर्णयाप्रमाणे (G.R.) प्रमाणे कनिष्ठ लिपीक नि टंकलेखक पदासाठी इंग्रजी टायपिंग 40 शब्द प्रति मिनिट किंवा मराठी टायपिंग 30 शब्द प्रति मिनिट टायपिंगची पात्रता असतांना आपल्या कार्यालयाद्वारे उपरोक्त पदाच्या भरती साठी दोन्ही टायपिंग आवश्यक का करण्यात आले त्याचे कारण सांगण्यात यावे.

4) माझा अर्ज ज्या कारणाने रद्य करण्यात आला आहे ते कारण नमुद असलेलया फाईल मिटींगची सांक्षांकित प्रत देण्यात यावी ही विनंती. सदरची माहिती स्पिड पोस्टने पाठविण्यात यावी असेही नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 1.10.2007 रोजी दि. 27.8.2007 व 21.9.2007 च्या अर्जाचा संदर्भ देवून 1) आपण जाहिरातीमध्ये दिलेल्या अटींची पुर्तता करीत नसल्यामुळे आपला अर्ज रद्य करण्यात आल. 2) सदर बाबतीत यापुर्वीच कार्यवाही करुन सुचना फलकावर अपात्र अमेदवारांची यादी प्रकाशीत करण्यात आली होती. 3) सदर पात्रतेची या विभागांतर्गत आवश्यकता आहे. 4) आपला अर्ज ज्या करणाने रद्य करण्यात आला आहे ते कारण नमूद असलेली आपल्या अर्जाची झेरॉक्स प्रत या सोबत देण्यात येत आहे. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 4.10.2007 रोजी प्रथम अपील दाखल

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1886/2007.**

श्री उमेश चंपतराव लोथे
सरस्वती नगर, पो. वि.म.वि.,
जि. अमरावती 444604. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) डॉ. प्र. मा. खोडके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती
2) जन माहिती अधिकारी तथा
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.12.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

# आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यात येत आहे.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 20.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.481–486

न्यायालयात उपस्थित राहणे या व्यतिरिक्त अनुसूचित जमातीविषयक संशोधनात्मक माहिती गोळा करणेकरीता गावोगावी जावून तेथील आदिवासी घरकुलांना भेटी देणे इत्यादि कामे पार पाडावी लागतात तेंव्हा अपिलकर्त्याने मागितलेली माहिती ही संस्करण केल्याशिवाय देता येणे शक्य नाही. तसेच उक्त नमुद केल्याप्रमाणे सदर बाब कलम 2 (च) व 2 (झ) (एक) या संज्ञेत मोडत नाही. तसेच सदर माहिती कलम 7 (9) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर लागणार असल्याने त्यांनी मागितलेली माहिती शोधुन त्यांना देणे हे कार्यालयाला शक्य होत नाही.

आणि सदर माहिती पाठविलेल्या अर्जाच्या प्रतीवरुन सदर खुलाशास पुष्टी मिळु शकेल.

तेव्हा मा.उच्च न्यायालयाने नेमून दिलेले लक्षांक पूर्ण करीत असता श्री व्ही.डी. शेरकुरे हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीचा गैरफायदा घेत आहेत. निव्वळ अधिकार मिळालेला आहे म्हणून कोणत्याही सार्वजनिक हिताशी नाही अशा प्रकारची माहिती मागविणे ही बाब निश्चितच योग्य नाही.

4. तसेच तक्रारदार यांनी जी माहिती त्यांच्या माहितीच्या अर्जात मागितलेली आहे त्याचे अवलोकन केले असता अतिशय व्यापक व मोघम स्वरुपाची माहिती दिसून येते. अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे तक्रारदार यांना कारण जरी विचारता येत नसले तरी सुंध्दा मागितलेल्या माहितीतुन कोणते व्यापक जनहित साधता येईल हे अधिनियमाच्या कलम 8 (1) (ञ) प्रमाणे तपासून पाहाणे आवश्यक असते व तसे ते दिसून येत नाही. तसेच संपूर्ण माहिती ही तयार करुन द्यावी लागेल असे मागितलेल्या माहितीच्या स्वरुपा वरुन दिसून येते. व तसे 'माहिती' व 'माहितीचा अधिकार' या दोन संज्ञांच्या व्याख्येवरुन अभिप्रत नसल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही हे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य दिसून येते व त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

माहे नोव्हेंबर 2007 रोजीची माहिती व सद्यस्थिती मागितलेली आहे. सदर दोन्हीही बाबी विषयाची माहिती ही प्रत्येक प्रकरण तपासुन व संस्करण केल्याशिवाय देता येणे शक्य नाही. तसेच उक्त नमुद केल्याप्रमाणे सदर बाब कलम 2 (च) व 2 (झ) (एक) या संज्ञेत मोडत नाही. तसेच सदर माहिती कलम 7 (9) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर लागणार असल्याने त्यांनी मागितलेली माहिती शोधुन त्यांना देणे हे कार्यालयाला शक्य होत नाही.

मा. उच्च न्यायालय रिट याचीका क्र. 3343/1990 कु. नंदा शंखपाले व रिट याचीका क्र. 1279/2003 मधील दि. 29.7.2003 चे कोर्ट निर्देशानुसार समितीला मासिक 600 प्रकरणे निकाली काढण्याचा लक्षांक दिलेला आहे. सकिती किमान वार्षिक 6 हाजार ते 7 हजार दाव्यावरती निर्णय घेत असते.

शासकीय माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी वर्ग 2 यांचे पद दिनांक 6. 11.2006 पासुन ते दि. 15.4.2007 पर्यंत रिक्त असुन तसेच संशोधन अधिकारी यांनी पदोन्नती झाल्यामुळे सद्यस्थितीत अद्यापपर्यंत पद रिक्त आहे. उपसंचालक तथा सदस्य सचिव यांचे पद रिक्त आहे. व सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार वरिष्ठ संशोधन अधिकारी गडचिरोली यांचेकडे देण्यात आलेला आहे व तेच प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून काम करीत आहेत. संशोधन अधिकारी (गडचिरोली,नागपुर) वरिष्ठ संशोधन अधिकारी यांचे पद रिक्त असुन त्या पदाचा अतिरिक्त कार्यभार देखील कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांचेकडे देण्यात आलेला आहे. तेव्हा अशा परिस्थितीत समितीकडे जातीचा दावा तपासण्यास्तव दररोज प्राप्त होणारी प्रकरणे तपासणी तसेच मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे सुध्दा विहित कालावधीत प्रकरणे निकाली काढावी लागतात.

तसेच समितीच्या निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालय/सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या शेकडो प्रकरणात समितीचे पॅनल ॲडव्होकेट व सरकारी वकील यांना रेर्कार्ड पुरविणे तसेच सदर प्रकरणामध्ये उत्तरे सादर करणे व न्यायालयाचे सुनावणीच्या वेळी

3. अपीलकर्ता यांना दि. 22.12.2006 रोजी त्यांच्या दि. 8.12.2006 च्या माहिती मागण्याच्या अर्जानुसार माहिती नाकारलेली असल्यामुळे त्यांनी त्या विरुध्द अधिनियमाच्या 2005 कलम 19 (1) प्रमाणे प्रथम अपील दाखल केले असले तरी मुद्रांक शुल्क दिले नसल्यामुळे त्या प्रथम अपीलाचा विचार करण्यात आला नाही व त्यांना नवीन अर्ज दाखल करण्यास सांगितलेले दिसून आले आहे त्याप्रमाणे त्यांनी नवीन अपील मात्र दाखल केलेले दिसून येते. त्यामुळे त्यांनी आयोगापुढे दाखल केलेली तक्रार ही वैध नाही. गैरतक्रारदार यांनी सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

अपीलीय अधिकारी यांनी कळविल्यानंतरही अपिलकर्त्याने पुरेसे मुद्रांक लावलेला अपील अर्ज अपीलीय अधिकारी यांचेकडे सादर केलेला नाही. अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील अर्जासंदर्भात निर्णय दिलेला नाही.

उक्त नमुद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तसेच अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानुसार अपीलकर्ता श्री व्ही.डी.शेरकुरे यांचे समाधान न झाल्याने त्यांनी द्वितीय अपील सादर केलेले आहे.

वास्तविक पाहता माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 2 (च) प्रमाणे माहिती या शब्दाची व्याख्या दिलेली आहे. माहिती या संज्ञेचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असुन त्यामध्ये अभिलेख दस्तऐवज प्रसिध्दी पत्रके, परिपत्रके इ. स्वरुपात छायांकित प्रती घेणे असा आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता सदर माहिती ही संस्करण करुन मागितलेली आहे. त्यामुळे माहिती व अभिलेख या संज्ञेनुसार सदर माहिती पुरविणे हे अपेक्षित नाही.

सदर समिती दरमहा 400 ते 600 प्रकरणे निकाली काढते त्यामुळे अपिलकर्त्याने एप्रिल 2006 ते नोव्हेंबर 2006 या 8 महिन्याच्या कालावधीत किमान 4000 ते 6000 प्रकरणाची तपासणी संस्करीत करुन माहिती मागितलेली आहे. तसेच प्रलंबीत प्रकरणाची

a) List of S.T.validity certificate issued from April 2006 to Nov. 2006 with details i.e.

i) Inward No. & date of receipt of application for verification

ii) Date of validity certificate prepared.

iii) Despatch No. & date of dispatch of certificate.

b) List of Pending application for verification as on Nov.2006 with details i.e.

i) Inward No. & date of receipt of application

ii) Present status of application

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 22.12.06 रोजी माहिती मागण्याचे कोणतेही प्रयोजन नमुद केलेले नाही. तदवतच माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 2 (च) व कलम 2 (झ) (एक) नुसार 'माहिती' व 'अभिलेख' या अर्थसंज्ञेनुसार कोणताही दस्तऐवज हस्तलिखीत फाईल असा होतो. तेव्हा शासनाच्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध असलेली माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात पुरविणे अपेक्षित आहे असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे तक्रारदार यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 6.1.2007 रोजी सहा. आयुक्त व उपसभापती जात पडताळणी समिती यांचेकडे अपील दाखल केलेली दिसून येते. व त्या सदर अपीलास कोणत्याही प्रकारचे कोट फी स्टॅम्प लावलेले नसल्यामुळे त्यांना दि. 5.3.2007 रोजी पुरेशे मुद्रांक शुल्का सह व माहिती मागण्याचे प्रयोजना सह अपीलीय अधिकारी यांचे नावे पाठविलेला नाही तेव्हा उक्त नमुद केल्याप्रमाणे अर्ज सादर करावा असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार कमांक 166/2007.**

श्री व्ही. डी. शेरकुरे
113/3920, मनोविश्व, को. ऑप. हाउसिंग सोसा.
तिलक नगर, चेम्बुर (पश्चिम) मुंबई 400089 ..... **तक्रारकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अनुसूचित जामाती प्रमाणपत्र तपासणी समिती
आदिवासी भवन गिरीपेठ नागपूर 10.
2) जन माहिती अधिकारी तथा
अनुसूचित जामाती प्रमाणपत्र तपासणी समिती
आदिवासी भवन गिरीपेठ नागपूर 10. ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 20.8.2008 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 3.3.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 18 (1) नुसार तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार विनाअनुमती गैरहजर आहे. गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दिनांक 8.12.2006 रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक पणन महासंघ यवतमाळ हे हजर असुन त्यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सदरच्या कागदपत्रांमध्ये तक्रारदार यांनी दाखल केलेले जोडपत्र अ चे छायांकित प्रत दाखल केलेली आहे. सदरच्या जोडपत्र अ ला 25/– रु. चे कोर्ट फी स्टॅम्प लावलेले दिसून येते. नियमाप्रमाणे रु. 10/– चे कोर्ट फी स्टॅम्प असावयास पाहिजे. असे असले तरी दि. 20.11.2006 रोजी (29.11.2006 रोजी) तक्रारदार अर्जदार यांना त्यांच्या तीनही मुद्यांच्या संदर्भामध्ये सहा. माहिती अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक विभाग यवतमाळ यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व ती नोंदणीकृत टपालाद्वारे तक्रारदार यांना निर्गमित केलेली दिसून येते. तक्रारदार हयांना सदरची माहिती उपलब्ध झालेली त्यांच्या दि. 4.12.2006 च्या विभागीय व्यवस्थापक यांना दिलेल्या पत्रावरुन दिसून येते. त्यात त्यांचे समाधान झालेले दिसून येत नाही अशी त्यांनी तक्रार केलेली दिसून येते. परंतु आयोगापुढे त्याबाबत कोणत्याही प्रकारचा त्यांनी खुलासा केलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे त्यांची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.
2) तक्रारदार व माहिती अधिकारी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 14.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.476–477

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार कमांक 165/2007.**

श्री रजनीकांत डालुराम बोरले
जय अंबे बिल्डींग दत्त चौक, पांढरकवडा
ता. केळापूर जि. यवतमाळ ..... **तकारकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. जी. बारबुदे
जन माहिती अधिकारी तथा
विभागीय व्यवस्थापक
पणन महासंघ यवतमाळ ..... **गैरतकारदार**

**( आदेश पारित दिनांक 14.8.2008 )**

**नि र्ण य**

तकारदार यांनी दिनांक 15.3.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे 20/— रु. चे कोर्ट फी स्टॅम्प लावून नमुन प्रपत्र ''क'' मध्ये तकार दाखल केलेली दिसून येते. परंतु अपील मेमोसोबत कोणत्याही प्रकारची कागदपत्रे त्यांनी दाखल केलेली नाहीत. ''अ'' फॉर्म ''ब'' फॉर्म दाखल केलेला नाही. तकारीच्या सुनावणी करीता दि. 13.6.2008 रोजी आयोगाचे कार्यालयातून दिनांक 30.6.2008 रोजी उपस्थित राहण्यास नोटिस काढलेली असुन सुध्दा तकारदार गैरहजर आहेत. त्यानंतर पुन्हा दि. 2.7.2008 रोजी आज अर्जाच्या सुनावणीची नोटिस तकारदार यांना काढलेली असुन सुध्दा तकारदार गैरहजर आहेत. गैरतकारदार जन माहिती

जो करार केलेला आहे त्या कराराची प्रत त्यांना हवी आहे. परंतु उत्तरवादी यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्ता हे ठेकेदारी पध्दतीवर असले तरी रोजंदारी पध्दतीनेच त्यांना महिन्याचे वेतन दिलेले आहे व ते तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे त्याचे बरोबर करारनामा केलेला नाही. करारनामा केल्याचा पुरावा आहे काय असे अपीलकर्ता यांना विचारले असता त्याचेकडे करारनाम्याच्या संदर्भामध्ये अटी असलेला पुरावा नाही असे त्यांनी सांगितले. अपीलकर्ता यांचे विरुध्द तक्रार करुन ठेकेदारी रद्द करण्यात आली होती. त्याबाबत चौकशी झाली होती व ती चौकशी तोंडी तक्रारी केल्यामुळे झाली होती असे कळविलेले असल्यामुळे जी वस्तुस्थिती आहे ती वस्तुस्थिती अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी तथा सचिव यांनी सांगितली व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती जशी आहे तशी उपलब्ध झाली आहे. कोणत्याही प्रकारे खोटी किंवा दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 6.4.2007 च्या अर्जानुसार विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर<br>
दि. 13.8.2008

( विलास पाटील )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.470–475

यांना महाविद्यालयाचे पत्र क्र. जेडीपी/548/2007 दि. 1.5.2007 अन्वये कळविण्यात आली अर्जदाराने दि. 3.5.2007 रोजी माहिती पुरविण्याकरीता लागणारा पोस्टेज खर्च मनिऑर्डरद्वारे महाविद्यालयास पाठविल्यानंतर अर्जदाराने मागितलेली माहिती महाविद्यालयाचे पत्र क्र. जेडीपी/554/2007 दि. 5.5.2007 नुसार अर्जदारास देण्यात आली. त्यामध्ये कार्यालयात उपलब्ध असलेले व्हावचर, चार वर्ष काम केल्याबाबतचा अहवाल, विद्यार्थ्याकडून स्टॅम्प पेपर लिहून घेतला नसल्यामुळे तो देण्यात आला नाही तसेच विद्यार्थ्याने तोंडी तक्रार केली होती त्यावर त्या विभागाच्या लिपीकाचा अहवाल देण्यात आल. अर्जदाराने मागितलेली माहिती त्यांना कालावधीच्या अगोदर देण्यात आली आहे.

तसेच उत्तरवादी यांचे वकील यांनी असा युक्तीवाद केला की अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात सुध्दा कोर्ट फि स्टॅम्प हे संस्थेच्या खाती जमा करता येत नाही त्यामुळे संस्थेकडे रक्कम मनिऑर्डरने किंवा प्रत्यक्ष जमा करावी असे कळविलेले होते व त्याप्रमाणे त्यांनी दि. 6.4.2007 रोजीचा माहितीचा अर्ज केलेला आहे. व तरीसुध्दा त्यांनी प्रथम अपील दाखल करतांना पुन्हा कोर्ट फि स्टॅम्प लावला असल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा तसेच उत्तर दि. 28.5.2007 रोजी दिलेले आहे त्यामुळे अपीलकर्ता यांचा सदरचा मुद्या हा ग्राहय धरता येत नाही. ही बाब अपीलकर्ता यांच्या दि. 6.4.2007 च्या अर्जातून सुध्दा स्पष्ट होते व त्यामुळे अपीलकर्ता यांचा रु. 20 चा कोर्ट फि स्टॅम्प चा मुद्या हा निकाली निघतो. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना जी माहिती उपलब्ध झाली ती खोडतोड न केलेली माहिती पुरावा म्हणून उपलब्ध आहे काय तर तशी माहिती त्यांचेकडे पुरावा म्हणून उपलब्ध नाही पण त्यांना असे वाटते व प्रत्यक्ष तसे शब्द त्या माहितीच्या कागदपत्रामध्ये आहेत तसे उपलब्ध करुन दिले आहे असे जन माहिती अधिकारी यांचे वकील यांनी सांगितले. पुन्हा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे होते की त्यांच्या बरोबर सायकल स्टॅंड ठेकेदारी पध्दतीने

अर्जदाराने सत्र 2001–2002 मधील जून 2001 या महिन्यात कि.कौ.आ. विभागातील विद्यार्थ्याकडून शाळा सोडण्याचा दाखला मिळवून देण्याबाबत परस्पर रक्कम घेतल्याचे उघडकीस आल्यामुळे अर्जदारास जून 2001 पासून ठेकेदारी पध्दतीने सायकल स्टॅंड देखभाल करण्याचे काम देणे बंद केले.

1) अर्जदाराने दि. 6.4.2007 ला पोस्टाने माहिती मिळण्याकरीता महाराष्ट्र माहिती अधिकार 2005 अन्वये अर्ज पोस्टाने महाविद्यालयास पाठविला तो अर्ज महाविद्यालयास दि. 11.4.2007 ला प्राप्त झाला.

2) अर्ज दुस–या प्राधिकरणाशी संबंधित नसल्यामुळे दुस–या प्राधिकरणाकडे पाठविण्यात आला नाही.

3) त्या अर्जामध्ये अर्जदाराने पुढील प्रमाणे माहिती मागितली होती. 1) व्हावचर रेकार्ड 2) दोन वर्षाचा कामकाज केल्याबातचा अहवाल 3) स्टॅम्पपेपर लिहून घेताला होता 4) विद्यार्थ्याच्या तक्रारीचा कागद इत्यादी माहिती मागितली.

4) अर्जदाराने महाविद्यालयास पोस्टाने पाठविलेल्या माहिती अधिकार 2005 अन्वये प्राप्त झालेला दि. 11.4.2007 च्या अर्जासंबंधी माहिती व मार्गदर्शन करण्याकरीता मा.अपीलीय अधिकारी श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांना महाविद्यालयाचे पत्र क्र. जेडीपी/499/2007 दि. 12.4.2007 अन्वये कळविण्यात आले त्यावर मा.अपीलीय अधिकारी यांनी महाविद्यालयास पत्र क्र. षि/सचिव/3/233/2007 दि. 21.4.2007 अन्वये अर्जदार श्री अमोल वि. लहाने यांनी महाराष्ट्र माहिती अधिकार 2005 अन्वये जी माहिती मागितली आहे ती त्यांना देण्यासंबंधी माहिती अधिकार 2005 मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे कळविले. त्यावर अर्जदारास जी माहिती पुरवावयाची आहे त्याकरीता लागणारा पोस्टेज खर्च महालवद्यालयात जमा करण्यासंबंधी महाविद्यालयाचे पत्र क्र. जेडीपी/523/2007 दि. 24.4.2007 अन्वये कळविण्यात आले व त्यासंबंधीची माहिती मा.अपीलीय अधिकारी

कार्यालयात उपलब्ध आहे. तरी मला विहीत शुल्क तसेच छायांकित प्रतीकरीता येणारा खर्च महाविद्यालयाच्या खाती भरण्याचे दृष्टीने माहिती स्वतः येवून घेण्याबाबत त्वरीत तारीख व वेळ देवून उपकृत करावे. ही पुनश्च नम्र विनंती. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 5.5.2007 रोजी प्राचार्य जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय दर्यापूर यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध माहिती मुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 25.5.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 28.5.2007 रोजी साचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांनी अपीलकर्ता यांना अपील अर्जासोबत आपण 20/– रु. चा कोर्ट फि स्टॅम्प लावलेला असल्यामुळे हे 20/– रु. शासनाच्या खात्यात जमा झाले आहे. माहितीच्या अधिकार कायद्याप्रमाणे अर्जासोबतचे विहित शुल्क संस्थेच्या खाती जमा होणे आवश्यक आहे. आपण अर्जासोबत लावलेले कोर्ट फि स्टॅम्प हे संस्थेच्या खाती जमा करता येत नाही. करीता यासोबत 20/– रु. चा कोर्ट फि स्टॅम्प लावलेला आपला अर्ज परत पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी 20/– रु. चा कोर्ट फि स्टॅम्प अपीलाची फि म्हणून स्विकारता येत नाही हे कारण सांगून प्रथम अपील नाकारल्या बद्यल व उपलब्ध करुन दिलेली माहिती ही अर्जावर खोडतोड करुन दिशाभूल करणारी माहिती दिल्याबद्यल राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

उपरोक्त संदर्भांकित पत्रानुसार श्री अमोल विनायकराव लहाने मु. पो. माहुली धांडे यांनी आपणाकडे सादर केलेल्या अपील संबंधी खुलासा सादर करीता आहे.

अर्जदार महाविद्यालयात सत्र 1998–99 ते 2001–2002 या कालावधीमध्ये ठेकेदारी पध्दतीने सायकल स्टॅंड देखभाल करण्याचे काम देण्यात आले होते.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.4.2007 रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

महाराष्ट्र माहिती अधिकार 2005 अन्वये वरील विषय संदर्भानुसार विनंती की संदर्भ 1 व 3 नुसार 1998 ते 2001 पर्यंतचे मी महाविद्यालयात कामकाज केल्याबाबतचे माहिती अधिकार 2005 अन्वये 1) रेकॉर्ड मिळण्याबाबत 2) वेतन केल्याबाबतचे व्हावचर 3) आपल्या आदेशानुसार स्टॅम्पपेपर लिहुन दिलेला आहे त्याबाबत 4) विद्यार्थ्यांच्या तक्रारी विद्यार्थ्यांनी आपणाकडे दिल्या आहेत त्याबाबत संबंधीत माहिती. संदर्भ 1 व 3 नुसार माहिती छायांकित व साक्षांकित मिळण्याबाबतचा अर्ज माहिती अधिकार 2005 अन्वये आपणाकडे पाठविला होता.

संदर्भ 1 व 4 नुसार आपण मला माहिती त्वरीत देण्याबाबत मार्गदर्शन केलेले आहे.

संदर्भ 4 नुसार माहितीचा अधिकार कायद्याप्रमाणे अर्जासोबतचे विहित शुल्क महाविद्यालयाच्या खाती जमा होणे आवश्यक आहे असे आपण कळविले आहे. आपल्या आदेशानुसार नमुद केल्याप्रमाणे विहित शुल्क मी महाविद्यालयाच्या खाती जमा करण्यास तयार आहे.

संदर्भ 1 व 3 नुसार माहिती मागण्याबाबत छायांकित व साक्षांकित दस्तऐवज करण्याकरीता येणारा खर्च सुध्दा माहिती अधिकार 2005 अन्वये नियमानुसार महाविद्यालयाच्या खाती शुल्क भरण्यास तयार आहे.

माहिती अधिकार 2005 अन्वये वरील सर्व बाबीचा विचार करुन अर्जासोबत विविध शुल्क छायांकित प्रती करीता येणारा खर्च महाविद्यालयाच्या खाती भरण्याच्या दृष्टीने संदर्भ 1 व 3 नुसार त्वरीत कार्यवाही होण्याच्या आपल्याही दृष्टीने आपल्या कार्यालयात मला येण्याबाबत तारीख व वेळ देवून माझी होणारी गैरसोय टाळावी. म्हणजेच आपण क्र. 471/7 दि. 3.4.2007 अन्वये कळविल्यानुसार तसेच मला लागणारी माहिती आपल्या

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1884/2007.**

श्री अमोल विनायकराव लहाने
मु. पो. माहुली धांडे
ता. दर्यापूर जि. अमरावती ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्ही. जी. आंबुळकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
साचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था,
शिवाजीनगर, अमरावती
2) श्री के. आर. गावंडे
जन माहिती अधिकारी तथा
जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय दर्यापूर
जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. उत्तरवादी तर्फे ॲड. अनिल एच. लद्दड हजर होते व त्यांनी युक्तीवाद केला.

कागदपत्राची फी ही अवाजवी असल्यामुळे अपीलकर्ता यांनी एकुण पृष्ठ संख्या प्रति पृष्ठ रु 2 प्रमाणे एकूण रु. 38 ही व्यक्तिशः संस्थेच्या कार्यालयात भरावी.

5

5

2) जन माहिती अधिकारी (उपमुख्य विश्वस्त किंवा मुख्य विश्वस्त) सावरखेर्डा यांनी अपीलकर्ता यांचेकडून रु. 38 चा भरणा करुन घेवून त्यांना एकूण 19 पृष्ठाची माहिती छायांकित प्रतिच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी व तशी पोच घ्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर ( विलास पाटील )

दि. 13.8.2008 राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.465–469

4

4. मुख्य विश्वस्थ (संस्था) यांचे तर्फे दि. 24.6.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश बुलढाणा यांचे न्यायालयात अच्युत त्र्यंबक सावजी व दुर्गादास गोविंद देशपांडे यांनी दाखल केलेल्या अपीलाची प्रत दाखल केलेली आहे. तसेच विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश बुलढाणा यांचे न्यायालयामध्ये एमजेसी 52/86 मध्ये दाखल केलेल्या अर्जाची प्रत दाखल केलेली आहे. तसेच दि. 16.9.2005 रोजी श्री दिनानाथ वा. काळे व स्वतः श्री सिताराम श्रीकृष्ण काळे व इतर यांनी मुख्य विश्वस्त यांचेकडे विद्यमान विश्वस्त मंडळावर काळे घराण्यातील प्रतिनिधी म्हणून केलेल्या अर्जाची प्रत दाखल केलेली आहे. परंतु दाखल केलेले तीनही दस्तऐवज माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) प्रमाणे दाखल केलेल्या अपीलाच्या संदर्भात आवश्यक नाहीत. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेच्या गुणवत्तेबाबत आदेशित करण्याचा राज्य माहिती आयोगास अधिकार नाही. व त्यामुळे मागितलेली माहिती ही छायांकित प्रतिच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे एवढेच अपेक्षित आहे. विश्वस्त यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपीलाच्या संदर्भामध्ये इतर कोणताही खुलासा दाखल केलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मदाय आयुक्त बुलढाणा यांनी दि. 3.5.2007 रोजी दिलेला निर्णय हा योग्य असल्यामुळे परंतु उपमुख्य विश्वस्त यांनी आकारलेली

3

यांनी आदेश केल्यानंतर उपमुख्य विश्वस्थ श्री गोविंद रामानंद समर्थ सद्‌गुरु प्रल्हाद महाराज (रामदासी) संस्थान साखरखेर्डा यांनी मा. सहाय्यक धर्मदाय आयुक्त बुलढाणा यांना अर्ज क्र. 383/07 पारीत केलेल्या आदेशा बाबत आपण मागणी केलेले दस्तसंदर्भात एकूण प्रति या 19 इतक्या असुन पानाचे एका भागाचे रु. 10 याप्रमाणे आपण पुढील प्रमाणे मनीऑर्डर संस्थानचे नावानी पाठवावी. पेज संख्या एकूण 19. प्रत्येकी 10 रु. प्रमाणे 190 पोस्टेज खर्च 40 रु. एकूण रु. 230. वरील प्रमाणे रकमेची मनीऑर्डर आठ दिवसात संस्थेला मिळावी प्रति पाठविणे सोयीचे होईल असे दि. 14.5.08 रोजी पोस्टाने कळविलेले आहे. सदरच्या पत्रामध्ये प्रति देण्यासाठी जास्तीची रक्कम कळविल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे असे अपील मेमोमध्ये दिसून येते.

3. उपमुख्य विश्वास्थ यांचे तारीख नसलेले पत्रामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे पानाच्या एका भागाचे 10 रु. ही जी मागणी करण्यात आलेली आहे ती महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम 2005 चे नियम 4 प्रमाणे नाही. सदरच्या नियम 4 (बी) मध्ये जी माहिती सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध आहे त्या कागदपत्राच्या छायांकित प्रति उपलब्ध करुन देण्याकरीता प्रति पृष्ठ रु. 2 असे विहित केलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या एकुण पृष्ठ हे 19 होत असतील तर रु. 38 हाच माहितीच्या खर्चाच्या संदर्भातील योग्य असे शुल्क आहे. दि. 29.1.2007 रोजीच्या त्यांच्या अर्जामध्ये माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे अपीलकर्ता हे स्वतः माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता जन माहिती अधिकारी (संस्थेचे विश्वस्थ) यांचेकडे माहिती उपलब्ध करुन घेण्यास हजर झाल्यास पोस्टेजचा खर्च आकारण्याची आवश्यकता नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी रु. 38 चा भरणा हा संस्थेच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यास त्यांना 19 पृष्ठामधील माहिती छायांकित प्रतिच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

2

विनाअनुमती गैरहजर आहेत. परंतु त्यांचे तर्फे त्यांच्या वकील श्रीमती स्मिता देशापांडे हयांनी कागदपत्रे दाखल केलेली असुन नंतर हजर झाल्या होत्या. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेले असून हजर आहेत. परंतु दि. 24.6.2008 रोजी श्री भा. रा. कुळकर्णी सरव्यवस्थापक जन माहिती अधिकारी यांनी व त्यांचे वकील श्रीमती देशपांडे यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत व त्यांना सुनावणीच्या तारखेची माहिती देण्यात आलेली आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.1.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून सहाय्यक धर्मदाय आयुक्त बुलढाणा द्वारा श्री गोविंद रामानंद समर्थ सद्गुरु प्रल्हाद महाराज संस्थान साखरखेर्डा जि. बुलढाणा रजि. नं. 280 हयांना माहिती मागितलेली असली तरी अर्ज हा दि. 30.1.2007 रोजी सदरचे संस्थान हयांचे अधिकारी सुरेश गावपांडे यांनी स्विकारलेला दिसून येतो. माहिती ''दि. 12.6.89 श्री अच्युत सावजी व इतरांनी केलेल्या आरोपाची प्रत व विश्वस्तांनी केलेल्या समझोता त्याची प्रत व 8 मार्च 1989 ला विश्वस्थांचे मिटींगमध्ये झालेल्या ठरावाची प्रत'' अशी मागितलेली दिसून येते व ती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 12.4.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून सहाय्यक धर्मदाय आयुक्त बुलढाणा याचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दि. 3.5.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मदाय आयुक्त बुलढाणा यांनी निर्णय देवून ''जाब देणार माहिती अधिकारी श्री गोविंद रामानंद समर्थ सद्गुरु प्रल्हाद महाराज (रामदासी) संस्थान साखरखेर्डा जि. बुलढाणा यांना सूचित करण्यात येते की त्यांचे दप्तरी उपलब्ध असलेली माहिती ताबडतोब अपिलकार यांना पुरविण्यात यावी. तसेच अपिलकार यांना सूचित करण्यात येते की नियमानुसार आवश्यक असलेली फी यांनी जाब देणार यांचेकडे भरावी'' असे आदेशित केलेले आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की प्रथम अपीलीय अधिकारी

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1883/2007.**

श्री सिताराम श्रीकृष्ण काळे
राममंदिराजवळ साखरखेर्डा
ता. सिंदखेडराजा जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. बी. मुंडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक धर्मदाय आयुक्त कार्यालय बुलढाणा
2) जन माहिती अधिकारी तथा
सरव्यवस्थापक
श्री गोविंद रामानंद समर्थ सद्गुरु प्रल्हाद
महाराज संस्थान साखरखेर्डा जि. बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. जन माहिती अधिकारी तथा सरव्यवस्थापक श्री गोविंद रामानंद समर्थ सद्गुरु प्रल्हाद महाराज संस्थान साखरखेर्डा

गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. परंतु अपीलकर्ता यांनी दि. 21.6.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती उपलब्ध झाली व त्यासंबंधी काही तक्रार नाही असे लेखी लिहुन दिलेले असल्यामुळे तसेच तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सुध्दा माहिती उपलब्ध झाली असे लेखी दिले असल्यामुळे व आज प्रत्यक्ष माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी हे आयोगापुढे हजर राहुन माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे सांगितले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

नागपूर
दि. 12.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.455–456

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1881/2007.**

श्री सचिन हिम्मतराव अब्रुक
मु. पो. धनेगाव ता. अंजनगाव सुर्जी
जि. अमरावती ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बी. के. जेजुरकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी अचलपूर जि. अमरावती

2) श्री आर. यु. देशमुख
जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी ता.अंजनगाव सुर्जी
जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती

खर्चाचा भरणा करावा व त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खर्चाचे शुल्क कळवावे. अपीलकर्ता यांनी सचिवाच्या राहाते घरात असलेल्या संस्थेचे कार्यालयात जावून संपूर्ण कार्यवाही पूर्ण करावी. माहिती उपलब्ध झाल्यावर पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 12.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.449–462

अपीलकर्ता यांनी मागितलेल्या 7 मुद्यांच्या संदर्भामध्ये मुद्या क्र. 1 मध्ये भूखंडाच्या क्षेत्रफळाची लांबी रुंदी ही प्रत्यक्ष लिहुन देण्यापेक्षा अंतिम मंजुर नकाशाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहिल. मुद्या क्र. 2 व 3 च्या संदर्भामध्ये सब डिव्हीजनचा असला तरी आदेशाची प्रत उपलब्ध करुन देणे तयार नसेल त्याप्रमाणे कळविणे संयुक्तिक राहिल. मुद्या क्र. 4 च्या संदर्भामध्ये ज्या साईट प्लॅनची मागणी केलेली आहे त्याप्रमाणे साईट प्लॅनची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहिल. मुद्या क्र. 5 च्या संदर्भामध्ये दि. 28.8.2000 चे पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले व दि. 1.1.2002 मध्ये डिमांड नोटिस दिली आहे असे सांगितले. मुद्या क्र. 6 व 7 च्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना प्रथम अपीलातच खुलासा करुन दिलेला आहे असेही त्यांनी सांगितले. परंतु अपीलकर्ता यांना मुद्या क्र. 1 आणि 4 मधील अंतीम मंजूर प्लॅन व साईट प्लॅनच्या करीता खर्चाचा भरणा करणे आवश्यक राहिल. उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे अपीलकर्ता यांना योग्य त्या सक्षम अधिका–याकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेता येईल. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 15.12.2006 च्या अर्जातील मुद्या क्र. 1 ते 4 प्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन दयावी. सदरच्या मुद्या क्र. 1 व 3 च्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी

घ्यावयास पाहिजे होते. श्री विंगळे यांनी जोडलेल्या यादीमध्ये असे नमुद केले आहे की अकोला जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सर्व सभासदांनी दि. 25.8.2006 रोजी संस्थेचे अध्यक्ष तथा सचिव यांचेकडे कोणत्याही प्रकारचा विनंती अर्ज सादर केलेला नाही. त्यामुळे त्याबाबत कोणत्याही प्रकारचे निवेदन करता येणार नाही.

दि. 5.1.2007 रोजी मा.उपनिबंधक सहकारी संस्था तालुका अकोला यांचे कार्यालयात सदर बाब निदर्शनास आणून देण्याकरीता संस्थेचे अध्यक्ष उपस्थित झाले असतांना श्री विंगळे हे त्याच कार्यालयात हजर होते व त्यांनी उपरोक्त पत्राची झेरॉक्स प्रत घेतली असल्याची माहिती प्राप्त झाली. सदर पत्रामधील माहितीची जाणीव असतांना ही त्यांनी मागणी केलेल्या कागदपत्राकरीता आवश्यक फी भरणा केली नाही तथा संस्थेच्या पदाधिका–यांशी संपर्क साधला नाही.

श्री विंगळे यांनी संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता कोणत्याही प्रकारची आगावू रक्कम भरणा न केलयामुळे व निरर्थक पत्रव्यवहार केल्यामुळे व संस्थेकडून या प्रकरणी कागदपत्र देण्यास विलंब न झाल्यामुळे श्री आर. आर. विंगळे यांचा केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अंतर्गत केलेला अपिल अर्ज खारीज करण्यात यावा व त्यांना योगय त्या सुचना देण्यात याव्यात हि विनंती.

4. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेला खुलासा यावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात मागितलेल्या मुद्याच्या संदर्भामध्ये माहिती ही तयार करुन उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यामुळेच अपीलकर्ता यांचे माहिती ही चुकीची, दिशाभूल करणारी आहे असे दिसून येते. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) मध्ये तसेच (ञ) मध्ये माहिती ही उपलब्ध असलेले अभिलेखे छायांकित प्रतिच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावयाचे असते. कागदपत्रा मधून माहिती तयार करुन दिल्यावर आक्षेप घेण्यास वाव राहतो. व तसे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. व त्यामुळे

पत्राची प्रत सोबत जोडली आहे. त्यांना सुधारीत नामनिर्देशन पत्र उपविधी नियम 32 व 33 नुसार भरावयाचे असल्यास त्याकरीता पूर्वीचे नामनिर्देशन पत्र रद्द करुन दुसरे नामनिर्देशन पत्र विहित नमुन्यात परिशिष्ट क्र. 14 मध्ये आवश्यक शुल्क रु. 50 सह भरावे लागेल.

मुद्या क्र. 7 – श्री आर. आर. विंगळे यांना छापील नमुन्यात भाग पत्र क्र. 136 दिलेले आहे ते प्रमाणित करुन पाहिजे असल्यास संस्थेकडे जमा करावे सुधारीत भागपत्र तथा त्यावर अध्यक्ष/सचिव यांच्या स्वाक्षरीने देण्यात येईल.

श्री विंगळे यांनी उपरोक्त माहिती त्यांचे पत्र दि. 15.12.2006 प्राप्त झाल्यापासून 7 दिवसाचे आंत मिळण्यासाठी मा.उपनिबंधक सहकारी संस्था तालुका अकोला या कार्यालयात विनंती केली आहे. या संबंधी सादर करण्यात येते की, श्री विंगळे यांचा सदर अर्ज मा.उपनिबंधक सहकारी संस्था तालुका अकोला यांचे पत्र दि. 18.12.2006 अन्वये संस्थेस दि. 20.12.2006 रोजी प्राप्त झाले सदर पत्र व अर्ज प्राप्त झाल्यानंतर लगेच दि. 21.12.2006 रोजी श्री आर. आर. विंगळे यांना आवश्यक व देय माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचेकडे संपर्क साधण्यास व आगावू फी भरणा करण्यास कळविण्यात आले होते. परंतु श्री विंगळे यांनी अध्यक्ष तथा सचिव यांचेशी स्वतः संपर्क तर साधलाच नाही उलट त्यांना रजिष्टर पोस्टाने पाठविण्यात आलेले पाकिट घेण्यास नकार दिल्यामुळे ते संस्थेत दि. 4.1.2007 रोजी परत मिळाले.

श्री आर. आर. विंगळे यांनी अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येईल की त्यांना संस्थेने दि. 21.12.2006 च्या पत्रानुसार माहिती प्राप्त करुन घेण्यास सुचना दिली होती परंतु त्याबाबत त्यांनी अनुपालन केले नाही. श्री विंगळे यांनी अनुक्रमांक 4,5,6,7,8,9,12 व 13 संबंधीचे कागदपत्र स्वतःकडे असतांना पुन्हा सदर कागदपत्रे मिळणेकरीता विनाकारण मागणी केलेली आहे. वास्तविकता श्री विंगळे यांनी अनुक्रमांक 4,5,6 व 7 इत्यादीच्या प्रमाणीत प्रती अधिकृत कार्यालयाकडून प्राप्त करुन

भरणा न केल्याने पुन्हा दि. 21.3.2006 च्या सुचना पत्रानुसार दि. 27.3.2006 पर्यंत रकमा भरणा करण्यात याव्यात असे सुचित करण्यात आले.

वर नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन सुध्दा श्री विंगळे यांनी संस्थेच्या थकित रकमा व वेळोवेळी मागणी केलेल्या देय रकमा संस्थेकडे भरणा केल्या तर नाहीच उलट संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या सार्वत्रिक निवडणूक 2006 च्या कालावधीत सभासदांना उलट सुलट सल्ला देण्याचे काम सुरु केले.

निवडणूका आटोपल्यानंतर सन 2005–2006 या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा 15.12.2006 च्या सुचना पत्रानुसार बोलावण्यात आली. श्री आर. आर. विंगळे वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटिस व वार्षिक अहवालाची प्रत देण्यात आली. सभेची नोटीस व अहवाल त्यांना दि. 24.12.2006 रोजी मिळाल्याची संस्थेकडे पोच सुध्दा आहे. सभेची नोटिस मिळाल्यानंतरही ते वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित झाले नाही. त्यांना वार्षिक सर्वसाधारण सभा दि. 31.12.2004 चे कार्यवृतांत माहितीस व उचित कार्यवाही करीता रजिष्टर पोस्टाने दि. 15.1.2007 पाठविण्यात आले होते. परंतु सदर पाकिट त्यांनी घेण्यास नकार दिल्यामुळे संस्थेला दि. 20.1.2007 रोजी परत मिळाले. श्री आर. आर. विंगळे यांना वार्षिक सर्वसाधारण सभेत ठरल्यानुसार दि. 31.1.2007 पर्यंत रकमा भरणा करण्यास संधी देण्यात आली होती. सदर रकमेचा त्यांनी विहीत मुदतीच्या आत भरणा न केल्यास वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. 2 (12) नुसार त्यांचे सदस्यत्व रद्य करण्याबाबत कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

या मुद्यासंबंधीच्या ठरावाच्या प्रती, सुचना पत्राच्या प्रती व संस्थेने केलेला पत्र व्यवहार, त्यांचेकडून परत आल्याबाबतच्या अधिकृत पाकिटच्या नोटस इ. यासोबत जोडल्या आहेत.

मुद्या क्र. 6 – श्री आर. आर. विंगळे यांनी दि. 1.3.1994 रोजी विहित नमुन्यात संस्थेकडे नामनिर्देशन पत्र दाखल केलेले आहे व ते संस्थेने मंजूर सुध्दा केलेले आहे. सदर

त्यांच्या असे निदर्शनास आले की, श्री आर. आर. विंगळे यांनी संस्थेच्या मालकीच्या विटा, रेती, गीटटी, डब्बर इत्यादी चोरुन नेवून संस्थेच्या बिनापरवानगीने घराच्या बांधकामात फेरफार व ज्यादा बांधकाम केले. या बाबींचा त्यावेळी मासिक सभेच्या कार्यवृतांत उल्लेख सुध्दा आहे. बांधकाम करीता असतांना श्री विंगळे यानी संस्थेच्या मिटर घरातून विजेचा वापर सुध्दा केला आहे. श्री विंगळे यांनी संस्थेने दिलेल्या दि. 29. 7.2000 च्या नोटीसला उत्तर दिले व ते संस्थेच्या सभेत ठेवण्यात आले होते. त्यांनी सदर स्पष्टीकरणात नमुद केलेल्या बाबी हया निरर्थक व बिनबुडाच्या असल्यामुळे तसेच त्यांनी आवश्यक पावत्या व कागदपत्र संस्थेकडे दाखल न केल्यामुळे वसुलीची कार्यवाही सुरु ठेवण्यात आली. दरम्यानच्या काळात श्री विंगळे हे शासनाच्या गहु घोटाळा प्रकरणात आरोपी असल्यामुळे व ते कारागृहात कस्टडीत असल्यामुळे वसुलीची कार्यवाही काही कालावधीकरीता स्थगीत ठेवण्यात आली होती. दि. 13.8.2005 च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत व दि. 25.9.2005 च्या विशेष सर्वसाधारण सभेत सर्वानुमते ठराव मंजूर केल्यावरुन व संस्थेचे काम खोळंबुन पडल्यावरुन दि. 25.10.2005 च्या सुचना पत्राद्वारे श्री विंगळे यांना सविस्तर व बाबनिहाय रकमा दर्शविणारे सुचना पत्र देण्यात आले व त्यांना दि. 19.11.2005 पर्यंत थकित व देय रकमा भरण करण्यास सुचित करण्यात आले अशाच प्रकरचे सुचना पत्र इतर सभासदांना सुध्दा देण्यात आलेले आहे.

श्री विंगळे यांनी घर बांधणी परतफेडीच्या कर्जाचे विवरण पत्र तथा माहिती व आवश्यक कागदपत्र संस्थेला अद्यापही पुरविले नाहीत त्यांना या बाबत वेळोवेळी सुचना दिलेल्या आहेत. श्री विंगळे यांनी दि. 28.2.2006 रोजी पुन्हा बाकी रकमेची खात्री करुन घेतली रकमा भरण्यास संस्थेकडे सम्मतीपत्र सादर केले. त्या अटी व शर्तीवर त्यांना आवश्यक कागदपत्र संस्थेकडून देण्यात आले. संम्मतीपत्र दिल्यानंतरही त्यांनी रकमा

मंजूर केल्यानुसार ठरावामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती नुसार सर्वप्रथम 100 घरांचे सभासदांसमक्ष लॉटरी पध्दतीने वाटप करण्यात आले. ज्या सभासदाकडे घरबांधणीच्या रकमा बाकी होत्या त्यांना ऑक्टोबर 95 पर्यंत सदर रकमा भरणा करण्याची अट मंजूर करुन घरांचे वाटप करण्यात आले. त्यांनी हया रकमा भरणा न केल्यास उवविधीतील तरतुदीनुसार कारवाई केली जाईल असे सांगण्यात आले होते. तसेच हिशेबाची खातर जमा करुन घेण्यास अशा सुचना सुध्दा देण्यात आल्या होत्या.

श्री आर. आर. विंगळे यांनी अटी व शर्ती मान्य केल्यावरुन त्यांना लॉटरी पध्दतीने घर क्र. 9 नेमून देण्यात आले. व वेळोवेळी हिषेब पूर्ण केल्यावरुन त्यांना दिनांक 31.3.1995 अखेरची हिशेबाची माहिती दि. 5 मार्च 1997 चे सुचना पत्र दिनांक 31.7.1998 चे सुचना पत्र दि. 31.3.1998 चे सुधारीत हिशेबाची माहिती व दि. 1 जानेवारी 2000 चे सुचना पत्र देण्यात आले. त्यांना त्यांना असेहि कळविण्यात आले होते की, सुधारीत हिशेब पत्रकानुसार दि. 14.8.1998 पर्यंत थकीत रकमा भरणा कराव्यात.

श्री आर. आर. विंगळे यांनी हिशेबाची पाहणी केल्यानंतर व त्यांना खात्री पटल्यानंतरही त्यांनी थकित व देय रकमा भरणा केल्या नाहीत त्यामुळे सर्वसाधारण सभेत सर्वानुमते ठराव मंजूर केल्यावरुन थकीत बाकीदार सभासदांना तसेच श्री आर. आर. विंगळे यांना वकीला मार्फत दि. 29.7.2000 रोजी रजिष्टर पोस्टाने नोटीस बजावण्यात आली. तरी सुध्दा त्यांनी सदर रकमा भरणा केल्या नाहीत. उलट त्यांनी स्वतः घराचे फिनीशिंगची रक्कम संस्थेकडे निघत असल्याचे स्पष्टीकरण दिले. सन 1999 ते 2001 या कालावधीत संस्थेचे पदाधिकारी (अध्यक्ष/सचिव) शासकिय सेवेत पदोन्नतीवर बाहेरगावी गेल्यामुळे संस्थेच्या सक्रिय सभासदांना वसुलीकरीता नियुक्त करण्यात आले होते. त्यावेळी सुध्दा श्री आर. आर. विंगळे यांनी रकमा भरणा करण्यास टाळाटाळ केली. संस्थेचे सचिव श्री एस.जी.गायकवाड हे संस्थेच्या परिसरात राहत असल्यामुळे व ते अकोल्यावरुन नियुक्तीच्या ठिकाणी जाणे येणे करीत असल्यामुळे

12.12.1990 रोजी घरबांधनी प्रस्ताव सादर करण्यात आले. संस्थेने सादर केलेली घर बांधनी योजना शासनाने मान्य करुन या योजनेखालील नियम शिथील करुन योजनेस मंजूरी दिली. शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावासोबत संस्थेने खरेदी केलेल्या सर्व प्लॉटसचे खरेदी खत, हक्कनोंदणी, सभासदांचे सम्मती पत्र, सभासदांची यादी ठरावाच्या प्रमाणित प्रती इ. सादर केलेल्या आहेत.

शासनाने संस्थेच्या 130 सभासदापैकी 110 सभासदांना घरबांधणी कर्ज मंजूर केले व त्यानुसार सभासदरांच्या घरांचे मंजूर केलेल्या आराखडयानुसार घर बांधणीचे काम करण्यात आले. या कार्यवाहीस संस्थेच्या सभासदांनी वेळोवेळी सर्वसाधारण व मासिक सभेत मंजूरी दिलेली आहे. त्यामध्ये श्री आर. आर. विंगळे यांचा सुध्दा समावेश आहे. श्री आर. आर. विंगळे यांनी उपस्थित केलेला मुद्या क्र. 2 व 3 यावर सुधारित आदेश लेआउट व नकाशा पुन्हा मंजुर करण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही तसेच शासनाने कर्ज मंजूर करते वेळी असे आदेश, नकाशा इत्यादी दाखल करण्याच्या सुचना सुध्दा दिलेल्या नाहीत. घर बांधणी योजनेखालील नियम शिथील करुन शासनाने घर बांधणी योजनेस मंजूरी दिलेली आहे व सभासदांना घर बांधणी कर्ज मंजूरी केलेली आहे.

संस्थेने शासनाकडे सादर केलेल्या घर बांधणी योजनेची शासन निर्णय सहकार व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्र. एचएसजी–1090/771/भाग–1/1 ला/18 सि दि. 8.8.1991 व शासन निर्णय क्र. एचएसजी–1090/771/भाग–2/1 ला/18 सि दि. 3 फेब्रुवारी 1993 विशेष सर्वसाधारण सभा दि. 2.10.1990, 14.10.1990, 20.1.1991, 22.4.1991 चे कार्यवृतांत व पुर्तता अहवाल, मंजूरी नकाशाची प्रत, अंदाजपत्रक, बांधकाम परवानगी पत्र इ. च्या झेरॉक्स प्रती सोबत जोडल्या आहेत.

मुद्या क्र. 4 – संस्थेने ज्या सभासदांच्या घराचे पूर्णपणे बांधकाम केले व ते त्यांना नेमुन दिले अशा सभासदांची घरक्रमांकासह यादी सोबत जोडली आहे.

मुद्या क्र. 5 – संस्थेने दि. 1.4.1995 च्या विशेष सर्वसाधारण सभेत सर्वानुमते ठराव

मोजमाप करुन सदर गाळयाची त्यांचे नावाने खरेदी खत करता येईल. व त्यांना उपरोक्त गाळयाच्या क्षेत्रफळाची खात्री सुध्दा करुन घेता येईल. श्री आर. आर. विंगळे यांनी या गाळयात सेस्थेची पूर्व परवानगी न घेता ज्यादा बांधकाम व फेरफार केलेले आहे. सर्व्हिस लेन करीता सोडलेल्या जागेत जादा बांधकाम केल्यामुळे अतिक्रमण केलेली जागा आढळून येईल म्हणून ते माजणीची फी भरणा करण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यांनी वास्तुशास्त्रज्ञाने तयार केलेल्या व त्याला ग्रामपंचायत खडकी बु. यांनी मंजूर केलेल्या नकाशा व्यतिरिक्त यांनी बांधकाम केलेले आहे.

श्री विंगळे यांनी संस्थेकडून गाळा वाटप प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्यानंतर सदर गाळयाची खरेदी करुन न घेताच तलाठी खडकी बु. यांचेकडे अधिकार व अभिलेखात नोंद करुन घेण्याचा प्रयत्न केला. परंतु तलाठी खडकी बु. यांचेकडून संस्थेकडे सुचना पत्र प्राप्त झाल्यामुळे सदर नोंद रुजू होउ शकली नाही. त्यामुळे शासनाचे होणारे मुद्रांक मुल्याचे नुकसान टळले.

संस्थेने खरेदी केलेल्या प्लॉट नं. 39 व 40 च्या खरेदी खताची व हक्कनोंदणीची ले आउट आदेशाची, गाळा वाटप प्रमाणपत्राची व दि. 1.2.2005 च्या पत्राची प्रत या सोबत जाडली आहे.

मुद्या क. 2 व 3 – संस्थेने दि. 1.11.1990 पर्यंत मौजे खडकी बु. ता.जि.अकोला येथील खाजगी ले आउट सर्वे नं. 4 मधील एकूण 83 सलग प्लॉटस एकूण क्षेत्रफळ 1,57,546.36 चौ.फुट जागा 130 सभासदाकरीता व त्यानंतर 20 प्लॉट उर्वरित सभासदाकरीता विकत घेवून प्रत्येक सभासदरला 1200 चौ.फुट जागा व त्यापैकी 586 चौ.फुट जागेवर घर बांधण्याच्या योजनेची संस्थेच्या दि. 2.10.1990 च्या प्रथम सर्व साधारण सभेत खुलासावार माहिती सर्व सभासदांना देवून सर्वानुमते मंजूरी दिल्यावरुन सुरु केली. वास्तुशास्त्राच्या अधिकृत सल्ल्यानुसार व त्यांनी तयार केलेल्या नकाशानुसार व ग्रामपंचायत खडकी बु. यांनी बांधकाम आराखडयास मंजूरी दिल्यावरुन शासनास दि.

लावून माजी सचिवाची सही घेण्या करीता त्यांना त्याच दिवशी परत करण्यात आले. उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या आदेशानुसार शेअर्स सर्टिफिकेटवर माजी सचिवाची स्वाक्षरी करण्या करीता त्यांना दि. 1.3.2007 रोजी पत्राद्वारे कळविण्यात आले. व सदर पत्राची प्रत अपिलार्थीस सुध्दा पोष्टाद्वारे पाठविण्यात आले. व या संपूर्ण प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी यांची खात्री झाल्यामुळेच त्यांनी प्रथम अपील खारीज केलेले आहे असा खुलासा दिलेला दिसून येतो. असे असले तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती चुकीची, दिशाभूल करणारी आहे. व त्याकरीता माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, अकोला जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी खालीलप्रमाणे उपनिबंधक सहकारी संस्था तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेला दिसून येतो.

मुद्या क. 1 – श्री आर. आर. विंगळे सदस्य यांना संस्थेने दि. 1.4.1995 च्या संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेत सर्वानुमते ठराव मंजूर केल्यानुसार लॉटरी पध्दतीने मौजे खडकी बु. येथील लेआउट सर्वे नं. 4 मधील प्लॉट नं. 39–40 चा प्लॉटवर बांधकाम करुन गाळा क. 9 एकूण क्षेत्रफळ 1347 चौ.फुट बांधकाम 586 चौ.फुट इ. तपशिलाच नेमून दिलेला असून त्यांना संस्थेच्या उपविधीतील तरतुदीनुसार परिशिष्ट क. 13 मध्ये गाळावाटप प्रमाणपत्र दि. 21.5.1995 अन्वये दिलेला आहे. या गाळयाची लांबी 49.2 x रुंदी 27.37.81 चौ.फुट (15 x 8.34.69 = 125.20 चौ.मिटर) एवढी आहे.

सदर प्लॉटची/गाळयाची संस्थेकडून खरेदी करुन घेण्याबाबत वेळोवेळी त्यांना कळविण्यात आले आहे व या बाबत वार्षिक आमसभेमध्ये सर्वानुमते ठराव मंजूर केलेले आहेत. दि. 1.2.2005 च्या पत्रानुसार त्यांना सदर गाळयाची खरेदी करुन घेण्या बाबत व मोजमाप करुन घेण्याकरीता संस्थेकडे आवश्यक फी भरणा करावी असे लेखी सुचना पत्र सुध्दा दिलेले आहे. त्यांनी आवश्यक फी भरणा केल्यास सदर गाळयाचे प्रत्यक्षरित्या

सर्वानुमते मंजूर केलेल्या ठरावानुसार माहिती देण्यात आलेली आहे. व त्या संबंधीच्या पोच पावत्यासुध्दा संस्थेच्या दप्तरी उपलब्ध आहेत. श्री रत्नाकर राजाराम विंगळे यांनी सन 1995 नंतर आजपावेतो संस्थेने मागणी केलेल्या कोणत्याही रकमेचा भरणा केलेला नाही. तसेच त्यांच्याकडे संस्थेने सादर केलेला पत्रव्यवहारसुध्दा वेळोवेळी स्विकारण्यास टाळाटाळ केली आहे. वरिष्ठाकडे तक्रारी तथा निवेदन करण्याची त्यांना सवयच लागलेली आहे. त्यांनी संस्थेनी मागणी केलेली रक्कम तथा संस्थेने वेळोवेळी कळविलेल्या निर्णयाची त्यांनी अंमलबजावणी न केल्यामुळे संस्था तोटया मध्ये जात आहे. व त्यामुळे अपिलार्थी ने सुरुवातीला सादर केलेला अर्ज व त्यानंतर दाखल केलेले अपिल अर्ज हे नियमबाहय असल्यामुळे खारीज करण्यात यावे. तसेच उपनिबंधक सहकारी संस्था अकोला यांचेकडून दि. 20.12.2006 रोजी अर्ज प्राप्त झाल्यानंतर दिनांक 21.12.2006 रोजी अर्जदारास मागणी केलेले कागदपत्रा करीता फी भरण्याकरीता डाक नोंद देय पत्राद्वारे माहिती पाठविण्यात आली होती. परंतु त्यांनी सदरचे डाक न घेतल्यामुळे व संस्थेकडे आवश्यक फीचा भरणा न केल्यामुळे त्यांना संस्था माहिती देवू शकली नाही. सदरचे पत्र स्विकारले नाही ही बाब त्यांनी मान्य केली आहे. सदर पत्र दि. 4.1.2007 रोजी संस्थेच परत मिळाले. अर्जदाराने दि. 21.12.2006 च्या पत्राची झेरॉक्स प्रत दि. 5.1.2007 रोजी उपनिबंधक यांचेकडे प्राप्त करुन घेवून त्या आदेशा विरुध्द दि. 18.1.2007 च्या अर्जान्वये अकोला येथे अपील दाखल केले. अपिलार्थीने मागणी केलेल्या कागदपत्राच्या तथा अभिलेखाच्या प्रती अपिलीय अधिकारी यांच्या समक्ष अपिलार्थीस पाहण्याकरीता उपलब्ध करुन दिल्या त्यापैकी अपिलार्थीने आवश्यक असलेल्या प्रतीकरीता रु. 24/- पावती नं. 69 दि. 5.2.2007 रोजी भरणा करुन प्राप्त करुन घेतल्या. दि. 12.2.2007 रोजी अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारीत केले. या व्यतिरिक्त मुद्या क्र. 6 व 7 संबंधी त्यांचे समाधान करुन देण्यात आले. त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या शेअर्स सर्टिफिकेटवर अध्यक्षांनी स्वाक्षरी करुन त्यावर संस्थेचे सिल

माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 18.1.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 12.2.2007 रोजी देण्यात आला असून गैरअपिलार्थी यांनी अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केलेली व संस्थेकडे उपलब्ध असणारी सर्व माहिती दिलेली आहे. करिता अपीलार्थी यांनी दाखल केलेले अपील फेटाळणे योग्य असल्याची माझी खात्री झाली असल्यामुळे अपील फेटाळण्याचा निर्णय देण्यात आलेला दिसतो. सदरच्या अपीलाच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 15.12.2006 च्या अर्जाच्या अनुषंगाने दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी पूर्वी माहितीचा अर्ज सादर केला होता. परंतु सदरचा अर्ज हा परत आलेला होता. व त्यानंतरच अपीलकर्ता यांनी दि. 15.12.2006 चा अर्ज हा उप निबंधक, सहकारी गृहनिर्माण संस्था यांचेकडे शासकीय माहिती अधिकारी यांचेकडे दाखल केलेला दिसून येतो. हयाबाबत जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, अकोला जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना दाखल केलेल्या खुलाशावरुन असे दिसून येते की श्री रत्नाकर राजाराम विंगळे यांनी संस्थेकडे मागणी केलेल्या माहिती अर्जाची प्रत शासकीय माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, अकोला जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था अकोला रजि. नं. 370 यांचेकडे प्रथमताच पाठविला नसून त्यांनी सदरचा मुळ अर्ज दि. 15.12.2006 'वि.शासकीय माहिती अधिकारी गृहनिर्माण संस्था अकोला या नावाने सादर केलेला असल्यामुळे मुळातच त्यांनी माहितीच्या अधिकारातील तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. त्यामुळे त्यांनी आपल्या कार्यालयात दाखल केलेले दुसरे अपील सुध्दा नियमबाहय असल्याचे दिसून येईल. श्री रत्नाकर राजाराम विंगळे यांना संस्थेने सन 1995 पासून वेळोवेळी संस्थेच्या व्यवस्थापन समिती व वार्षिक सर्व साधारण सभेत

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.12.2006 रोजी उप निबंधक, सहकारी गृहनिर्माण संस्था अकोला यांचेकडे महसूल कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. रजि. नं. 370 यांचेकडून यासोबत जोडलेल्या अर्जातील मुद्या क्र. 1 ते 7 बाबत माहिती.

1. श्री आर. आर. विंगळे सदस्य, गृहनिर्माण संस्था खडकी बु. यांचे ताब्यात दिलेल्या गाळा क्र. 9 च्या प्लॉट नं. 39 व 40 मिळून दर्शविलेल्या भूखंडाच्या एकूण 1347 चौ.फूट क्षत्रफळाची अखंड लांबी व रुंदी किती आहे याबाबतची माहिती.

2. रे.केस नं. एनएनपी 34/खडकी बु./65/88–89 दि. 31.5.89 च्या आदेशान्वये अप्रुव्हड बाय आउट नकाशामध्ये प्लॉट नं. 39 व 40 हे प्रत्येकी 1776.06 चौ.फूट म्हणजे 165 चौ.मीटर क्षेत्रफळाचे असतांना त्याचे विभाजन ज्या सक्षम अधिका–याच्या आदेशाने करण्यात आले त्या आदेशाची प्रत.

3. मंजूर ले आउट मधील प्लॉटची लांबी, रुंदी, क्षेत्रफळ, सव्हीस ड्रेनेजेस यामध्ये बदल करुन सब डिव्हीजन्स करुन दोन प्लॉट मिळून घर बांधण्याबाबत सुधारीत ले आउट व अकृषीक आदेशाची नकाशासह प्रत.

4. महसूल ग.नि.संस्थेने सं.नं.4 खडकी बु. येथे बांधलेल्या संपूर्ण घराच्या घर क्रमांकासह साईट प्लॅन.

5. माझे 28.8.2000 चे रजिस्टर हिशेबचे रजिष्टर पत्र क्र. 5443 दि. 30.8.2000 अन्वये जे आपणास पाठविण्यात आले ते पत्र आपणास दि. 5.9.2000 रोजी प्राप्त झाले. त्यावर आजपावेतो काय कार्यवाही करण्यात आली त्याबाबत माहिती.

6. उपविधी क्र. 34 अन्वये परिशिष्ट 15 (1) मध्ये भरुन दिलेल्या अर्ज श्री टी.आर.राउत सचिव गृ.नि.संस्था यांचेजवळ दि. 9.5.06 रोजी देण्यात आला. त्यावर केलेल्या कार्यवाहीची नोंदीची लेखी माहिती देणे.

7. माझे संस्थेमध्ये असलेल्या भागभांडवलाबाबतचे अध्यक्ष व सचिव यांच्या स्वाक्षरीचे प्रमपणपत्र.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1842/2007.**

श्री रत्नाकर राजाराम विंगळे
''वशिष्ठ'' महसूल कॉलनी, रिजनल वर्कशॉपच्या मागे,
मु. खडकी बु. पोष्ट गांधीनगर जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप निबंधक, सहकारी संस्था,
तालुका अकोला, गंगाधर प्लॉट, स्टेशन रोड, अकोला.

2) श्री जे. जी. वाघूरवार
जन माहिती अधिकारी तथा
अध्यक्ष, अकोला जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी
गृहनिर्माण संस्था मर्या. रजि. नं. 370, खडकी जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.5.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

ही जबाबदारी निश्चित करुन त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करण्यात येवून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी व तसा अहवाल आयोगाकडे पाठवावा.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 11.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.444–448

वास्तविक अर्जदार हा जेव्हा अपील दाखल करतो त्याच वेळेस अर्जदारास मागितलेली माहिती उपलब्ध झाली नाही असा याचा अर्थ होतो. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी हे कनिष्ठ वर्गानी दिलेल्या पत्रावर सही करुन निर्णय देत असतात व त्यामुळेच प्रथम अपीलाच्या तरतुदींचा हेतु सफल होत नाही. ज्या सार्वजनिक प्राधिकरणातील माहिती मागितलेली आहे त्या सार्वजनिक प्राधिकरणातील वरीष्ठ अधिका—याकडे अपील करण्याचा हेतूच असा आहे की त्याच सार्वजनिक प्राधिकरणाच्या स्तरावर अर्जदारास माहिती उपलब्ध व्हावी परंतु प्रथम अपीलीय अधिकारी हे प्रशासकीय पत्राच्या पलीकडे अपील प्रकरणाकडे पाहात नाही असे दिसते.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती ही संपुर्णपणे विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 व्या दिवशी सदरची माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन घेण्याकरीता जन माहिती अधिकारी यांचेकडे जावून उपलब्ध करुन घ्यावी व तशी पोच द्यावी.

2) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अधिनियमाच्या कलम 7 (1) प्रमाणे विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली नाही तसेच ती अपुर्ण उपलब्ध करुन दिली अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे ज्या अधिकारी, कर्मचारी यांचे माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता सहाय्य घेतलेले आहे असे अधिकारी किंवा कर्मचारी अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे माहिती अधिकारी असून त्यांचे विरुध्द रु. 10000/— ची शास्ती लादण्यात येत असून सदरची शास्तीची वसुली

त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. परंतु प्रथम अपीलाची सुनावणी न घेता निर्णय दिलेला आहे परंतु तो सुध्दा अपीलकर्ता यांना विलंबाने उपलब्ध करुन दिलेला दिसतो. व नविन कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की सामान्य शाखेकडून माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन दिली असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला. दि. 6.3.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली तरी दि. 7.3.2007 रोजी पुन्हा राज्य जन माहिती अधिकारी यांनी सामान्य शाखेला स्मरणपत्र दिलेले दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती पुन्हा पुर्ण उपलब्ध करुन दिली नाही असेच दि. 6.3.2007 व 30.4.2007 च्या निर्णयावरुन दिसून येते. यावरुन संबंधित राज्य जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता सामान्य शाखेचे सहाय्य घेतले होते असे दिसून येते. व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी ज्या अधिका–याचे किंवा कर्मचा–याचे माहिती उपलब्ध करुन घेण्यास सहाय्य घतले आहे त्यांना सुध्दा जन माहिती अधिकारी समजावे अशी तरतुद आहे व त्यामुळे सामान्य शाखेने विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली असून ती अपुर्ण असल्यामुळे सामान्य शाखेचे अधिकारी किंवा कर्मचारी ज्यांचे माहिती उपलब्ध करुन घेण्या करीता सहाय्य घेण्यात आले होते त्यांनी माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली असल्यामुळे ते दोषी आढळुन येतात व अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्तीस पात्र आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी न घेता किंवा जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्याबद्यल कोणत्याही प्रकारची छाननी न करता दि. 6.3.2007 रोजीचे माहिती उपलब्ध करुन दिली आहे व दि. 16.3.2007 चे अपील हे नस्ती करण्यात येत आहे असा जो निर्णय दिलेला दिसून येतो तो अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करणारा नाही. व त्यामुळे त्यांना सुध्दा ताकीद देणे आवश्यक आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 31.1.2007 रोजी उपवनसंरक्षक अकोला कार्यालयाचे आवारातील 5 बाभळीची झाडे तोडण्यात आली त्या बाबत वृक्ष तोडीच्या परवानगीची नक्कल तसेच सदर वृक्षावर निघालेल्या मालाची विल्हेवाट हयाची कागदोपत्री माहिती मिळणेबाबत. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 12.3.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलबध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 16.3.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 30.4.2006 रोजी दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता हयांनी निर्णय उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. व त्यानंतर त्यांनी दि. 7.6.2007 रोजी दि. 30.4.2007 चा प्रथम अपीलाचा निर्णय उपलब्ध झाला असे त्यांनी आज आयोगापुढे सादर केले.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे द्वितीय अपील दाखल केले असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांचा दिनांक 31.1.2007 च्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 5.2.2007 रोजी माहिती अधिकारी यांनी महसूल शाखा सामान्य लिपीक विभागीय कार्यालय अकोला यांचेकडे उपवनसंरक्षक अकोला कार्यालयाचे आवारातील 5 बाभळीची झाडे तोडण्यासंबंधाने माहितीची मागणी केलेली आहे. तरी त्याबाबतच्या छायांकित प्रति खालील स्वाक्षरी कर्ते यांचेकडे 7 दिवसाचे आंत दोन प्रतीत माहिती सादर करावी असे पत्रानी कळविलेले दिसून येते. सदरच्या पत्राच्या सोबत सदरची छायांकित प्रत सुध्दा जोडण्यात आलेली दिसून येते व अपीलकर्ता यांना त्या पत्राची प्रत सुध्दा मिळालेली दिसून येते. त्या अनुषंगाने दि. 6.3.07 रोजी उपवनसंरक्षक तु. ना. साळुंके यांनी जन माहिती अधिकारी यांना जी माहिती मागितलेली आहे तीच माहिती अपीलकर्ता यांना दि. 12.3.2007 रोजी कळविली असे दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान झालेले नसल्यामुळे

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1873/2007.**

श्री रामराव महादेवराव खोपडे
वन वसाहन सिंधी कॅम्प अकोला 444004 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. के. महाजन
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक
अकोला वनविभाग अकोला
2) श्री जी. के. पवार
जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वनसंरक्षक
अकोला वनविभाग अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना दि. 11.1.2007 व 1.3.2007 रोजी त्यांच्या दि. 17.11.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली असली तरी सदरची माहिती ही विलंबाने उपलब्ध झाली असल्यामुळे व तशी आयोगाची खात्री झाली असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी तथा सहा. संचालक नगर रचना यांचे विरुध्द कलम 20 (1) प्रमाणे रु. 5000/– शास्ती लादण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम ही जन माहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करण्यात येवून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त महानगरपालिका अमरावती यांचेकडे स्वतंत्रपणे पास्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 8.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

आहे. मात्र दि. 8.1.2007 रोजी अपीलकर्ता यांचा अर्ज हा शहर अभियंता विभागास पाठविण्यात आला असे खुलाशात माहिती अधिकारी यांनी म्हटलेले आहे व अपीलकर्ता यांना दि. 11.1.2007 रोजी पत्र क्र. 3107 नुसार कळविण्यात आला. दि. 11.1.2007 च्या उत्तराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की सदरचे उत्तर हे अपीलकर्ता यांचा दि. 17.11.2006 व 28.12.2006 या अपीलाच्या संदर्भामध्ये दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांच्या दि. 17.11.2006 च्या अर्जानुसार माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे असून मुद्या क्र. 2 व 3 ची माहिती मागविण्यासाठी शहर अभियंता यांचेकडे प्रकरण पाठविण्यात आले. याचा अर्थ त्या वेळेपर्यंत सुध्दा माहितीच्या अर्जाची दखल घेतलेली दिसून येत नाही. अर्थातच त्याकरीता अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी स्वतःच दि. 6.1.2007 रोजी पुन्हा सह संचालक नं.2 महानगरपालिका अमरावती यांचेकडे अर्ज सादर केला होता. त्यानंतर पुन्हा दि.11.1.07 रोजी सुध्दा त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी उपआयुक्त म.न.पा. यांचेकडे आक्षेप घेणारा लेखी निवेदन सादर केले होते. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा एकुण सुनावण्या चार वेळेस ठेवण्यात आल्या होत्या. व अंतिम माहिती ही दि. 1.3.2007 रोजी देण्यात आलेली दिसून येते. त्यावरुन माहिती ही निश्चितपणे विलंबाने देण्यात आलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात व शास्तीस पात्र आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी न घेतल्यामुळे अधिनियमाच्या तरतुदींचे पालन केले नाही व त्यामुळे त्यांना सुध्दा ताकीद देणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

बांधकामासाठी संबंधीत जागेच्या दोन्ही भागाकडील भुखंड धारकांची सारखी जागा घेण्यात येईल म्हणजे प्रत्येकी 1 फुट 6 इंच रुंद जागा या संदर्भात मनपाने आता पर्यंत काय कारवाई केली हे जाणून घेणे साठी खालील माहिती पुरविण्यात यावी.

1) दि. 9.3.2005 च्या पत्रात जागेशी संबंधीत सर्व भूखंड धारकाकडून 1.5 फुट रुंद जागा म.न.पा.ने नाली बांधकामासाठी घेतली आहे काय. असल्यास केव्हा म्हणजे कोणत्या तारखेस.

2) 3 फुट रुंद पक्या नालीचे बांधकामासाठी अंदाज पत्रक तयार करण्यात आले आहे काय, असल्यास अंदाजपत्राच्या कामाची किंमत किती. या कामाला प्रशासकीय व आर्थिक मंजूरी घेण्यात आली आहे काय.

3) संबंधित नालीचे बांधकाम केव्हा सुरु करण्यात येईल/सुरु करण्याचे ठरविले आहे.

व्रील 3 मुद्यात केलेली माहिती पुरविण्यात यावी. माहिती स्वतः घेवून जाईल. माहिती तयार असल्यास अर्जदारास लेखी कळवावे असे कळविलेले दिसून येते.''

कलम 7 (1) प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 28.12.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 1.3.2007 रोजी कळविण्यात आलेला दिसून येतो. व त्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 30.4.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 17.1.2006 च्या अर्जाच्या अनुषंगाने कलम 7 (1) प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तसेच कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार 30 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांच्याशी केलेला दिसून येत नाही असे माहिती अधिकारी तथा सहा. संचालक नगर रचना महानगरपालिका अमरावती यांच्या खुलाशावरुन दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांनी युक्तीवादामध्ये त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती किंवा पत्रव्यवहार हा 30 दिवसामध्ये झालेला नाही असे त्यांचे म्हणणे

त्यांचे प्रतिनिधी म्हणून श्री घनशाम वाघाडे सहा. अभियंता 2 आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री विरेंद्र जैन शाखा अभियंता हे हजर आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (5) च्या अन्वये कोणत्याही अपील कार्यवाहीमध्ये विनंती नाकारणे हे समर्थनीय होते हे सिध्द करण्याचा भार, ज्याने विनंती नाकारली होती त्या यथास्थिती, राज्य जन माहिती अधिका–यावर असेल. तसेच कलम 20 (1) च्या द्वितीय परंतुकाप्रमाणे '' परंतु आणखी असे की, त्याने केलेली कृती ही वाजवी होती व साक्षेपाने केलेली होती, हे शाबीत करण्याची जबाबदारी यथास्थिती, राज्य जन माहिती अधिका–यावर असेल''. अशाप्रकारची तरतुद असल्यावर सुध्दा जन माहिती अधिकारी हे सुनावणीस हजर राहिलेले नाहीत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.11.2006 रोजी माहिती अधिकारी म.न.पा.अमरावती यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागण्यासाठी अर्ज केलेला दिसून येतो.

''अर्जदाराने दाखल केलेल्या दिवाणी दावा क्र. Spl C-S-No.114/2003 5 वे कोर्ट Ad. Hoc.A-S-J. अमरावती यांचा दाव्यात लागलेला निकाल दि. 24.3.2005. अ.म.न.पा./स.स.न.र./772/2005 दि. 9.3.2005 पत्राप्रमाणे कारवाई बाबत. माहितीचा कालावधी एप्रिल 2005 ते ऑक्टोबर 2006. आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : अर्जदार कॅम्प विभागात टेलीफोन कार्यालयासमोर राहतो अर्जदाराचे जागेतून पश्चिमेकडील सीमेने 3 फुट रुंदीचे नालीचे पक्के बांधकाम करण्याचा म.न.पा.चा इरादा होता या बांधकामासाठी अर्जदाराची संमती घेण्याची आवश्यकता नाही असे म.न.पाचे मत होते. म्हणून अर्जदाराने कोर्टात दावा दाखल केला होता. त्याचा क्रमांक वर नमुद केला आहे. मनपाने दि. 9.3.2005 रोजी अर्जदारास पत्र पाठविले. त्यावरुन अर्जदाराने कोर्टातून हक्क कायम ठेवून दावा काढून घेतला. या पत्रात मनपा ने खालील बाबी कबुल केल्या होत्या. म.न.पा.स्वखर्चाने 3 फुट रुंद नालीचे बांधकाम करील. या

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1870/2007.**

श्री चंपालाल रामलालजी खत्री
टेलिफोन कार्यालयासमोर
कॅम्प अमरावती 444602. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आयुक्त नं. 1
महानगरपालिका अमरावती
2) जन माहिती अधिकारी तथा
सहा. संचालक (नगर रचना विभाग)
अमरावती महानगरपालिका अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.4.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर असून त्यांचे तर्फे ॲड. राजेंद्र पांडे यांनी युक्तीवाद केला. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे व खुलासा दाखल केलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्रे व खुलासा दाखल केलेला आहे. परंतु आज अपीलाच्या सुनावणीस गैरहजर असून त्यांनी

पिंपळनेर येथील सर्व्हे नं. 39 च्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती छायांकित प्रतिच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 8.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.431–436

पिंपळनेर येथील सर्व्हे नं. 39 मधील देऊळगावराजा ते सिंधखेड राजा या रोड मध्ये गेलेल्या अधिग्रहित केलेल्या क्षेत्राचा मोबदला कुणाला मिळाला अशी विचारणा उपविभागीय अभियंता यांनी विशेष भूसंपादन अधिकारी यांना केलेला असल्यामुळे देऊळगावराजा ते सिंधखेड राजा या रस्त्याच्या संदर्भातील नस्ती जरी विशेष भूसंपादन अधिकारी यांनी शोधण्याचा प्रयत्न केला असता तरी त्यातून त्यांना ती माहिती उपलब्ध झाली असती. यावरुन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग खामगाव तसेच विशेष भूसंपादन अधिकारी बुलढाणा यांनी सुध्दा गंभीरपणे रस्त्याच्या नस्ती शोधण्याचा प्रयत्न केलेला दिसून येत नाही व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांचे दिनांक 27.12.2007 च्या अर्जाप्रमाणे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग खामगाव यांचे विभागातून मुळ नस्तीमधून प्रस्ताव पाठविल्याची माहिती घेवून ती विशेष भूसंपादन अधिकारी यांना कळवावी. तसेच विशेष भूसंपादन अधिकारी यांनी सुध्दा त्यांच्या कार्यालयात देऊळगावराजा ते सिंधखेड राजा या सरकारी रस्त्यासाठी अधिग्रहित केलेल्या जमिनीच्या संदर्भातील नस्तीचा शोध घेवून मौजे

रोजी विशेष भूसंपादन अधिकारी (इ व द) बुलढाणा यांनी भूसंपादन प्रस्ताव हा आपल्या कार्यालयाकडून सादर करण्यात येत असल्यामुळे याबाबतचा प्रस्ताव वि. जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेकडे केव्हा सादर करण्यात आला? व त्याचा प्रकरण क्रमांक याबाबतचा सविस्तर खुलासा कार्यालयास सादर करण्याविषयी कळविण्यात आले होते. परंतु आपण ते न कळविता वारंवार पत्रव्यवहार करित आहात. त्यामुळे सदर माहिती उपलब्ध करुन देणे शक्य झाली नाही. भुसंपादन प्रकरण क्रमांक याबाबतचा सविस्तर खुलासा या कार्यालयास सादर करावा जेणेकरुन उपरोक्त माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होईल असे कळविलेले दिसून येते व त्या पत्राची प्रत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग बुलडाणा यांना अग्रेषित केलेली दिसून येते. त्यानंतरही विशेष भूसंपादन अधिकारी यांना 15.1.2008 रोजी उपविभागीय अभियंता यांनी पुन्हा त्याच संदर्भात पत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतर दि. 21.6.2008 रोजी माहिती उपलब्ध नाही अशा प्रकारे संबंधितास कळविण्यात यावे असा पत्रव्यवहार झालेला दिसून येतो. या संपूर्ण पत्रव्यवहाराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की कोणत्याही विभागाने गंभीरपणे याबाबत शोध घेतलेला दिसून येत नाही. ज्याअर्थी रस्त्याच्या करीता भुसंपादन झालेले आहे त्याअर्थी रस्त्याच्या संदर्भातील नस्ती ही कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग खामगाव यांचे कार्यालयात उपलब्ध असावयास पाहिजे. व ती तशी आहे असे दि. 8.3.2007 चे पत्रावरुन दिसून येते. त्यावरुन विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडे सदरच्या रस्त्याच्या मुळ नस्तीच्या संदर्भात प्रस्ताव केव्हा पाठविला याबाबतची माहिती न विचारता पुन्हा मोबदला कोणाला मिळाला याबाबतची माहिती विचारल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध झाली नाही असेच उत्तर आले. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचकडून मुळ नस्तीतील प्रस्तावाची माहिती घेवून ती विशेष भूसंपादन अधिकारी यांना कळवावयास पाहिजे होती. तसेच दि. 15.1.2007 च्या अर्जामध्ये मौजे

यांना कळविलेले दिसते. परंतु सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांच्या दिनांक 27.12.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती ही संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी दि. 15.1.2007 रोजी विशेष भूसंपादन अधिकारी (इ व द) बुलढाणा यांचेकडे सदर सर्व्हे नंबर मधुन रस्त्यामध्ये गेलेल्या जमिनीचा मोबदला कोणाला मिळाला याबाबत कृपया माहिती पुरविण्यात यावी. जेणेकरुन माहिती अधिकारा अंतर्गत अर्जदारास माहिती कळविण्यास विलंब होणार नाही असे पत्र दिलेले आहे. त्यावर दि. 2.2.2007 रोजी विशेष भूसंपादन अधिकारी (इ व द) बुलढाणा यांनी भूसंपादन प्रस्ताव हा आपल्या कार्यालयाकडून सादर करण्यात येत असल्यामुळे याबाबतचा प्रस्ताव वि. जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेकडे केव्हा सादर करण्यात आला? व त्याचा प्रकरण क्रमांक याबाबतचा सविस्तर खुलासा कार्यालयास सादर करावा जेणेकरुन उपरोक्त माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होईल असे कळविण्यात आलेले आहे. त्यानंतरही दि. 5.2.2007 रोजी उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग खामगाव यांना सदर रस्त्या बाबत भूसंपादन संबंधी माहिती असल्यास कळवावे असे पत्राद्वारे विचारणा करण्यात आली होती. पुन्हा दि. 12.2.2007 रोजी त्याचप्रमाणे स्मरणपत्र दिले होते. त्यावर दिनांक 8.3.2007 रोजी उपविभागीय अभियंता यांना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग खामगाव यांचेकडून सर्व्हे नं. 39 रस्त्याकरीता जमीन अधिग्रहित केलेल्या क्षेत्राचा मोबदला कुणाला मिळाला याबाबत माहिती या विभागात उपलब्ध असलेल्या दस्तऐवजाची पडताळणी केली असता सदर माहिती विभागस उपलब्ध नाही असे कळविले दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांना दि. 13.3.2007 रोजी अंतीम उत्तर दिलेले दिसून येते. त्यानंतरही दि. 16.7.2007, 17.8.2007, 21.9.2007, 12.10.2007, 16. 11.2007 व 17.12.2007 पर्यंत पत्रव्यवहार केलेला दिसून येतो. त्यावर दि. 26.12.2007

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.12.2006 रोजी सार्वजनिक माहिती अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग देऊळगावराजा यांचेकडे मौजे पिंपळनेर येथील सर्व्हे नं. 39 मधील देऊळगावराजा ते सिंधखेड राजा या रोड मध्ये गेलेल्या अधिग्रहित केलेल्या क्षेत्राचा मोबदला कुणाला मिळाला याबाबत माहिती मिळणेबाबत. इ. स. 1960. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दि. 30.12.2006 रोजी आपण मागितलेल्या संबंधित माहितीचा कालावधी इ.स.1960 चा आहे. जवळपास 46 ते 50 वर्षे पुर्वीचा आहे. हे उपविभाग सन 1983 मध्ये कार्यान्वित झाले आहे. फक्त सर्व्हे नंबर वरुन माहिती त्वरीत देणे शक्य नाही हया करीता विभागीय कार्यालय तथा भुसंपादन कार्यालयाकडून माहिती मागविण्यात येत आहे. सदर्हु कामा करीता काही कालावधी नक्कीच लागेल असे कळविण्यात आलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 5.2.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 12.12.2007 रोजी अपीलाच्या सुनावणीच्या करीता अपीलकर्ता यांना उपस्थित राहण्याकरीता कळविण्यात आलेले दिसते. त्याचप्रमाणे दि. 12.2.2007 रोजी उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग देऊळगावराजा यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग खामगाव यांना सदर रस्त्याबाबत भूसंपादन संबंधानी माहिती असल्यास कळविण्यात यावे जेणेकरुन माहिती अधिकारी अंतर्गत संबंधितास माहिती देणे शक्य होईल असे कळविलेले दिसून येते. व सदरच्या पत्राची प्रत ही अपीलकर्ता यांना दिलेली दिसते. त्यानंतर दि.17.3.07 रोजी अपीलकर्ता यांना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग खामगाव यांचे पत्र क्र. सा.बा.वि/प्रलि/1636/ दि. 8.3.2007 अन्वये सदर माहिती विभागात उपलब्ध असलेल्या दस्तऐवजाची पडताळणी केली असता सदर माहिती विभागास उपलब्ध नाही असे कळविले आहे. सदर पत्राची प्रत सोबत सलग्न करण्यात येत आहे असे अपीलकर्ता

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1867/2007.**

श्री ॲड. संतोष जी. डोईफोडे

मु. पो. सिनगाव जहागीर

ता. देऊळगावराजा जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. एस. तळोदे

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग बुलढाणा

2) श्री जी. बी. कांडेलकर

जन माहिती अधिकारी तथा

उपविभागीय अभियंता

सार्वजनिक बांधकाम विभाग देऊळगावराजा

जि. बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.4.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 14.3.2007 च्या अर्जाप्रमाणे मुद्या क्र. 1, 3, 5 व 7 मधील माहिती ही छायांकित प्रतिच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 7.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.426–430

नकाशाची प्रमाणीत प्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही संकुलाच्या मंजुर नकाशाची प्रमाणीत प्रतीच्या संदर्भामध्ये सदरचे बांधकाम बी.ओ.टी तत्वावर असल्यामुळे व नकाशाची प्रत ही त्रयस्थ पक्षाची माहिती आहे व त्या कारणा करीता ती नाकारण्यात आली होती असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु महानगरपालिका तर्फे कोणत्याही प्रकारचे बांधकाम होत असल्यास व ते बी.ओ.टी तत्वावर जरी होत असल्यास आणि ते सार्वजनिक संकुल असल्यास त्याबाबची कोणतीही माहिती ही त्रयस्थ पक्षाची होत नाही तर ती महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाची ती माहिती आहे व त्यामुळे त्रृतीय पक्षाची सम्मतीची आवश्यकता नाही व त्यामुळे नकाशा ही सार्वजनिक अभिलेख होत असल्यामुळे त्या नकाशाची छायांकित प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. नकाशाची प्रत उपलब्ध करुन दिल्यावरच अपीलकर्ता यांना मुद्या क्र. 4 ची माहिती त्यात मिळू शकेल. मुद्या क्र. 5 च्या संदर्भामध्ये विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे असे कळविण्यात आले. परंतु विकास नियंत्रण नियमावली ही तयार झाली असून त्याबाबत हरकती मागविण्याकरीता प्रसिध्द करण्यात आली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले व त्यामुळे ती प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. मुद्या क्र. 7 च्या संदर्भामध्ये सुध्दा अटींची पूर्तता करण्यात आली आहे काय असे विचारले असता होय असे उत्तर दिलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की कोणत्याही प्रकारची अटींची पूर्तता करण्यात आलेली नसून निर्णय हा वेगळया प्रकारे घेण्यात आला आहे त्याकरीता अपीलकर्ता यांना मुद्या क्र. 7 च्या संदर्भामध्ये महानगरपालिके मध्ये जे निर्णय झालेले असतील त्या निर्णयाच्या संदर्भामध्ये टिपण्या किंवा नोट शिटच्या छायांकित प्रति हया उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

महानगरपालिका अकोला यांना प्रेषित प्रतिलिपी प्राप्त झालेली आहे काय? या पत्रातून उल्लेखीत अटींची पुर्तता करण्यात आलेली आहे काय याची माहिती देण्यात यावी.

माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीप्रमाणे दि.12.4.07 रोजी आपण मागितलेली माहिती या कार्यालयात तयार असून त्याकरीता आवश्यक शुल्क रु. 208 भरुन माहिती या कार्यालयातून प्राप्त करुन घेता येईल असे माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार यांनी कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दि. 13.7.2007 रोजी अपीलकर्ता यांनी रु. 208 ची रोख भरणा करुन अपेक्षित माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असा अर्ज दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 13.4.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असून सहपत्र क्र. 6 करीता 1 ते 103 पर्यंत झेरॉक्स प्रति, माहिती क्र. 7 करीता 2 झेरॉक्स प्रत असे उपलब्ध करुन दिलेले दिसून येतात. परंतु सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 16.4.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त, अकोला महानगर पालिका अकोला यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 27.4.2007 रोजी आयुक्त अकोला महानगर पालिका अकोला यांनी दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने सुध्दा समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 13.4.2007 रोजी व दि. 27.4.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरची माहिती अपुरी व दिशाभुल करणारी आहे असा त्यांनी युक्तीवाद केला त्यामुळे अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जातील मुद्येनिहाय माहिती तपासली असता त्यांनी असे सांगितले की मुद्या क्र. 1 मध्ये त्यांनी चटई क्षेत्र कळविलेले आहे. परंतु नझुल नं. 39 – बी भु.क्र.107 व 109 या जागेचे भौगोलीक क्षेत्रफळाची माहिती देण्यात आलेली नाही. तसेच मुद्या क्र. 3 प्रमाणे प्रस्तावीत संकुलाच्या मंजुर

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.3.2007 रोजी अकोला शिट नं. 39 – बी भु.क्र.107 व 109 या जागेवरील प्रस्तावित व्यापारी संकुल व प्राथमिक शाळेच्या बांधकामाची माहिती. माहितीचा कालावधी दि. 28.10.2005. 1) नझुल नं. 39 – बी भु.क्र.107 व 109 या जागेचे भौगोलीक क्षेत्रफळाची तथा या जागेवर बांधकामासाठी अनुज्ञेय चटई क्षेत्राची (एफ.एस.आय.) माहिती देण्यात यावी.

2) प्रस्तावित संकुलासाठी राज्य शासनाचे महसुल विभाग, अगिशमन, नगररचनाकार, पर्यावरण आणि पालीस परिवहन विभागाकडून घेण्यात आलेल्या सम्मती संदर्भातील तपशिल उपलब्ध करुन देण्यात यावा.

3) प्रस्तावित संकुलाच्या मंजुर नकाशाची प्रमाणीत प्रत देण्यात यावी.

4) शाळेतील विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येणा–या मैदान आणि इतर शैक्षणिक सुविधांची तसेच शाळेच्या किती खोल्या निर्माण करण्यात येणार आहेत व शाळेची विद्यार्थी संख्या क्षमता किती ठेवण्यात आली आहे याची माहिती देण्यात यावी.

5) अकोला महानगरपालिकेसाठी विकास नियंत्रण नियमावली तयार करण्यात आलेली आहे काय? या नियमावलीची प्रमाणीत प्रत उपलब्ध करुन द्यावी व या नियमावलीचे तरतुदींचे अनुषंगाने आवश्यक सुरक्षा रक्कम घेण्यात आलेली आहे काय? आयुक्तांनी विकास हक्क प्रमाणपत्र जारी केलेले आहे काय? असल्यास त्याचा तपशिल उपलब्ध करुन देण्यात यावा.

6) अकोला महानगरपालिकेसाठी विकास नियंत्रण नियमावली तयार झालेली नसल्यास नझुल नं. 39 – बी भु.क्र.107 व 109 या जागेवरील प्रस्तावित व्यापारी संकुल व प्राथमिक शाळेच्या बांधकामासाठी लागु असणा–या नियमांची माहिती व प्रमाणीत प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी.

7) मा. जिल्हाधिकारी अकोला यांचे मा. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग मुंबई यांना प्रेषित पत्र क्र. कक्ष–27/प्र.1/नझुल/कावि/2383/05 दि. 28.10.2005 ची आयुक्त

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1865/2007.**

श्री ॲड. शरद नथमल गांधी
म्नपा चौक, गांधी रोड अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त,
अकोला महानगर पालिका अकोला

2) श्री एम. आर. तट्टे
जन माहिती अधिकारी तथा
नगर रचनाकार,
अकोला महानगर पालिका अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारीहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहे.

2) जन माहिती अधिकारी हे आयोगाचे नोटीसीप्रमाणे आयोगापुढे हजर झाले नसल्याने व अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 12.1.2007 च्या कलम 6 (1) च्या अर्जानुसार कलम 6 (1) प्रमाणे विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे दोषी आढळुन येत असल्यामुळे व तसेच आयोगाची खात्री झाली असल्यामुळे त्यांचे विरुध्द रु. 25000/– ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्तीची रक्कम त्यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करण्यात येवून ती लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये भरणा करावा. सदरची कार्यवाही ही मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांनी करावयाची असून आयोगाकडे तसा अहवाल दाखल करावा.

3) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे तसेच आयोगाच्या नोटिसीप्रमाणे कागदपत्रे सुध्दा दाखल केलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करावी.

4) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर<br>
दि. 7.8.2008

( विलास पाटील )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

माहिती देण्यास सुध्दा टाळाटाळ करीत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे कलम 20 (1) प्रमाणे जन माहिती अधिकारी तथा सचिव हे दोषी आढळुन येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द रु. 25000/– ची शास्ती लादणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता माहिती अधिकारी यांना दोन तारखांना पुरेपुर संधी देण्यात आली आहे परंतु कागदपत्रे दाखल केली नाहीत व सुनावणीसही हजर राहिलेले नाहीत. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे उपमुख्य कार्यकारी जिल्हा परिषद वाशिम यांचेकडे जरी केले होते तरी सुध्दा सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये उपमुख्य कार्यकारी जिल्हा परिषद वाशिम यांनी दि. 30.3.2007 रोजी गट विकास अधिकारी हे प्रथम अपीलीय अधिकारी असल्यामुळे त्यांचेकडे अपील अर्जाची प्रत ही हस्तांतर केलेली दिसून येते. असे असून सुध्दा गट विकास अधिकारी पंचायत समिती रिसोड यांनी सुध्दा अपीलकर्ता यांचे दि. 30.3.2007 च्या प्रथम अपीलाची दखल घेतलेली नसल्यामुळे त्याबाबत कोणत्याही प्रकारचा निर्णय सुध्दा दिलेला नसल्यामुळे व आयोगाने नोटिस काढुन सुध्दा कागदपत्रे ही आयोगाकडे दाखल केलेली नसल्यामुळे संबंधित गट विकास अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले दिसून येते व त्यामुळे उपमुख्य कार्यकारी जिल्हा परिषद वाशिम यांनी संबंधित गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या पत्रातील आदेशाप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कारवाई करणे हे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 12.1.2007 च्या जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत निजामपूर यांना दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत मागितलेली माहिती छायांकित प्रतिच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

4. अपीलकर्ता यांच्या दि. 5.5.2007 च्या अपीलाच्या संदर्भात कागदपत्र दाखल करण्याकरीता राज्य माहिती आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. 6.6.2008 रोजी नोटिस निर्गमित करण्यात आली असून दि. 24.6.2008 रोजी सकाळी 10.00 वाजता कागदपत्रे दाखल करण्याकरीता जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत निजामपूर ता. रिसोड व प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती रिसोड यांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे दाखल केलेले नाही व आयोगाचे कार्यालयात सुध्दा हजर झाले नव्हते. मात्र अपीलकार्ता दि. 24.6.2008 रोजी हजर होते व आजही हजर आहेत. उत्तरवादी दि. 24.6.2008 रोजी गैरहजर असल्यामुळे त्यांना आयोगाचे कार्यालयातून पुन्हा दि. 25.6.2008 रोजी नोटिस काढण्यात येवून दि. 7.8.2008 रोजी आयोगाचे कार्यालयात सुनावणीस हजर राहावे व कागदपत्रे, खुलासा दाखल करावे असे कळविण्यात आलेले होते व आजही जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर झालेले नाहीत किंवा त्यांनी कोणत्याही प्रकारचे गैरहजर राहण्या करीता परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये त्यांना कागदपत्रे दाखल करण्याच्या माध्यामातून व सुनावणीस हजर राहण्याच्या माध्यमातून पुरेपुर संधी देण्यात आलेली होती.

5. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ते वारंवार जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत यांना माहिती मागण्याकरीता भेटत असतात. परंतु सचिव, ग्रामपंचायत हे माहिती उपलब्ध करुन देत नाही किंवा उडवाउडवीची उत्तरे देतात. आयोगानी सुध्दा वर नमुद केल्याप्रमाणे नोटिस काढुन सुध्दा ज्याअर्थी सचिव, ग्रामपंचायत हे हजर होत नाही त्याअर्थी अपीलकर्ता यांचे म्हणणे हे खरे आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. यावरुन अपीलकर्ता यांच्या दि. 12.1.2007 च्या अर्जा प्रमाणे जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत निजामपूर यांनी अधिनियमाच्या कलम 7 (1) प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली तर नाहीच परंतु

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.1.2007 रोजी सचिव, ग्रामपंचायत निजामपूर यांचेकडे मौजा निजामपूर येथे ग्रा.पं. अंतर्गत सन 2000 ते आप पर्यंत संपूर्ण रोजगार योजने अंतर्गत कोणकोणती कामे झाली. कोणत्या साली कोणती कामे झाली. सदर कामास शासनागडून निधी किती आला. त्यापैकी दलीत वस्तीसाठी त्याकाळात निधी किती आला. कोठे खर्च केला किती केला शिल्लक किती तसेच यशवंत समृध्द ग्राम योजने अंतर्गत याच काळात किती कामे झाली शासनाकडून निधी किती आला खर्च किती केला शिल्लक किती वरील सर्व माहिती वर्गवारी कामाचे नावासह ग्रा.पं.ने किती कामे केली किती ठेकेदारीत वरील सर्व माहिती व्हाउचरसह मिळावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 30.3.2007 रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 30.3.2007 रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांनी गट विकास अधिकारी पंचायत समिती रिसोड यांचेकडे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्राने आदेश दिलेले दिसून येते व त्याप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे दि. 23.6.2008 रोजी माहिती उपलब्ध झाली नाही याकरीता ॲफिडव्हीट दाखल केलेले आहे. तसेच अपीलकर्ता यांनी सचिव, ग्रामपंचायत निजामपूर यांचेकडे दि. 16.1.2007 रोजी दिलेल्या पत्राची प्रत पण सादर केलेली आहे. तसेच मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांना दि. 20.1.2007 रोजी दिलेल्या पत्राची प्रत सादर केलेली आहे. दि. 20.1.2007 रोजी गट विकास अधिकारी यांना दिलेल्या पत्राची प्रत सादर केलेली आहे. दि. 14.2.2007 रोजी सचिव, ग्रामपंचायत निजामपूर यांना दिलेल्या पत्राची प्रत सादर केलेली आहे. व तरीसुध्दा त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही त्याबद्दल राज्य माहिती आयोगाकडे खुलासा सुध्दा दाखल केलेला आहे.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1863/2007.**

श्री सुभाष किसनराव कुटे
मु. पो. निजामपूर
ता. रिसोड जि. वाशिम ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी
पंचायत समिती रिसोड जि. वाशिम
2) जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत निजामपूर
ता. रिसोड जि. वाशिम ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी विनाअनुमती गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाहीत.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 16.8.2006 च्या माहिती मागण्याच्या अर्जातील वर्णनाप्रमाणे तपशिलात झालेल्या कार्यवाहीच्या छायांकित प्रति विनामुल्य रजिस्टर पोस्टाने हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपलब्ध करुन द्याव्या.

2) संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी तसेच माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असलेल्या अधिकारी कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त नगर पालिका प्रशासन नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 6.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.419–422

3. अपीलकर्ता यांच्या दि. 16.8.2006 च्या अर्जामध्ये स्वतंत्रपणे मागितलेल्या माहितीच्या तपशिलात वर्णन केलेले दिसून येते व तरी सुध्दा सदरची माहिती देता येत नाही अर्ज निकाली काढण्यात येत आहे देयका संदर्भात काही तक्रार असल्यास ते स्वतंत्रपणे करण्यात यावे असे जे उत्तर दिले आहे ते उत्तर हे अतिशय बेजबाबदारपणाचे उत्तर आहे. त्यानंतरही अपीलकर्ता यांनी दि. 9.10.2006 रोजी स्वतंत्रपणे संपुर्ण देयकाची माहिती दिलेली आहे. त्यावरही कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येते परंतु सदरचा निर्णय अपीलकर्ता यांना मिळालेला नाही तसेच जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांना सुध्दा मिळालेला नाही नगरपरिष्दद कामठी येथील लिपीक यांनी सांगितले. जावक लिपीक यांचेकडे प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमित करण्यास पाठविला असल्यास व त्यांनी तो निर्गमित केला नसेल तर त्याचें विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे व ही बाब प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रशासकीय अधिकारी म्हणून आयोगापुढे सुनावणीस येण्यापुर्वीच करणे आवश्यक होते परंतु त्याबाबतही निर्णय दिला पुढे आपले कर्तव्य नाही अशा प्रकारची बेफिकीरी दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी दि. 16.8.2006 रोजी परंतु अर्जाप्रमाणे वर नमुद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे दोषी आढळुन येतात. व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही शिफारस करणे आवश्यक आहे. तसेच सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास नगरपरिषद कामठी येथील जे कनिष्ठ अधिकारी कर्मचारी जबाबदार असतील त्यांचे विरुध्द सुध्दा जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक राहिल जेणेकरुन पुढील येणा–या अर्जाच्या संदर्भामध्ये जबाबदारीने कार्यवाही होईल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.8.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी नगर परिषद कार्यालय कामठी यांचेकडे सप्टेंबर 2003 ते जानेवारी 2004 या कालावधीतील विद्युत कंत्राटाप्रमाणे काम परिपूर्ण करुन दि. 20.2.2004 रोजी रक्कम प्रदानार्थ देयक सादर केलेले आहे. कंत्राटाप्रमाणे काम करुन सादर केलेल्या विद्युत देयकापैकी काही थकीत रक्कम प्रदानार्थ प्रंलबीत ठेवून जाणीवपूर्वक विलंब करीत असल्याने तत्संबंधी मुद्ये निहाय सविस्तर माहिती जाणून घेणे. तसेच माहितीचा विषय याबद्यल सविस्तर टिपणी सुध्दा सदरच्या अर्जामध्ये अपीलकर्ता यांनी दिलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 15.9. 2006 रोजी मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांनी सदर अर्जाद्वारे आपण कोणतीही माहिती मागितलेली नाही सबब आपणास माहिती देणे शक्य नाही. अशा प्रकारे आपला अर्ज निकाली काढण्यात येत आहे. देयका संदर्भात काही तक्रार असल्यास ती स्वतंत्रपणे करावी ही विनंती असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांना दि. 9.10.2006 रोजी देयकाच्या संदर्भामध्ये तपशिलात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. 17.11.2006 रोजी आयुक्त नगरपालिका प्रशासन यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 13.12.2006 रोजी दिलेला असून प्रतिवादी यांनी अपीलार्थी यांना अभिलेखाची विनामुल्य तपासणी करण्याची परवानगी द्यावी व अपिलार्थी यांना आवश्यक असलेली अभिलेख केंद्र माहिती अधिकार अधिनियम 2005 चे कलम 7 पोट कलम 6 अंतर्गत माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केल्याबद्यल विनामुल्य अर्ज केल्यापासून सात दिवसाच्या आंत उपलब्ध करुन द्यावे असे आदेशित करण्यात येत आहे. प्रकरण या स्तरावरुन निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1682/2007.**

श्री महादेवराव गंगारामजी जुनघरे
रा. महाराष्ट्र खानावळ मागे, महात्मा गांधी मार्ग,
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सा.प्र.)
नगरपालिका प्रशासन, नागपूर
2) श्री प्र. सु. प्रधान
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी
नगर परिषद कार्यालय कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

अपीलकर्ता यांनी दि. 20.6.2008 रोजी माहितीच्या अधिकारामध्ये मागितलेली माहिती प्राप्त झालेली आहे. सबब आपणास प्रस्तुत पत्र देत आहे. तसेच त्यांनी दि. 18.6.2008 रोजी पोस्टाने पत्र पाठवून सुध्दा माहिती मिळालेली आहे. काहीही तक्रार नाही, तरी माझे अपील रद्य करण्यात यावे अशी विनंती केलेली आहे. व खंड विकास अधिकारी यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व भविष्यात अर्जदाराने हयाच प्रकरणात आक्षेप घेतल्यास माहिती अधिकारी जबाबदार राहतील असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

नागपूर
दि. 6.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.419–420

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1681/2007.**

श्री धनराज जागोबाजी झंझाड
रा. श्रध्दा पेठ, फ्रन्डस कॉलनी
खात रोड भंडारा 441904 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. जी. वाघाये
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी
पंचायत समिती मोहाडी ता. मोहाडी जि. भंडारा
2) श्री एस. आर. खोब्रागडे
जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्राम पंचायत कार्यालय सितेपार (झं.)
पो. हरदोली (झंझाळ) ता. मोहाडी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. परंतु

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे दि. 15.6.2007 रोजीचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा जि. यवतमाळ यांचेकडे परत करण्यात येत असून त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत प्रथम अपीलाचा निर्णय अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे उपस्थितीत द्यावा.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर<br>
दि. 5.8.2008

( विलास पाटील )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.414–418

सदरची माहिती देण्यात आली नाही असे दिसून येते. एकंदरीत सदर प्रकरणी संबंधितास माहितीत मागितलेले सर्व सेवानिवृत्तीचे फायदे संबंधितास दिले असल्याने माहिती देण्यात आलेली नाही. सदर पत्र अवलोकन करुन कृपया या कार्यालयास किंवा कोणावरही कोणतीही कार्यवाही करु नये ही नम्र विनंती.

यावरुन असे दिसते की अपीलकर्ता यांनी दि. 25.4.2007 रोजी माहिती मागण्याचा अर्ज केल्यानंतर त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे दि. 1.6.2007 रोजी अपील दाखल केलेले आहे. व त्यानंतर दि. 15.6.2007 रोजी प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा जि. यवतमाळ यांचेकडे दाखल केले आहे. वास्तविक अधिनियमाच्या कलम 19 (3) अन्वये प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द द्वितीय अपील दाखल करावयाचे असते. परंतु अपीलकर्ता यांनी आधी द्वितीय अपील दाखल केले व नंतर प्रथम अपील दाखल केले. व त्यामुळेच माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांनी खुलासा दाखल करतांना प्रथम अपील त्यांचेकडे केले असते तर अपीलकर्ता यांना त्याच वेळेस माहिती उपलब्ध झाली असती असे म्हटले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे दि. 15.6.2007 चे प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी यांनी निर्णय दिल्यास त्या निर्णया विरुध्द दाखल झालेले द्वितीय अपीलाच्या बाबत राज्य माहिती आयोगास निर्णय देता येईल व त्यामुळे सदरची प्रथम अपीलाची सुनावणी ही अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे उपस्थितीत घेवून त्या प्रकारचा कारणमिमांसा देणारा निर्णय देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता सदरचे प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे परत करणे संयुक्तिक राहिल.

तसेच आज खुलासा दाखल केला आहे तो खालीलप्रमाणे.

उपरोक्त संदर्भांकित विषयी श्री दिगांबर कोंडबाजी बडकेलवार सवानिवृत्त कार्यालयीन अधिक्षक यांचा माहितीच्या अधिकाराअंतर्गत 2005 अन्वये सेवानिवृत्त विलंबाबत मूळ अर्ज या कार्यालयास 30.4.2007 रोजी प्राप्त झाला. त्यानंतर जनमाहिती अधिकारी श्री आर.एम.आत्राम सहा.प्रकल्प अधिकारी 11.5.2007 रोजी अर्जावार स्वाक्षरी आहे व त्यानंतर 15.5.2007 रोजी आवक होवून श्री मैघणे कनिष्ठ लिपीक यांचेकडे पत्र देण्यात आले.

यासंबंधी संबंधित लिपीक मैघणे यांना विचारणा केले असता त्यांनी दि. 2.8.2008 च्या पत्रात श्री बडकेलवार कार्यालयीन अधिक्षक यांना या कार्यालयाच्या स्तरावरुन सर्व फायदे देण्यात आल्याने सदर पत्राचे उत्तर दिले नाही असा खुलासा सादर केलेला आहे.

स्दर प्रकरणी माहिती तत्कालीन माहिती अधिकारी श्री आर.एम.आत्राम यांच्याकडून माहिती अप्राप्त असल्याने तत्कालीन अपीलीय अधिकारी श्री भागवत सैंदाणे यांच्याकडे अपील करणे आवश्यक होते. परंतु अपीलकर्ता श्री डी. के. बडकेलवार सवानिवृत्त कार्यालयीन अधिक्षक यांनी परस्पर आपल्याकडे अपील केले आहे. त्यामुळे सदर प्रकरण माहिती अधिकारी यांच्याकडून चुकून माहिती दिली नसेल. जर अपीलीय अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली असती तर माहिती देण्याची कार्यवाही झाली असती.

त्यावेळचे माहिती अधिकारी, अपीलीय अधिकारी यांचे स्थानांतर होवून त्यांची दुस–या ठिकाणी पदस्थापना झाली आहे. त्यामुळे सदर प्रकरणी माहिती न देण्यासंबंधी या कार्यालयास पाठपुरावा करता आला नाही. परंतु संबंधित लिपीक यांचे खुलाशावरुन अवलोकन केले असता संबंधितास सेवानिवृत्ती संबंधी सर्व फायदे देण्यात आल्यामुळे

3. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा यांनी द्वितीय अपीलाच्या संदर्भात खुलासा दाखल करतांना या कार्यालयास महालेखापाल नागपूर 2 यांचेकडून तात्पुरते निवृत्ती वेतन मंजुरी आदेश क्र. 6929 दि. 20.11.2006 अन्वये प्राप्त झाले असून सदर कर्मचा–याचे तात्पुरते निवृत्ती वेतन दि. 1.3.2001 ते 31.3.2007 पर्यंतचे एकूण 73 महिन्याचे तात्पुरते निवृत्ती वेतन देयक क्र. 935 दि. 15.3.2007 अन्वये मंजूरी घेवून रु. 2,37,104/– मधून त्यांना अतिप्रदान झालेले व मा. महालेखापाल नागपूर 2 यांचे संदर्भीय पत्रान्वये खालील रक्कम चलानाद्वारे शासनास जमा करुन उर्वरीत रक्कम 1,67,306/– अदा करण्यात आले आहे. सदर देयक या कार्यालयाच्या आस्थापनेवरुन लेखाशाखेस 4351 दि. 19.6.2007 रोजी सादर करण्यात आले होते. सदर देयकास कोषागार आक्षेपामुळे पारीत होण्यास विलंब झाल्याने सदर कर्मचा–यास रक्कम वेळेवर अदा करता आली नाही. अपीलकर्ता श्री बडकेलवार यांचे पत्र दि. 28 मार्च 2008 रोजी दरमहा निवृत्ती वेतन देण्यात यावे याविषयी प्राप्त झाले असून त्यांना दरमहा निवृत्ती वेतन अदा करण्यात येत आहे. तरी उपरोक्त खुलासा माहितीस्तव सविनय सादर.

| अ.क्र. | तपशिल/कालावधी | अदा केल्याचे तात्पुरते निवृत्ती वेतन रक्कम | मंजुरी आदेश क्र. |
|---|---|---|---|
| 1. | सप्टेंबर 2000 ते फेब्रु. 2001 6 महिने | 19488/– | |
| 2. | तात्पुरते निवृत्ती वेतन फरक | 9048/– | |
| 3. | 1.3.01 ते 31.3.07 73 महिने | 237104/–<br>– 69798/– | 4351<br>19.6.07 |
| 4. | 1.4.07 ते 31.5.07 2 महिने | 6496/– | 4597<br>29.4.2007 |
| 5 | 1.6.07 ते 31.11.07 6 महिने | 19488/– | |
| 6. | 1.12.07 ते 31.3.08 4 महिने | 12992 | |
| 7. | 1.4.08 ते 30.4.08 | 3248/– | 2755 23.4.2008 |
| 8. | 1.5.08 ते 31.5.08 | 3248/– | कोषागारातून पारीत झाले. |

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1695/2007.**

श्री दिगंबर कोंडबाजी बडकेलवार
विठ्ठल मंदिर वार्ड,
डॉ. टागोर प्राथमिक शाळेचे मागे,
चंद्रपूर 442402. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) सौ. एस. पी. उदकवार
जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा
जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी मागील तारखेस दि. 26.6.2008 रोजी आयोगाकडे खुलासा व दस्तऐवज सादर केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी द्वितीय अपील मेमोची प्रत दि. 1.6.2007 आणि 19.7.07 व अपीलाची प्रत दि. 15.7.2007 रोजी व त्यावरील स्मरणपत्र दिनांक 7.7.2007 असे दाखल केलेले आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तसेच संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांना सुध्दा अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे माहिती अधिकारी समजण्यात येत असून माहिती उपलब्ध करुन दिली म्हणून दोषी आढळुन येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कारवाई ही जिल्हाधिकारी अकोला यांनी जबाबदारी निश्चित करुन करावयाची आहे व तसा अहवाल आयोगाकडे सादर करावयाचा आहे.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी अकोला यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने वरील कारवाईसाठी पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 5.8.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

केली असे विचारले असतांना पुन्हा उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयातील प्रस्तुतकार यांना पत्र पाठवून माहिती उपलब्ध करुन देण्याबद्यल का विचारण्यात आले असे विचारले असता तहसिलदार कार्यालयातील कर्मचारी यांनी असे सांगितले की संबंधित नस्ती ही उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे होती. याचा अर्थ जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार व त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी किंवा अधिकारी यांनी माहिती काय विचारली याबद्यलची माहिती करुन न घेताच कामाचा निपटारा करण्याच्या दृष्टीने पत्रव्यवहार केलेला दिसतो व त्यांना R.T.I. च्या तरतुदींची जाणीव दिसत नाही. तहसिलदार यांनी कारवाई काय केली याबद्यलची माहिती विचारलेली आहे व ती तहसिलदार यांना द्यावयाची आहे. व त्यामुळेच सदरची माहिती ही विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून व त्याकरीता संबंधित जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार व त्यांचे सहकार्याने सदरची माहिती उपलब्ध करुन घेता येईल असे अधिकारी व कर्मचारी दोषी आढळुन येतात. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर सुध्दा अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती ही उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार हे दोषी आढळुन येतात. परंतु विद्यमान तहसिलदार यांनी खुलासा दाखल करतांना अपीलकर्ता यांना दि. 18.6.2008 रोजी म्हणजे आयोगाची नोटिस दि. 4.6.2008 रोजी निर्गमित झाल्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तसेच संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी हे दोषी आढळुन येतात. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

अधिकारी अकोला यांचेकडून प्राप्त झालेल्या माहिती नुसार मौजे घुसर ता. जि. अकोला येथील गट नं. 901 एफ क्लास मधिल बांधकाम थाबवण्याबाबत आपण कोणती कारवाई केल? त्याची लेखी स्वरुपात माहिती न मिळाल्यामुळे आपल्या कडे अर्ज सादर. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 4.4.2007 रोजी (20.4.2007 रोजी) प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 30.4.2007 रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी तथा तहसिलदार अकोला यांना अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती उपलब्ध अभिलेखानुसार 15 दिवसाचे आंत उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 28.2.2007 च्या अर्जाच्या अनुषंगाने महसुल अनुपत्र तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोला हयांचे कार्यालय अकोला च्या छायांकित प्रतिवरुन असे दिसून येते की दि. 28.2.2007 चा अर्ज हा दि. 6.3.2007 रोजी प्राप्त झाला. अर्जावर माहिती प्राप्त करण्यासाठी अर्जाची झेरॉक्स प्रत संबंधीत लिपीक पस्तु.1 उ.वि.अ. अकोला यांना देण्यात दि. 7.3.2007 रोजी पाठविण्यात आला. संबंधीत लिपीकाकडून दि. 20.3.2007 पर्यंत माहिती प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा व्यक्तिशः कळविण्यात आले. प्रकरण उपविभागीय कार्यालयातून प्राप्त झाले नाही सबब माहिती पुरविता आली नाही. उपविभागीय अधिकारी यांचे सदर प्रकरणातील अपील अर्जावर आदेश पारीत झाला असून सदर माहिती अर्जदारास देण्यासाठी प्रस्तुतकार यांना पत्र दिले असे दि. 3.5.2007 रोजीची नोंद दिसून येते. त्यानंतर कारवाई झालेली दिसून येत नाही. अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये उपविभागीय अधिकारी अकोला यांनी तहसिलदार अकोला यांना दि. 21.2.2007 रोजी दिलेल्या पत्रावर कारवाई काय

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1854/2007.**

श्री सुनिल मधुकरराव पागृत

मु. पो. घुसर ता. जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

उपविभागीय अधिकारी

उपविभागीय अधिकारी कार्यालय अकोला

2) श्री चंद्रकांत बोरकर

जन माहिती अधिकारी तथा

तहसिलदार

ता. जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 28.2.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तहसिलदार ता. जि. अकोला यांचेकडे क.प्र.1/उविअ/कावि449/20 उपविभागीय

कळविल्यामुळे त्यांनी खर्चाचा भरणा केला नाही. तसेच इन्स्पेक्शन घेण्याची आवश्यकता आहे असे त्यांना वाटत नाही. वास्तविक अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले की त्यांनी मागितलेली माहिती ही अतिशय जुनी म्हणजे 1997 पासून व व्यापक प्रमाणात असल्यामुळे त्या संपुर्ण माहितीच्या करीता छायांकित प्रत रु. 2 प्रमाणे खर्च हा त्यांना भरावाच लागणार आहे. व त्यामुळे त्यावेळेस खर्चाचा भरणा केला असता तर त्यांना ही माहिती त्याच वेळेस उपलब्ध झाली असती. तरीही अपीलकर्ता हे माहितीचा जो खर्च होईल तो ते भरण्यास तयार आहे व त्याप्रमाणे आदेश व्हावे असा त्यांचा युक्तीवाद आहे. व त्याकरीता त्यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचा निश्चित असा खर्च रजिस्टर पोस्टाचे खर्चासहित कळविण्यात यावे.
2) अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे खर्चाचा भरणा केल्यानंतर त्यांना 20 दिवसामध्ये छायांकित प्रतीच्या स्वरुपात रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 1.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.404–407

माहिती अधिकारी संबंधित मुख्याध्यापक असून त्यांचे अपीलीय अधिकारी संबंधित संस्था/अध्यक्ष, सचिव असल्याचे कळविल्यामुळे त्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी या कार्यालयाचे पत्र क्र. 23.5.2007 अन्वये संबंधित संस्था अध्यक्ष व सचिव यांचेकडे अपील करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले. तसेच शिक्षण उपसंचालक यानी सदरचे अपीलाच्या संदर्भामध्ये खुलासा दाखल करतांना सदर प्रकरणी शिक्षणाधिकारी माध्यमिक जि. प. वाशिम यांचे पत्र क्र. 14.3.2007 अन्वये संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांना माहिती पुरविण्याबाबत कळविले आहे. तसेच अर्जदारास सदर माहिती सबंधित मुख्याध्यापका कडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविले. त्या अनुषंगाने मुख्याध्यापक पत्र दि. 24.3.2007 च्या पत्रान्वये शिक्षणाधिकारी माध्यमिक जि. प. वाशिम यांना कळविले की श्री अ. शकिल अहेमद शे. लाल यांचे माहितीचे अधिकारात कोणतेही पत्र अर्ज प्राप्त झाले नसल्याने माहिती पुरविता येत नाही असे कळविले त्याची प्रत अर्जदाराला दिली आहे. श्री अ. शकिल अहेमद शे. लाल यांनी संबंधित मुख्याध्यापक यांचेकडे उपरोक्त माहिती दि. 22.3.2007 च्या अर्जान्वये मागणी केली. परंतु संबंधित मुख्याध्यापक यांनी माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी दि. 10.4.2007 अन्वये या कार्यालयाकडे अपील दाखल केले.'' यावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी दि. 5.3.2007 रोजी सुध्दा शिक्षणाधिकारी माध्यमिक जि. प. वाशिम यांचेकडे हीच माहिती मागितलेली दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 22.3.2007 च्या मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहिती प्रमाणे दि. 23.4.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन घेणेकरीता दोन पर्याय सुचविले होते. त्यामध्ये माहितीच्या खर्चाकरीता अंदाजे रु. 200/– चा भरणा करावा किंवा प्रत्यक्ष संस्थेच्या कार्यालयात उपस्थित होवून कागदपत्राचे इन्स्पेक्शन घ्यावे असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी कोणताही एक पर्याय स्विकारुन माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. आयोगाकडे युक्तीवाद करतांना अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की अंदाजे रु. 200/– असे

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.3.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नॅशनल उर्दु हायस्कुल, धनज बु. ता. कारजा यांचेकडे 1) सन 2001 ते 2006 पर्यंत वार्षिक तपासणी अहवालाची प्रत 2) अनुदान प्राप्त झाल्या बाबतचे शासनाकडून संस्थेस प्राप्त आदेश पत्राची प्रत 3) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. वाशिम या कार्यालयाकडून सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा–याची मान्यतेची प्रत 4) शाळा समितीच्या नियुक्ती ठरावाची छायांकित प्रत व त्याकरीता सन 1997 ते 2005 मधील जाहिरातीच्या तारखेच्या पुर्ण वर्तमानपत्राची छायांकित प्रत व अनुदानाच्या वेळेस इमारतीच्या नकाशाची प्रत 5) शिक्षण संचालक पुणे यांनी दिलेल्या 2006–07 मध्ये दिलेल्या मान्यतेची छायांकीत प्रत 6) न्यायालय शाळा न्यायाधीकरण व सिव्हील कोर्ट वाशिम येथील कर्मचा–यांची छायांकित प्रत 7) मुख्याध्यापीकाची मान्यता प्रत व मुळ ठरावाची छायांकित प्रत, तसेच बि.एड च्या टि.सी व गुण पत्रीकेची प्रत 8) सन 1997 पासून ते 2005 पर्यंत चे फिगर अप्रुव्हल ची छायांकित प्रत 9) सन 1999–2000 चे कर्मचारी हजेरी पटाची छायांकित प्रत. अशी माहिती रजिस्टर पोस्टाने मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 23.4.2007 रोजी मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी माहिती पुरविण्यासाठी बरेच कागद असल्याने व त्याचे झेरॉक्स साठी व रजिस्टर साठी आपण पैसे पाठविले नाही त्याला कमीत कमी 200/– रु. लागतात. त्याकरीता आपणास माहिती देण्यात येते की, आपण स्वतः आमचे अध्यक्ष पब्लिक एजुकेशन सोसायटीच्या कार्यालयात मुर्तिजापुर हजर राहून येथे इन्स्पेक्शन घेवू शकतात. करीता आपल्या माहितीस्तव सादर असे कळविलेले दिसून येते. सदरचे उत्तर अपीलकर्ता यांना मिळण्यापूर्वीच व माहिती उपलब्ध करुन देण्याच्या मुदती पुर्वीच अपीलकर्ता यांनी दि. 10.4.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाच्या अनुषंगाने शिक्षण उपसंचालक महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र दि. 30.8.2006 च्या पत्रान्वये

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1848/2007.**

श्री अ. शकिल अहेमद शे. लाल पहेलवान
शिवाजी नगर कारजा (लाड)
जि. वाशिम ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री लक्ष्मीकांत पांडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक
अमरावती विभाग, टोपे नगर, अमरावती
2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, नॅशनल उर्दु हायस्कुल, धनज बु.
ता. कारजा जि. वाशिम ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हया गैरहजर आहेत. व त्यांनी खुलासा व कागदपत्रे सुध्दा दाखल केलेले नाहीत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक यांनी कागदपत्रे दाखल केलेले असून हजर आहेत.

हजर आहेत. परंतु अपीलकर्ता यांनी दि. 11.6.2007 रोजी माहिती उपलब्ध झालेली असून कोणत्याही प्रकारची त्यांची तक्रार राहिलेली नाही असे लेखी दिलेले असल्यामुळे तसेच माहिती अधिकारी व ग्राम विकास अधिकारी यांनीसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली असून अपीलकर्ता यांची तक्रार असल्यास मी जबाबदार राहील असे लेखी दिलेले असल्याने सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

नागपूर
दि. 2.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.405–406

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1844/2007.**

श्री दिनकर आत्माराम लुंगे व गजानन रामरावजी ताले
मु.पो.कन्हेरी सरप, ता. बार्शिटाकळी
जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बी. डी. जाधव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती कार्यालय बार्शिटाकळी
जि. अकोला
2) श्री एन. एन. इंगळे
जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत कान्हेरी (सरप)
ता. बार्शिटाकळी जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी

मागितलेली माहिती ही सचिव ग्रामपंचायत यांना द्यावीच लागणार आहे व घेवू शकतात परंतु तरी सुध्दा त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचा वापर केलेला आहे. परंतु त्यांना ती माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 2.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.401—404

8) ग्रा.पं.साहीत च्या सर्व योजनाच्या बॅक पासबुकच्या झेरॉक्स देण्यात याव्या.

सदरची माहिती पंजीबध्द घेणार असे नमूद केले आहे. व दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 22.3.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. व माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 15.2.2007 च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती कां उपलब्ध करुन दिली नाही असे विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की त्या कंत्राटी सचिव असून नविन असल्यामुळे कायद्याची माहिती नसल्यामुळे व ती माहिती वरिष्ठांकडून घेतल्या नंतर माहिती ही दि. 4.4.2007 रोजी अपीलकर्ता यांना पोस्टाने उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना 5.4.2007 रोजी पोस्टाने मिळाली आहे त्याबाबत दप्तरी नोंद आहे असे पोस्टमन यांनी लिहुन दिलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. 28.3.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यास पत्र दिलेले दिसून येते. अर्थात त्या आदेशा प्रमाणेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सुध्दा खुलासा करतांना केलेले आहे. पोस्ट कार्यालयातून आरपीएडी ने माहिती पाठविली होती त्याबद्यल सदरची माहिती बद्यल त्यांना पोच दिली असे पोस्ट कार्यालयाने लेखी दिले असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध होवून सुध्दा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करतांना अजिबात मिळाली नाही असेच नमुद केलेले आहे. त्यावरुन अपीलकर्ता हे आयोगाची दिशाभूल करीत आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. अपीलकर्ता स्वतः उपसरपंच आहे व त्यामुळे त्यांनी

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.2.2007 रोजी सचिव, ग्रामपंचायत साहित यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेलया माहितीचे वर्णन :–

1) सन 2005 व 2006 च्या नोव्हेंबर च्या ग्रामसभा तसेच मे 2005 ची ग्रामसभा का घेतल्या नाही व त्यावर काय कारवाई केली.

2) ऑगष्ट 2005 ते जानेवारी 2007 या कालावधीत किती मासिक सभा घेतल्या व किती मासिक सभा महिनावार घेतल्या नाही. तसेच न घेतलेल्या सभेची कारणे.

3) यशवंत ग्राम समृध्दी योजने अंतर्गत जानेवारी 2007 पर्यंत किती निधी प्राप्त झाला व किती निधी खर्च केला व खर्च केलेल्या निधीतुन जानेवारी 2007 पर्यंत कोणतेही काम का करण्यात आले नाही. निधी कुणी वापरला याची कारणे. पासबुक चेकबुकचे विवरण देण्यात यावे.

4) ऑगष्ट 2005 ते जानेवारी 2007 चे सरपंच मानधन व ग्रा.पं.कर्मचारी मानधन शासना कडुन किती आले व ग्रा. पंचायत सामान्य फंडातुन किती वापरले याची सर्व माहिती पावत्यासह देण्यात यावी.

5) वसंतराव नाईक शेती स्वालंबन मिशन अंतर्गत राज्य सरकार व जिल्हाधिकारी यांचे स्पष्ट आदेश असतांना एकही ग्रामसभा का घेतली नाही याची कारणे देण्यात यावी.

6) सन 2003 ते जानेवारी 2007 पर्यंत कोंडवाडा, घर टॅक्स सामान्य फंडात जमा किती निधी झाला व कोठे कोठे खर्च केला याच्या सर्व व्हावचर पावत्या सह देण्यात याव्या.

7) ग्रामसेवक ग्रामपंचायत साहित तसेच मुख्याध्यापक सु. म. पांतोड जि.प.शाळा साहीत हे मुख्यालयी का राहत नाहीत. राज्य शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. अराप 1093/प्रक्र 202/15 दि. 16 जुन 1993 अन्वये जे आदेश दिलेले आहेत ते आदेश का पाळण्यात आले नाहीत. मुख्यालयी न राहणा–या कर्मचा–यावर शिस्तभंगाची कार्यवाही का केली नाही.

3

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1860/2007.**

श्री गोपाल गजानन मांगुळकार (उपसरपंच)
ग्रामपंचायत साहित पो. राहीत ता. बार्शिटाकळी
जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बी. डी. जाधव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी
पंचायत समिती बार्शिटाकळी
2) श्री एम. डी. काळे
जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत साहित
ता. बार्शिटाकळी जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

माहिती अधिकारी यांना द्यावयाचे असते. त्यामुळे व्यक्तिशः माहिती घेणार असे नमूद केल्यावर ती जबाबदारी अपीलकर्ता यांचेवर येवून पडते. व खरोखरच अपीलकर्ता हे माहिती घ्यावयास गेले असेल तर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पत्राप्रमाणे माहिती द्यावयास पाहिजे होती. परंतु दोनही बाजुंकडून सत्य काय आहे हे कळणे जरी अशक्य असले तरी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो पत्रव्यवहार केलेला दिसून येतो त्यावरुन व जावक नोंद वहीवरुन पत्रे पाठविलेली दिसतात. जरी सदरच्या माहितीची रु. 70 भरा असे कळविलेले असले तरी माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला असल्यामुळे सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जा सोबत असलेल्या जोडपत्र 2 मधील 8 मुद्यांची माहिती मुद्येनिहाय छायांकित प्रतिच्यासह विनामुल्य उपलब्ध करुन देण्याकरीता सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी व पोच घ्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 1.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 6.3.2007 रोजी उपरोक्त संदर्भात मागविलेली माहिती देण्याकरीता कार्यालयात असलेल्या कागदपत्राच्या झेरॉक्स करण्याकरीताचा खर्च रु. 70 या कार्यालयात भरणा करावा म्हणजे तात्काळ माहिती आपल्याला देण्यात येईल. माहिती टपालाने पाहिजे असल्यास तसे कळविण्यात यावे असे कळविलेले दिसते. त्याकरीता जावक नोंदवहीची छायांकित प्रत ही पुरावा म्हणून जोडण्यात आलेली आहे. त्यामध्ये अनु. क्रमांक 634 व 635 यावर डॉ. विजय नामदेव गोरे व निलेश पोल्ट्री फार्म साकेगाव ता. चिखली बर्डफ्ल्यु माहिती पुरविण्याबाबत अशी नोंद केलेली दिसून येते. सदरची जावक नोंदवहीची छायांकित प्रत विद्यमान जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन यांनी दिनांक 1.8.2008 ला प्रमाणित केलेली आहे व तसे त्यांनी मान्य केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा दि. 10.4.2007 रोजी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त बुलढाणा यांना पत्र क्र. 635 दि.6.3.2007 अन्वये संबंधित माहिती पाठविण्याकरीता झेरॉक्स प्रतिचा खर्च रु. 70 चा भरणा त्यांचे कार्यालयाकडे करण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि अद्याप पावेतो सदर बाबीची पुर्तता आपण केलेली दिसत नाही. आपणास आवश्यक असलेली माहिती जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जिल्हा बुलढाणा यांचेकडून उपरोक्त प्रमाणे पुर्तता करुन मिळवून घेण्यात यावे असे कळविलेले दिसते. परंतु सदरचे दोनही पत्रे अपीलकर्ता यांना मिळाले नाहीत असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे तसेच अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः माहिती घेणार असे नमूद केलेले आहे त्यामुळे ते व्यक्तिशः माहिती घेण्याकरीता 30 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेकडे गेले होते काय असे विचारले असता त्यांनी असे सांगितले की ते जन माहिती अधिकारी यांचेकडे गेले होते परंतु त्यांनी अपशब्द वापरुन माहिती उपलब्ध करुन न देता परत पाठविले. यामध्ये जन माहिती अधिकारी यांचेकडे अपीलकर्ता गेले असते तर त्यांना पत्राची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली असती. परंतु तसे त्यांनी सांगितले नाही. किंवा माहिती उपलब्ध झाली नाही तर त्याबाबतचे आक्षेप घेणारे पत्र हे जन

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.2.2007 रोजी माहिती अधिकारी उपआयुक्त (पशुसंवर्धन) यांचेकडे पोल्ट्री करीता अनुदानाबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1) बर्डफ्ल्युमुळे बंद पडत चाललेल्या दयावयाचे अनुदानाचा (पॅकेज) शासन निर्णयाची प्रत

2) किती अनुदान प्राप्त झाले होते. त्याची रक्कम

3) चिखली तालुक्यातील पोल्ट्रीफार्म धारकांना वाटप केलेले अनुदान फार्म धारकाचे नाव,गाव,वाटप केलेली रक्कम, फार्मची साईज इत्यादी

4) वाटपाचा (अनुदान) महिना

5) माझे दि. 29.1.07 चे प्रस्तावाचे बाबतीत माहिती

6) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांचे दि. 31.1.07 चे प्रस्तावावर कार्यवाही बाबत माहिती

7) आपले कार्यालयात दि. 2.2.07 ला अनुदानाबबत प्रस्ताव सादर केला त्याची माहिती पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती चिखली यांचे पत्र क्र. पंविअ/5/2007 दि. 29.1.2007 प्रमाणे

8) मा. अतिरिक्त कार्यकारी मुख्य अधिकारी जि. प. बुलढाणा यांचे पत्र क्र. बुजिप/साप्रवि/अति.मुकाअ/28/07 दि. 22 जानेवारी 2007 कार्यवाहीची माहिती.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 2.4.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त अमरावती विभाग यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 20.2.2007 च्या अर्जानुसार माहिती का उपलब्ध करुन दिली नाही याबद्यल संबंधित जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1841/2007.**

डॉ. विजय नामदेवराव गोरे
नितेश पोल्ट्री फार्म (साळेगाव)
मु.पो.ता. चिखली वार्ड नं. 9, जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एम. अली
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त
अमरावती विभाग अमरावती
प्रभात टॉकीजच्या मागे अमरावती
2) सौ. पि. डी. दुर्गे
जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त बुलढाणा
पशुवैद्यकीय पॉलीक्लीनीकचे बाजुला
धाड रोड बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांच्या दि. 20.3.2007 च्या अर्जाप्रमाणे अपीलकर्ता हे व्यक्तिशः माहिती घेण्याकरीता जन माहिती अधिकारी यांचेकडे ज्यावेळेस येतील त्यावेळेस त्यांना व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन द्यावी व त्यांचेकडून पोच घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 1.8.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.387–391

की माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण नाही. परंतु अपीलकर्ता हे अनेक अर्ज करतात. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद करतात व माहिती घेण्यास नकार देतात. तसाच प्रकार दि. 17.4.2007 चे सचिव ग्रा.पं. कापशी यांचे कडून अपीलकर्ता यांनी माहिती घेण्यास नकार दिला असे गट विकास अधिकारी यांनी दिलेले पत्राची छायांकित प्रतीवरुन दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी पूर्वी सुध्दा अशाच प्रकारचे अनेक अर्ज अनेक कार्यालयात केलेले असून ते सचिव ग्रा.पं. कापशी यांचा सुध्दा मानसीक छाळ करीत असतात व त्यामुळे आत्महत्येशिवाय पर्याय नाही असे आयोगाकडे लेखी तक्रार केली होती व म्हणून आयोगाने श्री चौके यांची पोलीसच्या मार्फत चौकशी करावी असे आदेश दिलेले आहेत. यावरुन अपीलकर्ता हे व्यावसायीक माहिती मागणारे आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. कोणत्याही व्यक्तीला माहिती मागण्याचा अधिकार आहे परंतु माहिती मागितल्यानंतर त्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे किंवा त्यांच्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असते व तसे अपीलकर्ता सुध्दा जेव्हा ती प्रक्रिया पूर्ण करीत नाही त्यावरुन अपीलकर्ता यांचे हेतु हे स्पष्ट दिसून येते. माहिती मागावयाची परंतु ती स्विकारावयाची नाही यावरुनही अपीलकर्ता यांचा हेतू हा स्पष्ट दिसून येतो. तसेच अर्जदार हा वेळोवेळी वर नमुद केल्याप्रमाणे अनेक कार्यालयात माहिती मागत असतो व त्या बदल्यात खंडणी मागत असतो अशा प्रकारच्या केलेल्या अर्जाच्या प्रतिसुध्दा जन माहिती अधिकारी यांनी आज पुरावा म्हणून सादर केलेले आहे. अपीलकर्ता यांनी अर्जामध्ये माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे त्यामुळे अपीलकर्ता जन माहिती अधिकारी यांचेकडे ज्यावेळेस माहिती घेण्यास येतील त्यावेळेस त्यांना व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

कार्यवाही केली आहे? कार्यवाही केली असल्यास त्या संदर्भातील दस्तऐवजांच्या सत्यप्रती द्याव्यात व कार्यवाही केली नसल्यास संपुर्ण कारे मिमांसेचा तपशील द्यावा.

6) दिनांक 17.1.2007 च्या अपर जिल्हाधिकारी अकोला व दि. 8.3.2007 च्या अपर आयुक्त अमरावती यांच्या निर्णयानुसार सरपंच पद रिक्त असल्यामुळे ग्रा.पं.कापशी रोड ता.जि. अकोला चा कारभार कोणामार्फत चालतो याची सविस्तर माहिती द्यावी.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दि. 3.4.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली असे दिसून येते. तरी सुध्दा दि. 20.4.2007 रोजी पुन्हा गट विकास अधिकारी (वर्ग 1) पंचायत समिती कार्यालय अकोला यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जामध्ये मागितलेली माहिती ही दि. 3.4.2007 रोजी उपलब्ध करुन दिलेली असूनसुध्दा प्रथम अपील कां दाखल केले असे माहिती अधिकारी यांनी विचारले असता अपीलकर्ता हे मु.पो.कापशी येथील रहिवाशी असल्यामुळे व त्यांनी माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे कापशी येथे ग्रामसेवक यांचे बरोबर अपीलकर्ता यांना दि. 3.4.2007 चे माहितीचे पत्र देण्याकरीता दिले होते. परंतु अपीलकर्ता हा व्यक्तिशः माहिती मागूनही माहिती अधिकारी यांचेकडे येत नाही तसेच माहिती त्यांचेकडे दिली तर ते घेत नाही व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला नाही. तसेच अपीलकर्ता यांनी दि. 20.3.2007 पासून 30 दिवसाचे आंत व्यक्तिशः घेणार असे दिलेले असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती घेण्यास ते गेले होते पण त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही असा कोणताही खुलासा किंवा पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केलेला नाही. मात्र विहित मुदत संपल्यानंतर दि. 24.4.2007 रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे

आयुक्त अमरावती यांच्या निर्णयावर आपण कोणती कार्यवाही केली? केली असल्यास तपशील द्यावा. केली नसल्या संपुर्ण कारण मिमांसेसहित संपूर्ण व सविस्तर तपशील द्यावा व सदर प्रकरणी अपर जिल्हाधिकारी व अपर आयुक्त यांच्या कार्यालया मार्फत आपणाशी झालेल्या पत्रव्यवहारासंबंधी तपशील देवून सदर पत्राच्या सत्यप्रती द्याव्यात.

2) दिनांक 17.1.2007 च्या अपर जिल्हाधिकारी अकोला व दि. 8.3.2007 च्या अपर आयुक्त अमरावती यांच्या निर्णयावर सचिव पि.के.भोरे ग्रा.पं.कार्यालय कापशी रोड ता.जि. अकोला यांनी सरपंच पद तसेच सदस्य पद रिक्त असल्याबाबतचा अहवाल सादर केला आहे काय? केला असल्यास अहवालाची सत्यप्रत द्यावी. केला नसल्यास आपण त्या संबंधी ग्रा.पं.सचिवाकडे पत्रव्यवहार केला आहे काय? केला असल्यास सदर पत्रव्यवहाराची सत्यप्रत द्यावी. केला नसल्यास कारण मिमांसाचा सविस्तर तपशील द्यावा.

3) दिनांक 17.1.2007 च्या अपर जिल्हाधिकारी अकोला व अपर आयुक्त अमरावती यांच्या निर्णयावर आपण ग्रा.पं.सचिव पि.के.भोरे कापशी रोड ता.जि. अकोला यांची चौकशी करुन त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी असे नमुद केले असतांना आपण त्याची चौकशी करुन कोणती कार्यवाही केली? केली असल्यास तपशील द्यावा व केली नसल्यास मिमांसा द्यावी.

4) दिनांक 17.1.2007 च्या अपर जिल्हाधिकारी अकोला व अपर आयुक्त अमरावती यांच्या निर्णयानुसार दोषी ग्रा.पं.सचिव पि.के.भोरे कापशी रोड ता.जि. अकोला यांची कार्यप्रणाली सदोष असल्याचे आढळते. त्यावर आपले कार्यालयामार्फत मार्गदर्शक सुचना वजा नोटीस सदर ग्रा.पं. कापशी रोड सचिवास दिले गेले आहे काय? दिले असल्यास त्याची सत्यप्रत द्यावी, दिली नसल्यास का दिली नाही याची कारण मिमांसा द्यावी.

5) दिनांक 17.1.2007 च्या अपर जिल्हाधिकारी अकोला व दि. 8.3.2007 च्या अपर आयुक्त अमरावती यांच्या निर्णयानुसार ग्रा.पं.कार्यालय कापशी रोड ता.जि. अकोला येथील रिक्त झालेले सरपंच पद भरण्यासंदर्भात आपले कार्यालयामार्फत कोणती

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1835/2007.**

श्री सतिश गणपतराव चौके

मु. पो. कापशी रोड ता. जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

गट विकास अधिकारी (वर्ग 1)

पंचायत समिती कार्यालय अकोला

2) जन माहिती अधिकारी तथा

पंचायत समिती कार्यालय अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.8.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग 1) पंचायत समिती अकोला यांचे तर्फे श्री आर. एस. गवई हजर आहे व जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.3.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी पंचायत समिती कार्यालय अकोला यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1) दिनांक 17.1.2007 च्या अपर जिल्हाधिकारी अकोला व दि. 8.3.2007 च्या अपर

अपीलकर्ता यांचा अप्रामाणिकपणा दिसून येतो व अशा अप्रामाणिक अपीलकर्त्यामुळे आयोगाकडे अपीलाची संख्या प्रलंबित दिसूनयेते. ज्या निर्णयाच्या विरुध्द दाखल झालेल्या अपीलामध्ये निर्णय झालेला आहे त्यात पुन्हा निर्णय देणे हे नैसर्गिक न्यायाच्या तत्वाविरुध्द असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 31.7.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.384–386

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे उत्तरवादी हजर आहेत.

2. सदरच्या अपीलाच्या संदर्भात कागदपत्रे दाखल करण्याकरीता दि. 4.6.2008 रोजी आयोगाचे कार्यालयातून नोटिस काढण्यात आली होती. तारीख दि. 20.6.2008 देण्यात आली होती. त्या तारखेस अपीलकर्ता यांनी कोणतेही कागदपत्रे दाखल केली नाहीत. मात्र दि. 28.7.2008 रोजी पत्र पाठवून सुनावणीस हजर राहू शकत नाही असे कळविले. दि. 20.6.2008 रोजी खुलासा दाखल केला व खुलाशामध्ये दि. 15.1.2007 रोजी त्यांनी दाखल केलेल्या अपीलाच्या निर्णयाच्या संदर्भामध्ये पुनर्विचार करावा अशी त्यांनी विनंती केलेली आहे. दि. 15.1.2007 च्या अपीलाच्या सुनावणीस सुध्दा अपीलकर्ता हे दि. 12.10. 2007 रोजी गैरहजर होते. व त्यावेळेस त्यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा दाखल केला नाही. अपील क्र. 500/2007 चा निर्णय वर नमुद केल्याप्रमाणे दि. 12.10.2007 रोजी घेण्यात आला आहे. सदरच्या अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी दि. 26.6.2006 रोजी केलेल्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात तसेच दि. 22.8.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा

उपसंचालक, भुमी अभिलेख यांच्या निर्णयाच्या विरुध्द द्वितीय अपीलाची सुनावणी होवून सदरचा निर्णय झालेला आहे. त्याच दि. 26.6.2006 चा माहितीचा अर्ज दि. 22.8.2006 रोजी दाखल झालेल्या प्रथम अपीलाच्या संदर्भात पुन्हा अपीलकर्ता यांनी दि.14.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केलेले दिसून येते. वास्तविक सदरच्या अपीलाचे दि. 4.6.2008 च्या आयोगाच्या नोटिसी सोबत ज्या अपीलकर्त्याला माहिती उपलब्ध झालेली असेल व कोणतीही तक्रार नसेल तर त्यांनी तसे आयोगास कळवावे असे आव्हान केलेले होते. एकाच अर्जाच्या संदर्भात प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द दाखल झालेल्या अपीलाचा निर्णय झालेला असून सुध्दा पुन्हा 4 महिन्याच्या अंतराने आयोगाकडे तेच अपील दाखल करणे व पुन्हा त्यात निर्णयाची अपेक्षा करणे हा

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1834/2007.**

श्री अवधुत नारायण नवरे
सरस्वती नगर पोस्ट तुकडोजी म. मंदिरा जवळ
व्ही.एम.व्ही. अमरावती 444 604. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री संभाजी शिंदे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक, भुमी अभिलेख कार्यालय
अमरावती कॅम्प अमरावती
2) श्री विष्णु भागवत
जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक
उपसंचालक, भुमी अभिलेख कार्यालय
अमरावती प्रदेश अमरावती कॅम्प अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.7.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

वसुल करुन लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये भरणा करावा.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोष्टाने कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. यांचेकडे पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 31.7.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.